# ज्ञानदेवांचीं भजनें

[ चिंतनिकेसह ]

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0010567
REFBK-0010567

—विनोबा

# ज्ञानदेवांचीं भजनें

## चिंतनिकेसह

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक ...................... नों दि ....................

विनोबा

‘ धर्म जागो निवृत्तीचा हरि-नामें उत्सावो ’
—ज्ञानदेव

REFBK 0010567
REFBK-0010567

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

पुठ्ठा बांधणी, रु. १.५० नये पैसे) ( साधी बांधणी रु. १.००

प्रकाशक :
**भाऊ पानसे**
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम विद्यापीठ
**पो. पवनार, जि. वर्धा.**

प्रकाशकांनीं सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

आवृत्ति ४ थी– प्रति ५०००
**विजया दशमी,** ता० २१-१०-१९५८

मुद्रक :
**भाऊ पानसे**
परंधाम मुद्रणालय, परंधाम विद्यापीठ,
पो. पवनार, जि वर्धा.

# विषयानुक्रम


१ विषयानुक्रम
२ भजनांची वर्णानुक्रमणी
३ प्रस्तावना
४ भजनें

## प्रकरण पहिलें : साधना

| अध्याय | अभंग |
| --- | --- |
| १ जाग रे पुत्र-राया | १- ६ |
| २ साधन करावें शुद्ध मार्गें | २- १३ |
| ३ चित्त-विकास-योग | १४- २० |
| ४ लीला-विनोदें संसार तरिजे | २१- ३० |
| ५ एक नाम हरि द्वैत नाम दूरी | ३१- ४२ |
| ६ ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं | ४३- ५० |
| ७ गुरु हा संत-कुळींचा राजा | ५१- ५६ |

## प्रकरण दुसरें : भक्ति

| | |
| --- | --- |
| ८ सर्व सुखाचें आगर | ५७- ६२ |
| ९ तुज सगुण म्हणों कीं निर्गुण | ६३- ७० |
| १० भक्ति—एकमेव साधन | ७१- ७७ |
| ११ रात्रं-दिवस वाहतसें चिंता | ७८- ८७ |
| १२ परमविरहासक्तिरूपा | ८८- ९३ |
| १३ सर्व सुकृताचें फळ मी लाहीन | ९४-१०० |

## प्रकरण तिसरें : दर्शन

| | |
| --- | --- |
| १४ हरि-दर्शन | १०१-१०९ |
| १५ योगियां दुर्लभ | ११०-११५ |
| १६ नीलवर्ण साक्षात्कार | ११६-१२३ |
| १७ अनुपम्य तेजें धवळलें ब्रह्मांड | १२४-१२९ |
| १८ विश्व-रूप-दर्शन-योग | १३०-१३४ |
| १९ जाणोनियां नेणपण | १३५-१४२ |
| २० तूं तो मी गा, मी तो तूं गा | १४३-१४९ |
| २१ ज्ञानदेवांचा शेवटचा उद्गार | १५० |

५ शब्द-कोश

प्रकाशक :
भाऊ पानसे
ग्राम-सेवा-मंडळ, परंधाम विद्यापीठ
पो. पवनार, जि. वर्धा.

प्रकाशकांनीं सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

आवृत्ति ४ थी– प्रति ५०००
विजया दशमी, ता० २१-१०-१९५८

मुद्रक :
भाऊ पानसे
परंधाम मुद्रणालय, परंधाम विद्यापीठ,
पो. पवनार, जि वर्धा.

# विषयानुक्रम


१ विषयानुक्रम
२ भजनांची वर्णानुक्रमणी
३ प्रस्तावना
४ भजनें


## प्रकरण पहिलें : साधना


| अध्याय | अभंग |
|---|---|
| १ जाग रे पुत्र-राया | १– ६ |
| २ साधन करावें शुद्ध मार्गें | २– १३ |
| ३ चित्त-विकास-योग | १४– २० |
| ४ लीला-विनोदें संसार तरिजे | २१– ३० |
| ५ एक नाम हरि द्वैत नाम दूरी | ३१– ४२ |
| ६ ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं | ४३– ५० |
| ७ गुरु हा संत-कुळींचा राजा | ५१– ५६ |


## प्रकरण दुसरें : भक्ति


| | |
|---|---|
| ८ सर्व सुखाचें आगर | ५७– ६२ |
| ९ तुज सगुण म्हणों कीं निर्गुण | ६३– ७० |
| १० भक्ति—एकमेव साधन | ७१– ७७ |
| ११ रात्रं-दिवस वाहतसें चिंता | ७८– ८७ |
| १२ परमविरहासक्तिरूपा | ८८– ९३ |
| १३ सर्व सुकृताचें फळ मी लाहीन | ९४–१०० |


## प्रकरण तिसरें : दर्शन


| | |
|---|---|
| १४ हरि-दर्शन | १०१–१०९ |
| १५ योगियां दुर्लभ | ११०–११५ |
| १६ नीलवर्ण साक्षात्कार | ११६–१२३ |
| १७ अनुपम्य तेजें धवळलें ब्रह्मांड | १२४–१२९ |
| १८ विश्व-रूप-दर्शन-योग | १३०–१३४ |
| १९ जाणोनियां नेणपण | १३५–१४२ |
| २० तूं तो मी गा, मी तो तूं गा | १४३–१४९ |
| २१ ज्ञानदेवांचा शेंवटचा उद्गार | १५० |

५ शब्द-कोश

# भजनांची वर्णानुक्रमणी

अंक भजनांचे आहेत.


| | |
|---|---|
| अंड-ज जार-ज | ३१ |
| अकार उकार मकार | ७३ |
| अगाधपण माझे अंगीं | १३२ |
| अधिक देखणें तरी | १४१ |
| अनुपम्य तेजें धवळलें | १२९ |
| अनुभव-रहणीविण | ११ |
| अमोलिक रत्न जोडलें | १ |
| अरे मना तूं पापिष्ठा | १६ |
| अवघा डोळां तुज | ९८ |
| अवघा चि संसार | ९९ |
| अष्टांग-योगें | ३० |
| आजि सोनियाचा दिनु | १०२ |
| आतां यापरतें उरलें | १४७ |
| आपुला गुण-ग्राम | १३८ |
| आम्ही कापडी रे | ४७ |
| आम्ही संन्यासी | २० |
| आरंभीं आवडी | २१ |
| आले हरीचे निवट | ४५ |
| इवलेंसें रोप | १०३ |
| उपजोनि संसारीं | ४ |
| एक तत्त्व नाम | २६ |
| एक नाम हरि | ४१ |
| कर्माचिया रेखा | २४ |
| कांहीं न करिजे ते | ७० |
| कान्होबा तुझी घोंगडी | ८५ |
| काळ वेळ नाम | २८ |
| काळा पुरुष तो हा | १२० |
| काळा लपंडाई काळे | ११८ |
| काळें ना सांवळें | १२३ |
| कोटीची भरोवरी | ११५ |
| कोणाचें हें रूप | ६७ |
| गुजगुजीत रूप सांवळें | १०४ |
| गुरु-लिंग जंगम | १५ |
| गुरु हा संत-कुळींचा | ५४ |
| गोपाळा रे तुझें ध्यान | ९६ |
| धनु वाजे घुण-घुणा | ८८ |
| चंचळ चांदणें सोमेविण | १२७ |
| चहूं वेदीं जाण | ३७ |
| चहूं शून्यां आरौतें | १३४ |
| चातकेंविण लक्ष | १४३ |
| चित्रीं सूर्य-बिंब | ५३ |
| चैतन्य चोरुनि नेलें | १३७ |
| चोरांचेनि संगें | ७ |
| जप तप कर्म | ३४ |
| जाग रे पुत्र-राया | ६ |
| जागृति पुसे साजणी | १०७ |
| जाणीव नेणीव भगवंतीं | २९ |
| जाणों गेलियें तंव | १३६ |
| जाणोनियां नेणपण अंगीं | १३५ |
| जिणें देउनि देहीं | १४९ |
| तंववरी रे तंववरी | ८ |
| तीर्थ व्रत नेम | १० |
| तुज सगुण म्हणों | ६८ |
| तुझिये निडळीं कोटि | १०८ |

| | |
|---|---|
| तूं तों माझें मी तों | १४५ |
| तूं माझा स्वामी | ८६ |
| तूझी सेवा करीन | ९४ |
| त्रि-भंगीं देहुडा | ६१ |
| त्रि-वेणी-संगमीं | ३५ |
| दीप दीपिका शशी | ७२ |
| दुडीवरी दुडी | ९२ |
| दुधावरली साय | १४८ |
| दूरीं ना जवळीं | १२६ |
| दृष्टीचें सुख | १२५ |
| देऊनियां भेटी मजसीं | ९१ |
| देखिले तुमचे चरण | १०९ |
| देव आहे जैसा | ६३ |
| देव करी तरी काय | ५२ |
| देव पूजूं गेलों | १४६ |
| देवाचिये द्वारीं | २५ |
| देह दंडूनि पाईक | ७७ |
| देहाचेनि दीपकें | १०६ |
| धर्म जागो निवृत्तीचा | १५० |
| नभ नभाचेनि सळें | ७९ |
| नित्य नेम नामीं | ३३ |
| निरंजन-वना गेलियें | १४२ |
| निर्जीवा दगडाची | ९ |
| निशियेचे भरीं भानु | १२८ |
| निळें हें व्योम | १२ |
| नीळ-वर्ण रजें | १२२ |
| पडिलें दूर-देशीं | ८९ |
| परिमळची धांव | ८१ |
| पांचासहित्त लयातीत | ११७ |
| पांडुरंग-कांति दिव्य | ६० |
| पाइका मोल नाहीं | ८७ |
| पावलों जीणें | १४४ |
| पाहें पां ध्वजेचें | ८० |
| पूर्व जन्मीं सुकृतें | ४४ |
| पैल तो गे काऊ | ९० |
| फळाचें बीज कीं | ६९ |
| बरवा वो हरि | ५८ |
| भक्तीचें तें ज्ञान | ३६ |
| भजनापरीस साधन | ७४ |
| भावेंविण भक्ति | १३ |
| भेटीसि गेलियें तंव | १३९ |
| मज माजीं पाहतां | १४० |
| मन मुरडोनि डोळां | ११९ |
| मन मुरे मग जें | १७ |
| मलयानिळ शीतळु | ६४ |
| माझिये हृदयीं बुंथी | १०० |
| माथे टेकीत बाह्या | ६२ |
| माझे जीवींची आवडी | ९७ |
| मेरूपरतें एक व्योम | १२४ |
| यति कुळ माझें | ९३ |
| योग याग विधि | ४८ |
| योगियां दुर्लभ तो | ११० |
| रंगा येई वो | ९८ |
| रात्रं-दिवस वाहतसें | ९८ |
| राम-कृष्ण-नामें | २३ |
| रुणु-झुणु-रुणु-झुणु रे | ५९ |
| रूप पाहतां लोचनीं | ५७ |
| रूप सामावलें दर्शन | १११ |

| | |
|---|---|
| लक्ष लावूनि अंतरीं | ७८ |
| वाराणसी यात्रे जाईन | ८२ |
| विश्व-रूप पाहें तंव | १३० |
| विश्वाचें आर्त | १३१ |
| वेद-वाणी चांग | १२ |
| वृत्तीसहित मज | १८ |
| शर्करेची गोडी | ४६ |
| शांति क्षमा दया | १४ |
| श्रवण घ्राण रसना | ५ |
| श्रीगुरूसरिखा | ५१ |
| सकळ तीर्थें निवृत्तीचां | ५५ |
| सकळ नेणोनियां आन | ७१ |
| सकळ-मंगळ-निधि | २२ |
| सगुणाची सेज | १०५ |
| सत्य-ज्ञानानंत | ६६ |
| सम सुख शेज | ५६ |
| समाधि-साधन संजीवन | ४० |
| समाधि हरीची | ७६ |
| सर्व-व्यापक | ३९ |
| सर्व-सुख-गोडी | ४२ |
| सर्वादि सर्व-साक्षी | ६५ |
| साउमा जंव जाये | १९ |
| सात-पांच-तीन | २७ |
| साधु-बोध जाला | ५० |
| सार सार सार | ३२ |
| सुंदर सुरेख ओतिलें | ११३ |
| सुख सोज्वळ | ११२ |
| सुखाचा निधी | ११६ |
| सुखाचिया गोठी | ८३ |
| सुढाळ ढाळाचे मोतीं | २ |
| संत भेटती आजि | ४३ |
| संतांचे संगतीं | ४९ |
| स्वप्नींचां घाई | ३ |
| स्वर्ग जयाची | १३३ |
| स्व-रूपाकारणें | ७५ |
| स्व-रूपाचेनि भानें | ११४ |
| हरि आला रे | १०१ |
| हरि-उच्चारणीं | ३८ |

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

ज्ञानदेवांच्या भजनांच्या दुसऱ्या आवृत्तींत पद्य-संख्या आणि रचना पूर्वी-प्रमाणें च ठेवली आहे. पूर्वींचें ६३ वें पद्य काढून त्याजागीं नवीन पद्य घातलें आहे. एक-दोन पद्यें संक्षेपिलीं आहेत. कांहीं संशोधिलीं आहेत. संशोधनाला अजून अवकाश नाहीं असें नाहीं, पण सध्यां इतकें च शक्य झालें आहे.

ज्ञानदेवांचीं कांहीं भजनें गूढ वाटण्यासारखीं आहेत. ज्यांत अंतिम अनु-भवाचें वर्णन आहे त्यांची भाषा तर त्रुटित च आहे. यांत आश्चर्य नाहीं. जो अनुभव शब्दांत मावणारा च नाहीं, तो मोडक्या भाषेंत कां होईना, मांडला गेला हें च विशेष आहे. तो विशद करण्याचें काम भाष्यकाराचें आहे. त्यासाठीं येथें सर्व भजनांवर चिंतनिका जोडली आहे. पण चिंतनिकेंतील चिंतनांचें स्वरूप लक्षांत घ्यावयास पाहिजे. चिंतनांचें स्वरूप एकजिनसी कल्पिलेलें नाहीं. त्यांत कुठें सविस्तर भाष्य आहे, कुठें संक्षिप्त सार आहे. कुठें सरळ अनुवाद आहे, तर कुठें स्वैर संचार आहे. चिंतन करणारास जो भाव स्फुरला तो त्यानें अनिर्बंध मांडला आहे. एका प्रकारें ती एक स्वतंत्र रचना च आहे. आणि मुळाला मदत म्हणून जरी ती योजिलेली आहे तरी पुष्कळांना स्वतंत्रपणें तिचा च अधिक उपयोग होण्याचा संभव आहे. ज्ञानदेवांच्या भजनांचें या च प्रकारें चिंतन झालें पाहिजे असा आग्रह नाहीं. उलट ज्याला ज्याला शक्य होईल त्यानें आपापली जीवन-शुद्धि लक्षून स्वतंत्रपणें चिंतन करावें अशी इच्छा आहे. येथें जोडलेली चिंतनिका केवळ दिशा सुचविणारी आहे.

महत्त्वाच्या किंवा कठिण वाटणाऱ्या शब्दांचा अर्थ-कोश जोडलेला आहे. चिंतनिकेचें स्वरूप अक्षरार्थ सांगणारें नसल्यामुळें अक्षरार्थ समजण्याला हा कोश साह्य देईल. यच्च-यावत् सर्व शब्द हि कोशांत देतां आले असते, पण तें बिन-गरजेचें मानून त्याऐवजीं सढळ हातानें पुष्कळ शब्दांचा यांत संग्रह केला आहे.

हरिपाठाचे अभंग वगळतां बाकीचीं ज्ञानदेवांचीं भजनें मोकळीं आहेत. तीं विशिष्ट रचनेंत बसविण्याची जबाबदारी ज्यानें पत्करली त्यानें दुसऱ्याच्या भाषेंत स्वतःचा ग्रंथ लिहिल्यासारखें च होतें. पण जाणून च मीं तसें केलें आहे. साधनेच्या क्रमाविषयींच्या माझ्या दृष्टीप्रमाणें अर्थात् मीं ही रचना केली

आहे. ती ज्ञानदेवांना कितपत मानवेल हें ज्ञानदेवांशीं मी किती एकरूप झालों आहें यावर अवलंबून आहे. पण मला त्याची फिकीर नाहीं. ज्ञानदेवांशीं मी जितका एकरूप होऊं शकलों तितका दुसऱ्या कुणाशीं झालों नाहीं, एवढें मला माहीत आहे. पण ही माझी च रचना ठरली तरी कांहीं हरकत नाहीं.

अध्यायांच्या नाम-करणासंबंधीं मागच्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत शिवाजीनें दिलेला खुलासा पर्याप्त आहे. "अनुक्रमणिकेंतील अध्यायांचीं पद्य नांवें मूळ ज्ञानदेवांच्या पद्यांतलीं च घेतलेलीं आहेत. गद्य नांवांत 'परमविरहासक्तिरूपा' आणि 'विश्वरूप-दर्शन-योग' हीं दोन नांवें अनुक्रमें 'नारद-भक्ति-सूत्रें' आणि 'भगवद्गीता' यांत आढळून येणारीं आहेत. बाकीचीं गद्य नांवें अध्यायांना अनरूप अशीं देण्यांत आलीं आहेत."

"हीं भजनें ज्ञानदेवांचीं च आहेत का," याविषयीं विद्वान मंडळींत चर्चा चालते. ज्ञानदेवांच्या नांवावर असलेलीं सुमारें एक हजार पद्यें सर्व ज्ञानदेवांचीं च आहेत असें म्हणण्याची सोय नाहीं. पण जीं पद्यें 'ज्ञानदेवांचीं च अशी मनोमन साक्ष पटली त्यांतून हीं निवडलीं आहेत. ज्ञानेश्वरींत आणि अमृतानुभवांत हि न मांडले गेलेले कांहीं अनुभव यांत आहेत. त्यांत एक नवीन योगशास्त्र च सूचित आहे. त्यांच्या अध्ययनाशिवाय ज्ञानदेवांचा अभ्यास पूर्ण होणार नाहीं, असें मी समजतों. पण तें कसें हि असलें तरी, अंतरंग-साधनेसंबंधीं ह्यांत उपलब्ध होणाऱ्या सूचना आणि खुणा फार च मोलाच्या आणि अवश्य चिंतनीय आहेत. ह्यांत संशय नाहीं.

परंधाम, पवनार
२८–११–४६

—विनोबा

## तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

ज्ञानदेवांचीं भजनें आणि त्यांची चिंतनिका यांत मीं जितका चिंतनांश ओतला आहे तितका गीताई आणि गीताई-कोश सोडल्यास दुसऱ्या कशांत हि ओतला नसेल. ज्ञानदेवांच्या अभंगांची याहून अधिक चांगली निवड मला करतां येणार नाहीं. आणि त्या चिंतनिकेंत अशी गोडी आहे कीं तिला शिळेपण कधीं च यायचें नाहीं.

बिहार-भूदान-यात्रेंतून
२८–९–५२

—विनोबा

# ज्ञानदेवाचीं भजनें

## प्रकरण पहिलें : साधना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ★ 10480
मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .......... वि: ..........
क्रमांक .................... नों: दि: ..............

### अध्याय १

१

**अमोलिक रत्न जोडलें रे तुज । कां रे ब्रह्म-बीज नोळखसी**
**न बुडे न कळे न भिए चोरा । ते वस्तु चतुरा सेविजेसु**
**ज्ञानदेवो म्हणे अविनाश जोडलें । आणूनि ठेविलें गुरु-मुखीं**

नर-देह म्हणजे एक अमोलिक रत्न आहे. तो जणूं ब्रह्म-बीज च आहे. सर्व प्रकारें निर्भय अशा आत्म-ज्ञानाची त्यांत शक्यता आहे. आणि ती सिद्ध करण्यांत च माणसाचें चातुर्य आहे.

ज्ञानदेव म्हणतो, तें आत्म-ज्ञान माझ्या कायमचें हातांत आलें आहे. आणि गुरु-मुखानें लाभलेल्या शब्दांत मीं तें सांठवून ठेवलें आहे.

२

**सुढाळ ढाळाचें मोतीं । अष्टै अंगें लवे ज्योति**
**जया होय प्राप्ति । तो चि लाभे**
**हातींचें निधान जाय । मग तूं करिसी काय**
**पोळिलियावरी हाय । निववूं पाहे**
**अगा आला नाहीं घावो । तंव ठाकी एक ठावो**
**बाप रखुमादेवी-वरु । विठ्ठलु नाहो**

ज्ञान-बीज-रूप नर-देह, म्हणजे आठी अंगानें उज्ज्वल असें मोती आहे. पूर्व पुण्यानें च लाभत असतें. तें हातचें निघून गेल्यावर पश्चात्ताप करण्यांत अर्थ नाहीं. वेळीं च सावध होऊन, त्याच्या साह्यानें मुक्काम गांठला पाहिजे. प्रभूचें दर्शन केलें पाहिजे.

३

**स्वप्नींचा घाई विवळे साचें । चेइलेयावरी म्हणे मी न वचें**
**जन कैसे माया भुलले । आपुलें हित आपण चुकले**
**आपीं आप असे । मी काय जालोंसें लोकां पुसे**
**बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलें । कैसें गुरु-मुखें खुणा उगविलें**

घाव स्वप्नांतला, पण दुःख खरोखरचें. जागा झाल्यावर दोन्ही खोटीं ठरतात. आहे आपल्या च ठिकाणीं. पण आत्मोद्धाराचा प्रयत्न करीत नाहीं. आणि माझी काय गत म्हणून लोकांना विचारीत सुटतो. ईश्वराच्या इच्छेनें, आणि गुरु-कृपेनें, जीवन-दृष्टि लाभली म्हणजे सारें च कोडें उलगडतें.

४

उपजोनि संसारीं, आपुला आपण वैरी
'मी' 'माझें' शरीरीं, घेउनि ठेलें

देहातें म्हणे 'मी', पुत्र दारा धन 'माझें'
काळाचें हें खाजें, ऐसें नेणतु गेला

काम-क्रोध-मत्सराचेनि गुणें
बांधिला आपण नेणें, भ्रमितु जैसा

मिथ्या मोह-फांसा, शुक नळिके जैसा
मुक्त परी आपैसा, पळों नेणे

जळ-चर आमिष गिळी, लागलासे गळीं
आपणपें तळमळी, सुटिका नाहीं

तैसें आरंभीं विषय-सुख, गोड वाटे इंद्रियां
फळ-पाकीं पापिया, दुःख भोगी

राखोंडी फुंकितां, दीप न लागे जियापरी
तैसा शब्द-ब्रह्म-कुसरी, ज्ञान न पवे

ज्ञानदेवो म्हणे, बहुतां जन्मांचा अभ्यासु
तरी चि होय सौरसु, पर-ब्रह्मीं

जन्माला येऊन मनुष्य आपण च आपलें वैर करीत असतो. देह मी आणि पुत्रादिक माझे, अशी कल्पना करून 'शुक-नलिका' न्यायानें स्वतःला बांधून घेतो. काम-क्रोध-मत्सरांच्या पाशांनीं आपल्याला जखडून टाकतो. आणि आभासिक इंद्रिय-सुखांत गुंतून, परिणामीं दुःख भोगतो. केवळ शाब्दिक ज्ञानानें यांतून सुटका होणें नाहीं. दीर्घकालपर्यंत सतत साधनेचा अभ्यास करीत राहिलें पाहिजे. तर च शेंवटीं ब्रह्म-दर्शन लाभून सुटका होऊं शकते.

५

श्रवण घ्राण रसना त्वचा आणि लोचन
हीं तों दैन्याचीं द्वारें
वोळंगसी, यांचें यांसि चि न पुरे
तुज पुरविती काय

यालागीं धरिजेसु
आपुली सोय रे बापा
अरे मना रे अरे मना रे
न संडीं हरि-चरण-कमळा रे

स्वप्नींचें धन तें धन चि नव्हे
मृग-जळींचें जळ तें जळ चि नव्हे
अभ्रींची छाया ते साउली नव्हे
ऐसें जाणोनियां वेगीं धरिजेसु आपुली सोय रे रया

तूं जयाचा, जेथोनि जीवें जितासी
तया श्रीहरीतें रे नोळखसी
बाप रखुमादेवी-वरा विठ्ठला चिंतिसी
तेणें पावसी तूं सुखाचिया राशी रया

इंद्रियांच्या नादीं लागणें, म्हणजे दीनवाणेपणा पत्करणें आहे. त्यांचें च कधीं समाधान झालें नाहीं, तर तुझें तीं समाधान काय करणार? स्वप्नांतलें धन, मृग-जळाचें पाणी, ढगाची सावली, आणि इंद्रियांचा आधार, सारख्या च किंमतीचीं. म्हणून ह्यांचा नाद सोडून, तूं आपली सोय पहा. तुझा जीवनाधार अंतरात्मा श्रीहरि आहे. त्याचें चिंतन करीत जा. त्यांत सुखाच्या राशी सांठविलेल्या आहेत.

६

जाग रे पुत्र-राया जाईं श्रीगुरू शरण
देह तूं व्यापिलासि चुकवीं जन्म-मरण
गर्भ-वास वोखटा रे तेथें दुःख दारुण
सावध होईं का रे पुत्र तूं सुजाण

मदालसा म्हणे पुत्रा ऐक बोलणें माझें
चौऱ्यांशी घरांमाजीं मन व्याकुळ तूझें
बहुत शिणतोसि, पाहतां या विषयांसि
जाण हें स्वप्न-रूप येथें नाहीं बा दूजें

सांडीं रे सांडीं बाळा सांडीं संसार-छंदु
माशियां मोहळ रे रचियेला रे कंदु
झाडूनि आणिकीं नेला तयां फुकट चि वेधु
तैसी परी होईल तूज उपदेशें आनंदु

जाणतेया उपदेशु नेणे तो भ्रांती पडिला
तैसा नव्हे प्रकाशु ज्ञानदेवो अनुवादला
अनुभवी गुरु-पुत्र तो चि स्वयें बुझाला
ऐके तया उद्धरण गायक सहज उद्धरला

मदालसा आपल्या मुलाला उपदेश करीत आहे :—"मुला जागा हो. गुरूला शरण जा. देह-बुद्धि सोडून जन्म-मरणाची यातना चुकव. अनेक योनि धरायच्या आणि सोडायच्या, म्हणजे शक्तीचा विनाकारण क्षय आणि सुदीर्घ यातना च म्हणावयाची. गर्भ-वास म्हणजे तर पराधीनतेची कमाल. पराधीनतेसारखें दुःख कोणतें असणार ? आणि इतकें करून काय मिळविशील ? कांहीं विषय-संपादन करशील. तर मधमाशांचा मध जसा

लोक लूटून नेतात, तसा इंद्रियें तो सारा विषय लुटून नेतील, आणि तूं उघडा पडशील. म्हणून हा उपदेश ऐक. त्यानें तुला सुख लाभेल."

वस्तुतः जाणत्याला या जगांत उपदेश च भरलेला आहे. पण नेणता भ्रमांत सांपडतो. त्यामुळें त्याला प्रकाश लाभत नाहीं. त्यासाठीं ज्ञानदेवानें मदालसेच्या उपदेशाचा अनुवाद केला आहे. अनुभवी गुरूंचा अनुग्रह ज्याला लाभला, तो त्यांतलें मर्म सहज समजेल. हें ऐकणाराचा अवश्य उद्धार होईल. कारण गाणारा स्वतः उद्धरला आहे.

## अध्याय २

### ७

**चोरांचेनि संगें क्रमितां पैं पंथ । ठकूनियां घात करितील**
**काम क्रोध लोभ घेऊनियां संगें । परमार्थासि रिघे तो चि मूर्ख**
**बांधोनियां शिळा पोहूं जातां सिंधु । पावे मति-मंदु मृत्यु शीघ्र**
**देह गेह भ्रांती सोडूनियां द्यावें । साधन करावें शुद्ध मार्गें**
**ज्ञानदेवो म्हणे तरी चि साधेल । नाहीं तरी चळेल मध्य भागीं**

चोरांच्या संगतींत मार्ग आक्रमणें, म्हणजे आपला घात करून घेणें च नव्हे काय? काम-क्रोध-लोभरूप त्रि-कूटासह परमार्थांत शिरूं पाहणें, म्हणजे केवळ वेडेपणा होय. देह-गेहाविषयींच्या संकुचित कल्पना, ज्या उराशीं बांधून ठेवल्या आहेत, त्या सर्व सोडून, चित्त-शुद्धि-पूर्वक ज्ञानसाधन आचरिलें, तर च तारण आहे. अन्यथा मधें च घात होईल.

८

तंववरी रे तंववरी जंबूक करी गर्जना
जंव तया पंचानना देखिलें नाहीं बाप
तंववरी रे तंववरी मित्रत्व-संवाद
जंव अर्थेसीं संबंध पडिला नाहीं बाप
तंववरी रे तंववरी बाधी हा संसार
जंव रखुमादेवी-वर देखिला नाहीं बाप

मनुष्याचा मुख्य वैरी अर्थ-लोभ आहे. अर्थ-लोभ राखून मनुष्य मित्रांना हि गमावून बसतो. बरें, अर्थ-लोभ कशासाठीं राखायचा म्हणतां? संसारांत अडचण राहूं नये म्हणून. पण ईश्वराच्या भक्तानें संसाराची अडचण कधीं जाणली च नाहीं. तो तर जगभर मित्र जोडीत च जाणार.

९

निर्जीवा दगडाची काय करिसील सेवा
तो तुज निदेवा देईल काई
कवणें गुणें भुली पडली गव्हारा
तीर्थाचेया माहेरा नोळखसी
अष्टोत्तर-शें तीर्थें जयाचां चरणीं
तो तुझां हृदय-भवनीं आत्मा-राम
देव जवळीं असतां जासी आना तीर्था
मुकलासि आतां म्हणे ज्ञानदेवो

नर-देहानें प्राणि-मात्रांची प्रेम-पूर्वक सेवा करतां येते. ती टाळून, निर्जीव मूर्तीच्या दर्शनासाठीं तीर्थ-यात्रादि करीत बसतोस. त्याचा काय उपयोग?

हृदय-मंदिरांत लपून बसलेला, तीर्थांचा तीर्थ-रूप जो आत्मा-राम, त्याचें दर्शन हवें आहे. त्यासाठीं, हृदय-शुद्धि आणि जवळच्या जीवसृष्टीची सेवा, हा च उपाय आहे. तिकडे लक्ष न देशील तर, एवढा नर-देह लाभून, फार मोठी संधि गमावून बसलास असें होईल.

१०

**तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि । वायां चि उपाधि करिसी जना**
**भाव-बळें आकळे येरव्हीं नाकळे । कर-तळीं आंवळे तैसा हरि**
**पारयाचा रवा घेतां भूमीवरी । यत्न परोपरी साधन तैसें**
**ज्ञानदेवो म्हणे निवृत्ती निर्गुण । दीधलें संपूर्ण माझ्रां हातीं**

भक्तीशिवाय तीर्थ व्रत नेम आदि उपाधि च ठरूं पाहतात. भक्ति असेल तर देव म्हणजे तळहातावरचा आंवळा. भक्ति नसेल तर लाख प्रयत्न करून हि हातांत यायचा नाहीं. जसा जमिनीवर सांडलेला पारा. ज्ञानदेव म्हणतो, निवृत्तिदेवांनीं अति दुर्गम असें निर्गुण तत्त्व, ही भक्तीची वाट दाखवून , मला सुलभ करून दिलें.

११

**अनुभव-रहणीविण कायसें श्रवण । गर्भ-अंध नेणे रत्न-किरण**
**गेले मेले काय सांगाल गोष्टी । स्वयें आत्म-ज्ञानी घाली परमात्मीं मिठी**
**बाहेजु प्रवृत्ति अंतरीं निवृत्ति । उभयतां गति एक आहे**
**बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलेंसीं एकांतु । द्वैताद्वैत मातु उरे चि ना**

आचरणाशिवाय आणि अनुभवाशिवाय, केवळ श्रवणानें आत्म-ज्ञानाची गोडी कशी कळणार? जन्माचा आंधळा रत्नाची पारख काय करणार ?

पूर्वींच्या ज्ञानी पुरुषांच्या नुसत्या गोष्टी काय कामाच्या ? स्वतः आत्म-ज्ञान संपादन करून ईश्वर-चरणीं मिठी मारूं तेव्हां च खरें. बाहेर अखंड प्रवृत्ति चालू आहे, आंत अखंड निवृत्ति आहे, आणि दोन्ही मिळून स्थिति एक आहे, असें ज्ञानी पुरुषाचें जीवन असतें. त्याचा नेहमीं ईश्वराशीं च एकान्त असतो. कर्म करतांना द्वैत आणि चिंतन-कालीं अद्वैत असा भिन्न अनुभव त्याला नाहीं. म्हणून द्वैत अद्वैत या शाब्दिक चर्चेला तेथें अवकाश च नाहीं. हें सारें प्रत्यक्ष अनुभवाशिवाय कसें कळणार?

## १२

**वेद-वाणी चांग स्मरतां स्मरण । नित्य नारायण हृदयीं वसे**
**तेथील गह्वर जाणे तो विरळा । ब्रह्मीं ब्रह्म-कळा साधु-मुखें**
**जाप्य जप होम विधि विधान हरि । हृदयीं श्रीहरि न कळे मूढा**
**ज्ञानदेवो म्हणे श्रीहरि हृदय-स्थ । ऐसी आहे भाष वेद-शास्त्रीं**

वेदाध्ययन उत्तम झालें, हें कशावरून ओळखावयाचें ?—नारायणाचें हृदयांत निरंतर स्मरण राहूं लागलें म्हणजे. जप जाप्य होम आदि, हें कांहीं वेद-रहस्य नाहीं. उलट, हृदयांत हरि जागला, म्हणजे या सर्वांची आवश्यकता च तो हरीत असतो. ब्रह्मांत स्थिर राहून जीवन ब्रह्म-मय करण्याची कला साधणें, हें वेद-रहस्य साधु-मुखानें कळत असतें. हृदयांतील हरीला जागविण्यासाठीं च तर वेदादिकांचा जन्म आहे !

१३

**भावेंविण भक्ति भक्तीविण मुक्ति । बळेंविण शक्ति बोलों नये**
**कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहें निवांत शिणसी वायां**
**सायास करिसी प्रपंच दिन-निशीं । हरीसि न भजसी कोण्या गुणें**
**ज्ञानदेवो म्हणे हरि-जप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचें**

श्रद्धेशिवाय भक्ति नाहीं, आणि भक्तीशिवाय मुक्ति नाहीं. बल-संपादना-शिवाय शक्ति कुठून येणार ? धडपड सोडून, निवांत होऊन रहा. म्हणजे देवता कशी त्वरित प्रसन्न होते हें कळेल. तुझी धडपड चालली आहे साधनेच्या नांवावर. पण आहे ती संसाराची च. कारण तींत भक्तीचा ओलावा नाहीं. म्हणून तूं श्रद्धापूर्वक हरीचा ध्यास घे. म्हणजे संसाराचें धरणें तुटेल, आणि साधनेची धडपड हि जिरेल.

## अध्याय २

१४

**शांति क्षमा दया निवती निर्व्यंग । होउनी सर्वांग आत्मा भोगीं**
**नाहीं अंतराय सर्व हि चैतन्य । चिदानंदघन बिबलेंसे**
**मायिक वृत्तीचा झणें धरिसी संग । इंद्रियांचा पांग सांडीं रया**
**ज्ञानदेवो म्हणे कल्पना काजळी । दीपीं दीप-मेळीं पाजळीं वो जगीं**

शांति क्षमा दया यांची उत्तम परिपक्वता संपादन कर. आणि पुढें, त्यांची वाफ जिरल्यावर, खुशाल विश्वात्मैक्याचा आनंद भोगीत रहा. बाधा कांहीं च नाहीं. कारण हें सर्व सहज च चिदानंद-रूप आहे. मायेच्या मोहांत सांपडून, गाफिलपणानें इंद्रियांच्या अधीन होऊं नकोस म्हणजे झालें. कल्पनेची काजळी काढून टाक. आणि दिव्याला दिवा लावून, सारें जग उज्ज्वल कर.

१५

गुरु-लिंग जंगम । तेणें दाविला आगम रे
एकाग्र करीं मन । तेणें होईल समाधान रे

जवळीं असतां जग-जीवन । कां धांडोळीसी वन रे
सांडीं अभिमान । सम धरितां ब्रह्म-ज्ञान रे

अहं-भाव करीं सम । तेणें पावसी विश्राम रे
इतुलें देईं कृपा-दान । तेणें घडेल अमृत-पान रे

क्षुधा-तृषा हरे । निज-भाव जेणें तरे
तें जीवन दीधलें । बाप रखुमादेवी-वरें

ज्ञानदेवाला एकदां एक जंगम गुरु भेटला होता. त्यानें आपल्या शास्त्राचें सार थोडक्यांत सांगितलें, तें असें: " मन एकाग्र कर. वन धुंडाळूं नको, कारण देव जवळ च आहे. अभिमान सोडून दे, अथवा सर्वांविषयीं तो समान राख. एवढ्यानें तुझी सारी तळमळ शांत होऊन तूं प्रकृतीला तरून जाशील, आणि तुला अमृत-जीवन लाभेल."

१६

अरे मना तूं पापिष्ठा । किती हिंडसी रे नष्टा
सैरा शिणसी रे फुकटा । विठ्ठलीं विनटा स्थिर होईं

तूं अनिवार नावरसी । तुझेनि संगें नाडले ऋषि
तूं तंव अपभ्रंशीं पाडिसी । म्हणोनि गेले गुरूसि शरण

**न संडीं हरि-चरण । नाहीं नाहीं जन्म-मरण**
**अवीट सेवीं नारायण । तेणें मी-तूंपण एक सिद्ध**

**ज्ञानदेव शरण हरी । मन हिंडे चराचरीं**
**न संडीं चरण अभ्यंतरीं । नित्य श्रीहरि हृदयीं वसे**

द्वाड मन उगीच सैरावैरा भटकत राहतें. मोठ्या-मोठ्यांना हि आवरत नाहीं. म्हणून शेंवटीं गुरूस च शरण जावें लागतें. मन जर कोण्या उपायानें हरि-चरणीं स्थिर होईल, आणि तिथली अवीट गोडी चाखील, तर सारें च काम होईल. कारण, मग मी-तूं-पणा च उरणार नाहीं. पण हें सहसा जमत नाहीं.

त्यासाठीं ज्ञानदेवानें एक निराळी च युक्ति सुचविली आहे. ज्ञानदेव म्हणतो, मनाला सृष्टीमध्यें हिंडूं द्यावें आणि स्वतः साक्षिरूपानें मनाहून अलग होऊन हरि-शरण रहावें. आंतली हरीची गांठ पक्की असल्यानंतर, मनाला बाहेर हिंडूं देण्यानें मनाची शक्ति जगत्-सेवेकडे, आणि तदुपयोगी ज्ञान-संपादनाकडे, सहज च राबवतां येते.

## १७

**मन मुरे मग जें उरे । तें तूं कां रे सेविसी ना**
**दिसतें परी न धरवे हातें । तें संतातें पुसावें**
**तेथींची खूण विरळा जाणे । निवृत्ति-प्रसादें ज्ञानदेवो म्हणे**

मनांतील भावनांच्या गोडींत च माणूस रमतो. पण त्या भावनांसकट तें मन मुरलें म्हणजे जें कांहीं उरतें त्याची गोडी विशेष च आहे. हें लक्षांत तर येतें, पण तितका धीर हि धरवत नाहीं आणि साधन हि करवत नाहीं. म्हणून संतांची सेवा करून त्यांना विचारावयास पाहिजे. निवृत्तिनाथांची कृपा लाभलेला ज्ञानदेव हें स्वानुभवानें सांगत आहे.

१८

वृत्तीसहित मज लपवीं । माझें मन चरणीं ठेवीं
निवृत्ति पदोपदीं गोवीं । तूं गोसावी दीनोद्धरण

कर-चरणेंसीं इंद्रिय-वृत्ति । तुझां ठाईं तूं चि हों तीं
माझी उरों नेदीं कीर्ति । हें दान श्रीपति मज द्यावें

शांति दया क्षमा ऋद्धि । हें हि पाहतां मज उपाधि
तुझेया नामाची समाधि । कृपा-निधी मज द्यावी

ज्ञानदेवें घेतलें दान । हृदयीं धरूनियां ध्यान
समाधी बैसला निर्वाण । कथा कीर्तन करीतु

ज्ञानदेव नाम-संकीर्तन करीत करीत निकराची समाधि लावून बसला. त्या वेळीं त्यानें हृदयांत ध्यान धरून देवापाशीं असें वरदान मागितलें :

"वृत्तींसकट माझा अहंकार लपूं दे. माझ्या प्रत्येक प्रवृत्तींत निवृत्तीचा ठसा उमटूं दे. माझें मन तुझ्या चरणीं राहूं दे. माझीं देहेंद्रियादि सर्व तूं च हो. माझी कीर्ति उरूं देऊं नको. दया-क्षमा-शांतिरूप ऋद्धि ही हि मला उपाधि वाटूं लागली आहे. म्हणून मला केवळ तुझ्या नामाची समाधि लाभूं दे.

## १९

**साउमा जंव जाये, तंव हृदयीं चि आहे ।**
**चित्त विकासूनि पाहें चित्तामाजीं**
**तंव चतुर्भुज हरि, हृदय-मंदिरीं । तया नमन करीं विज्ञानेंसीं**
**शांति धरुनी बाहीं, आपें आप पाहीं । मननीं निर्वाहीं न्याहाळिला**
**ज्ञानदेवा रूप, बिंबोनि समीप । प्रपंच दुःख-रूप सुख जालें**

ईश्वराचा शोध करीत करीत पुढें पुढें जावें, तर शेवटीं लक्षांत येतें कीं तो हृदयांत च आहे. म्हणून, तूं आतां बाहेरच्या शोधांत न पडतां, चित्ताचा विकास करून त्यांत च शोध घे. चित्त-चतुष्टयरूप चार भुजांनीं नटलेला तो प्रभु तुला हृदय-मंदिरांत विराजमान दिसून येईल. विज्ञानाचा अहंकार सोडून त्याच्या चरणीं लीन होऊन जा. चिंतनाची कड गांठून निरखिलेला तो च मग सहज शांतीनें अनायास दिसत राहील. ज्ञानदेवाच्या हृदयांत अगदीं जवळांत जवळ तें च रूप ठसावल्यामुळें, दुःख-रूप मानलेला प्रपंच त्याला सुखाचा झाला आहे.

## २०

**आम्ही संन्यासी संन्यासी । सदा राहों एकांतेंसीं**
**चित्त-चतुष्टय निरसिलें । अज्ञाना तिळोदक दिधलें**
**ब्रह्माऽहमस्मि शुद्ध ज्ञान । तेथील सांडिला अभिमान**
**रखुमादेवी-वरु विठ्ठलु हृदयीं । तो चि सबाह्य अभ्यंतरीं असे रया**

आम्ही नित्य-संन्यासी आहों. समाजांत असून हि एकांतांत राहतों. सोडायच्या वस्तु आंत च होत्या, त्या सर्व सोडल्या. चित्ताची संगत सोडली;

अज्ञानाचा संपर्क सोडला; सोहंतेचा हि अभिमान सोडला. आतां आंत आणि बाहेर ईश्वर च उरला. म्हणून सोडण्याची कल्पना हि सुटली.

## अध्याय ४

२१

**आरंभीं आवडी आदरें आलें नाम ।**
**तेणें सकळ सिद्धि जगीं जालें पूर्ण काम**
**राम कृष्ण गोविंद गोपाळा । तूं माय माउली जीवींचा जिव्हाळा**
**तुझेनि नामें सकळ संदेहो फिटला । बाप रखुमादेवी-वरा श्रीविठ्ठला**

प्रीतीनें आणि श्रद्धेनें ईश्वराचें नांव घेऊन शुभ कार्याचा आरंभ केला म्हणजे तें कार्य फळलें च पाहिजे. कारण ईश्वराच्या नांवानें बुद्धि निःशंक होते. आणि कर्मांत जिव्हाळा दाखल होतो. निःशंक बुद्धीनें आणि जिव्हाळयानें केलेलें कर्म कसें सिद्ध होणार नाहीं?

२२

**सकळ-मंगळ-निधि । विठ्ठलाचें नाम आधीं**
**म्हण कां रे जना म्हण कां रे जना । विठ्ठलाचें नाम वाचे**
**पतित-पावन साचें । विठ्ठलाचें नाम वाचे**
**बाप रखुमादेवी-वरु साचें । विठ्ठलाचें नाम वाचे**

ईश्वराचें नांव अवश्य पतिताला पावन करणारें आणि पुण्यवंताला मांगल्य देणारें आहे. मंगल-निधि च तें आहे. खऱ्या भावनेनें, समुदायासकट, कार्यारंभीं आणि सदा सर्व-काळ, घोकीत च रहावें.

## २३

**राम कृष्ण नामें इयें दोन्ही साजिरीं । हृदय-मंदिरीं स्मरें कां रे**
**आपुली आपण करीं सोडवण । संसार-बंधन तोडीं वेगीं**
**ज्ञानदेवा ध्यानीं राम-कृष्ण-माळा । हृदयीं जिव्हाळा श्रीमूर्ति रया**

राम आणि कृष्ण हीं देवाचीं दोन्ही नांवें फार सुंदर आहेत. एक सत्य-मूर्ति, एक प्रेम-मूर्ति. दोन्ही मिळून एक च. हृदय-मंदिरांत त्याची स्थापना कर. म्हणजे सर्व बंधनें तुटून तुझ्या च शक्तीनें तुझी मुटका होईल. ज्ञानदेव ध्यान करीत असतांना वाणीनें हीं नामें जपतो आणि हृदयांत उभय-रूप-मंडित श्रीमूर्तीचें चिंतन करतो.

## २४

**कर्माचिया रेखा नुल्लंघती अशेखा । म्हणोनि विशेखा केशव-सेवा**
**राम-कृष्ण-माळा घाल पां रे गळां । अखंड जीवन-कळा राम-जपें**
**करावा विचार धरावा आचार । घालावा परिकर राम नामीं**
**सकळांचा सकळीं तयातें आकळीं । जिह्वा हे वाचाळीं राम-रती**
**रिघें रे शरण तुज नाहीं मरण । ठाकिसी चरण विठ्ठलाचे**
**निवृत्ति-प्रसादें जोडे, विठ्ठल-नामें घडे । ज्ञानदेवो बागडे पंढरिये**

माणूस एकदां कर्म-विपाक-प्रक्रियेंत सांपडला म्हणजे पूर्णपणें सुटका कधीं च व्हायची नाहीं. ईश्वर-भक्ति कर्म-विपाकांतून सोडवते, ही च तिची विशेषता. अखंड कर्में करून कर्म-विपाकांतून अलिप्त राहणें ही मुख्य जीवन-कला आहे, आणि ईश्वराच्या नांवानें ती च साधत असते. म्हणून बाहेरून कर्म-योग आचरावा, आंतून निरंतर विचार करावा आणि राम-नामाची कास बळकट धरावी.

जो सगळ्यांचा आहे, आणि सगळ्यांमधें आहे, त्याचें आकलन व्हावयास पाहिजे. अर्थात् व्यक्तीचा अहंकार, व्यक्तीचें नांव, लोपलें पाहिजे. म्हणून वाणीला राम-नामाचा चाळा असूं दे. त्याला शरण जा. म्हणजे तुझें व्यक्तित्व लोपून तूं अमर होशील. निवृत्तीच्या प्रसादानें ज्ञान-देवाला हरि-नाम लाभलें. तो हरि-नामाला चिकटला, आणि आपलें व्यक्तित्व विसरून संत-समाजाशीं समरस झाला.

## २५

**देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं । तेणें मुक्ति चारी साधिलिया**
**हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी**
**असोनि संसारीं जिव्हे वेग करीं । वेद-शास्त्र उभारी बाह्या सदा**
**ज्ञानदेवो म्हणे व्यासाचिये खुणे । द्वारकेचे राणे पांडवां घरीं**

जो रोज क्षणभर तरी देवाच्या द्वारांत उभा राहतो तो मोक्षाभिमुख झाला. वाणी हें देवाचें द्वार होऊं शकतें. मनुष्याला संसारांत वागावें लागत असलें तरी वाणींत त्यानें संसार भरूं नये. वाणी हरी-नाम-स्मरणाकडे च योजावी. नाम-स्मरण करणाराला भगवान् वश होतो याविषयीं व्यासादिकांची साक्ष आहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि: ..........

२६

**एक तत्त्व नाम दृढ धरीं मना । हरीसि करुणा येईल तुझी**
**तें नाम सोपारें राम कृष्ण गोविंद । वाचेसीं सद्गद जपें आधीं**
**नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिका पंथा जासी झणें**
**ज्ञानदेवा मौन जप-माळ अंतरीं । धरोनि श्रीहरि जपे सदा**

तत्त्वज्ञानाच्या चर्चा कर-करून अनेकांनीं अनेक तत्त्वें शोधून काढलीं आहेत. पण नाम हें सर्व-श्रेष्ठ आणि सर्व-सुलभ तत्त्व आहे. म्हणून अन्य मार्ग सोडून अंतःकरणपूर्वक वाणीनें नाम जपत रहावें. ज्ञानदेव तर निरंतर अंतःकरणांत मौनानें च हरि-नाम जपत असतो.

२७

**सात-पांच-तीन-दशकांचा मेळा । एक तत्त्वीं कळा दावी हरि**
**तैसें नव्हे नाम सर्व मार्गीं वरिष्ठ । येथें कांहीं कष्ट न लगती**
**अजपा जपणें, उलट प्राणाचा । तेथें हि मनाचा निर्धारु असे**
**ज्ञानदेवा जिणें, नामेंविण व्यर्थ । राम-कृष्णीं पंथ क्रमियेला**

सांख्य-मार्गानें पंचवीस तत्त्वांचें विश्लेषण करावयाचें. पण इतकें हि करून शेंवटीं तत्त्व-सार-रूप हरि गांठला तर च ती विश्लेषणाची कला साधली म्हणावयाची. नाम-स्मरणांत ती कांहीं च भानगड नाहीं. कारण तेथें आरंभापासून च हरीशीं गांठ आहे.

योग-मार्गानें प्राण ऊर्ध्व-गामी करून अनाहत-स्वरूप अ-जपा जपावयाचा. पण तें हि मनाच्या आधाराशिवाय साधावयाचें नाहीं. नाम-स्मरणांत तर मनाचा निर्धार आधींचा च आहे.

म्हणून, नाम-स्मरण हा पंथ-राज आहे. त्याशिवाय जीवन व्यर्थ आहे.

२८

**काळ वेळ नाम उच्चारितां नाहीं । दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती**
**राम-कृष्ण-नाम सर्व दोषां हरण । जड जीवां तारण हरि एक**
**हरि-नाम सार, जिह्वा या नामाची । उपमा त्या दैवाची कोण वाणी**
**ज्ञानदेवा सांग जाला नाम-पाठ । पूर्व-जां वैकुंठ-मार्ग सोपा**

सर्व-सार-रूप हरि-नाम जिह्वेवर असणें यासारखें भाग्य नाहीं. त्याला कांहीं काळ-वेळेचें हि बंधन नाहीं. दोषापहारी असें तें हरि-नाम, गाणाऱ्या आणि ऐकणाऱ्या दोहोंचा हि उद्धार करणारें आहे. ज्ञानदेवाला सांगोपांग नाम-पाठ साधल्यामुळें त्याच्या पूर्वजांना, ऋषि-मुनींना हि, मोक्षाचा मार्ग सोपा झाला आहे. नाहीं तर, काय काय कठिण साधनें त्यांना करावीं लागत होतीं.

२९

**जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं । उच्चारणीं पाहीं मोक्ष सदा**
**नारायण हरि उच्चार नामाचा । तेथें कळि-काळाचा रीघ नाहीं**
**तेथील प्रमाण नेणवे वेदांसि । तें जीव-जंतूंसि केंवि कळे**
**ज्ञानदेवा फळ नाम हरि-पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असे**

हरिनाम-स्मरणांत जाणिवेला किंवा नेणिवेला विशेष किंमत नाहीं. मुख्य, भाव पाहिजे. भाव-पूर्वक हरि-नामाचें उच्चारण करीत गेल्यानें, न कळत हृदयाची शुद्धि होत च जाते. नाम-स्मरणाची ही जादू वेदांना हि पूर्णपणें आकलन झालेली नाहीं. मग सामान्य जीवाला ती कशी कळणार? नाम-स्मरणानें हें जग च वैकुंठ-स्वरूप, मोक्षधाम, होऊन जातें.

३०

अष्टांग-योगें न शिणिजे । यम-नियम-निरोध न कीजे रया
वाचा गीत गाइजे वाचा गीत गाइजे ।
गातां वातां श्रवणीं ऐकिजे रया
गीत-छंदें अंग डोलिजे । लीला-विनोदें संसार तरिजे रया
बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु नामें । जोडे हा उपावो कीजे रया

साधकाला यम-नियम-पूर्वक चित्ताचा निरोध करणें अगत्याचें असतें. त्यासाठीं अभ्यास-वैराग्य-युक्त अष्टांग-योग हा एक शास्त्रीय उपाय सांगितला आहे. पण योगानें साधणारें हें कार्य ईश्वर-प्रणिधानानें सुलभता-पूर्वक होतें, असें योगशास्त्र च सांगतें. म्हणून ज्ञानदेव म्हणतो, तुम्ही हरि-नाम गा, ऐका, त्यांत तन्मय व्हा आणि सहज मौजेनें संसार तरून जा. शास्त्रीय उपाय बिकट जातो, तर हा सुलभ उपाय तरी अवश्य करा.

## अध्याय ५

३१

अंड-ज जार-ज स्वेद-ज उद्भिज्-ज आटे । हरि-नाम नाटे तें बरवें
जें नाटे तें नाम चित्तीं । रखुमादेवी-पती विठ्ठलाचें
शरीर आटे संपत्ति आटे । हरि-नाम नाटे तें बरवें
रखुमादेवी-वराचें नाम नाटे । युगें गेलीं परी उभा विटे

शरीर जाईल, संपत्ति जाईल, सृष्टि जाईल, शेंवटीं काल हि जाईल. परंतु ईश्वराचें नांव जाणार नाहीं. कारण, सर्वांचा मूलाधार असा तो प्रभु आपल्या अधिष्ठानावर सनातन उभा च आहे. आणि तो आणि त्याचें नांव एक च आहेत.

## ३२

**सार सार सार विठोबा नाम तूझें सार**
**म्हणोनि शूळ-पाणि जपताहे वारंवार**

**आदि-मध्य-अंतीं निज-बीज ॐकार**
**ध्रुव-प्रह्लाद-अंबरीषीं मानिला निर्धार**

**भुक्ति-मुक्ति-शांति-सुख-दायक साचार**
**पतित अज्ञान जीव तरले अपार**

**दिवसेंदिवस व्यर्थ जात संसार**
**बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु आधार**

ईश्वराचें नांव साधनेला बीज-रूप असल्यामुळें आरंभापासून अखेर-पर्यंत सर्व च भूमिकांना आपापल्या परी उपयोगाचें आहे. म्हणून शंकरा-सारखे ज्ञानी, ध्रुव-प्रह्लादादिकांसारखे भक्त, आणि सामान्य अज्ञानी जीव, नामाचा आश्रय घेत असतात. आणि तें नाम त्यांच्या त्यांच्या वासनेप्रमाणें त्यांना त्यांना भुक्ति मुक्ति शांति आदि जें हवें असेल तें देत असतें.

पण एवढें तें सर्व-सार-रूप हरि-नाम दुर्लक्षून आम्ही आमचा संसार व्यर्थ घालवीत आहोंत. तर ज्ञानदेव म्हणतो, ईश्वरानें च आम्हांला आतां रक्षावें !

३३

**नित्य नेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मी-वल्लभ तयां जवळीं**
**नारायण हरि नारायण हरि । भुक्ति मुक्ति चारी घरीं तयां**
**हरीविण जन्म तो नरक चि पैं जाणा । यमाचा पाहुणा प्राणी होय**
**ज्ञानदेव पुसे निवृत्तीसि चाड । गगनाहूनि वाड नाम आहे**

ज्यांनीं आपलें जीवन च हरि-नामावर रचिलें आहे, नाम हा ज्यांना नित्य नेम झाला आहे, अशीं माणसें फार थोडीं. उलट विकारानें भरलेलीं, नाम-विहीन, मृत-प्राय जीवनें च पुष्कळशीं.

ज्ञानदेवानें एकदां निवृत्तिनाथांस विचारलें, "आकाश सर्वांहून व्यापक आहे. आकाशाहून काय व्यापक आहे ?" निवृत्तिनाथ म्हणाले, "आकाशाहून नाम व्यापक आहे."

३४

**जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वां घटीं राम भाव शुद्ध**
**न संडीं रे भावो टाकीं रे संदेहो । राम-कृष्णीं टाहो नित्य फोडीं**
**जात गोत वित्त कुल शील मात । भजें कां त्वरित भावना-युक्त**
**ज्ञानदेवा ध्यानीं राम-कृष्ण मनीं । तेणें वैकुंठ-भुवनीं घर केलें**

सर्व साधनेचें आणि धर्माचरणाचें फलित उच्च-नीच भाव जाऊन सर्वांघटीं राम दिसूं लागणें हें च आहे. तूं निःशंकपणें तें च धरून नामाचा ध्यास घे. जात, गोत, कुळ इत्यादि सर्व भेद-भाव विसरून तीव्रतेनें भक्ति-प्रेमाचा आश्रय कर म्हणजे इथल्या इथें च वैकुंठ निर्माण होईल.

३५

**त्रिवेणी-संगमीं नाना तीर्थें भ्रमी । चित्त नाहीं नामीं तरी ते व्यर्थ**
**नामासि विन्मुख तो नर पापिया । हरीविण धांवया न पवे कोणी**
**पुराण-प्रसिद्ध बोलिले वाल्मीक । नामें तिन्हीं लोक उद्धरती**
**ज्ञानदेवा म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा तयाचें कुळ शुद्ध**

नाम-विमुखता हें च खरें पाप असून, तें धुऊन काढण्यास कोणतीं हि तीर्थें उपयोगीं पडणार नाहींत. उलट, नाम-स्मरण असेल तर केवढ्या हि मोठ्या पापांतून उद्धार होऊं शकतो, हें वाल्मीकि आदींच्या उदाहरणांवरून स्पष्ट झालें आहे. म्हणून ज्ञानदेव म्हणतो, तुम्हीं आस्थेनें नाम घेत जा. म्हणजे तुमचें पाप तर नाहींसें होईल च, पण तुमच्या मागें तुम्ही एक विशुद्ध परंपरा निर्माण करून जाल.

३६

**भक्तीचें तें ज्ञान "वाचे नारायण । दया ते संपूर्ण सर्वां भूतीं"**
**ज्ञान नारायण ध्यान नारायण । वाचे नारायण सर्व-काळ**
**संसार-ग्रामीं नाम हें चि सांठा । पावाल वैकुंठा नामें एकें**
**निवृत्ति-निरूपण ज्ञानदेवा ध्यान । सर्वत्र नारायण एकरूप**

भक्ति-मार्गाचें थोडक्यांत लक्षण, 'मुखीं नारायणाचें नाम आणि हातीं भूत-दयेचें काम' असें करतां येईल. भक्तांचें ज्ञान, ध्यान, जप, 'नारायण' या एका शब्दांत येऊन जातात. नारायण ही नर-समुदायाची देवता आहे. म्हणून 'नारायण' हा भूत-दयेचा आनि समाज-सेवेचा उद्घोष आहे.

संकुचित भावनेनें संसारांत व्यक्तिगत धनादि-संचय करण्याची वृत्ति होत असते. परंतु नारायण-नाम, अर्थात् भूत-दया, हें च संसाराच्या गांवांत उपयोगीं पडणारें सर्वोत्तम धन आहे, असें निवृत्तिनाथांचें सांगणें आहे. आणि ज्ञानदेवाला तो च ध्यास लागलेला आहे.

३७

**चहूं वेदीं जाण साही शास्त्री कारण । अठरा हि पुराणें हरिसी गाती**
**मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडीं मार्गु**
**एक हरि आत्मा जीव शिव समा । वायां तूं दुर्गमा न घलीं मन**
**ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे**

वेदांत अनेक मार्ग सांगितले आहेत. शास्त्रांत अनेक दुर्गम चर्चा केल्या आहेत· पुराणांत अनेक कथा भरल्या आहेत. त्या सर्वांचें नवनीत ईश्वर-दर्शन हें च आहे. एक च परमेश्वर आत्मरूपानें नटला आहे. जीव हि तो च आहे, आणि शिव हि तो च आहे. तो च घनदाट सर्वत्र भरला आहे. एवढें पाठ कर आणि बाकी सारें खुशाल विसरून जा.

३८

**हरि उच्चारणीं अनंत पाप-राशि । जातील लयासि क्षण-मात्रें**
**तृण अग्नि-मेळें समरस जालें । तैसें नामें केलें जपतां हरि**
**हरि-उच्चारण मंत्र हा अगाध । पळे भूत-बाधा भेणें तेथें**
**ज्ञानदेवो म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां**

हरि म्हटलें कीं सर्व पापें क्षणांत हरलीं. हरि-नामाच्या मंत्रापुढें भूत-बाधा टिकूं च शकत नाहीं. कारण भौतिक सृष्टीला च आत्मिक स्वरूप देणारा तो मंत्र आहे. त्याचें सामर्थ्य अगाध आहे. त्याच्या खोलीचें माप काढतां न आल्यामुळें ‘ नेति नेति ’ म्हणून उपनिषदांना हि मौन पतकरावें लागलें आहे.

अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................

३९

**सर्व व्यापक सर्व देहीं आहे । परि प्राणियांसि सोये न कळे तयाची**
**परमार्थ तो कडू विषय तो गोडु । तया अवघडु संसार**
**नामाचें साधन जिह्व लावी बाण । तया अनुदिनीं जवळीं वसे**
**धारणा धीट जरि होये विनट । तया प्रेम वैकुंठ जवळीं असे**
**ज्ञानियासि ज्ञान ज्ञानदेवीं ध्यान । कलि-मल-च्छेदन नाम एक**

हरि सर्व-व्यापक आणि सर्व देहांत विराजमान आहे. पण तें माणसाच्या लक्षांत येत नाहीं. आणि तो आपल्या एका देहांत च गुंतून बसतो. मग पर-मार्थ कडू वाटतो आणि स्वार्थ गोड वाटतो. तसें झालें म्हणजे परस्पर-विरोधी स्वार्थांचा झगडा लागून संसार अवघड होऊन बसतो. जिह्वा-रूप धनुष्याला हरिनामाचा बाण लावून तन्मयतेनें वेध घेतला म्हणजे तें व्यापक तत्त्व हस्त-गत होतें. अर्थात् ह्याला धाडसी आणि सुसज्ज अशी प्रतिभा लागते. पण ती असली म्हणजे व्यापक बुद्धि लाभून प्रेमरूप वैकुंठ अगदीं जवळ हृदयांत च दिसूं लागतो. अशा प्रकारें सर्व झगड्यांचें आणि पापांचें छेदन हरि-नामानें होत असतें. याचें ज्ञानी पुरुषांना ज्ञान आहे. आणि ज्ञानदेवाला ध्यान आहे.

## ४०

**समाधि-साधन, संजीवन नाम । शांति दया, सम सर्वां भूतीं**
**शांतीची पैं शांति निवृत्ति दातारु । हरि-नाम-उच्चारु दिधला तेणें**
**यम-दम-कळा, विज्ञानेंसीं ज्ञान । परतोनि अज्ञान न ये घरा**
**ज्ञानदेवा सिद्धि-साधन अवीट । भक्ति-मार्ग नीट हरि-पंथीं**

परम शांति पावलेल्या निवृत्ति गुरूंनीं ज्ञानदेवाला हरि-नामाचा मंत्र दिला. आणि सांगितलें कीं " ईश्वर-प्राप्तीच्या सर्व मार्गांत नामस्मरणाचा हा मार्ग अत्यंत सरळ आणि नेमका आहे. स्थिर-बुद्धि-रूप समाधि, कर्म-योगाची साधना, दया-शांति आदि दैवी संपत्तीचे गुण, सर्वांभूतीं समत्व-रूप भक्ति, यम-दमादि योग, शेवटीं अज्ञानाचें निरसन करणारें ज्ञान-विज्ञान, एकूण सर्व साधन आणि सिद्धि, हरि-नामांत सामावली आहे. हरि-नाम ही नव-जीवन देंणारी मधुर संजीवनी च आहे."

## ४१

**एक नाम हरि द्वैत-नाम दूरी । अद्वैत कुसरी विरळा जाणे**
**सम-बुद्धी घेतां समान श्रीहरि । यम-दमा वैरी हरि जाला**
**सर्वां घटीं राम देहा-देहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्र-रश्मि**
**ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ-नेमा । मागिलिया जन्मां मुक्त जालों**

एक हरीचें नांव घेतलें म्हणजे दुसरें नांव घ्यायला उरत च नाहीं. हरि-नामांतली ही अद्वैताची खुबी एखादा च जाणतो. सम-बुद्धीनें हरि-नाम घ्यावें आणि सर्वत्र हरि समान भरलेला पहावा. मग तो हरि यम-दमांचा जणूं वैरी च बनतो. कारण, ' यम म्हणे काय यमावें । दम म्हणे कवणातें

दमावें ' अशी स्थिति तो करून टाकतो. सूर्य सहस्र किरणांनीं त्रि-भुवन व्यापतो. तसा आत्मा-राम सर्व देहांना व्यापून आहे. ज्ञानदेवाला हरिपाठाच्या नियमानें एवढें दर्शन करवून दिलें. परिणाम हा झाला कीं त्याचे पुढचे सर्व जन्म कापले गेले.

## ४२

**सर्व-सुख-गोडी सर्व-शास्त्र-निवडी । रिकामा अर्ध घडी राहूं नको**
**लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येर-जार हरीविण**
**नाम-मंत्र जप कोटि जाईल पाप । कृष्ण-नामीं संकल्प घालुनि राहें**
**निज वृत्ति काढीं सर्व माया तोडीं । इंद्रियां सवडी लपों नको**
**तीर्थ-व्रतीं भाव धरीं रे करुणा । शांति दया, पाहुणा करीं**
**ज्ञानदेवीं प्रमाण निवृत्ति-देवीं ज्ञान । समाधि संजीवन हरि-पाठ**

आतां तुला सर्व जीवन-शास्त्र संक्षेपानें सांगतों. पहिली गोष्ट म्हणजे एक क्षणभर हि रिकामा राहूं नको. संसाराला भलतें च महत्त्व देऊं नको. नामा-विषयीं संकल्प दृढ राख. अहंता आणि ममता सोड. इंद्रियांचे लाड करूं नको. तीर्थ-व्रतादि साधन-मार्गाविषयीं आस्था बाळग. दया, क्षमा आणि शांति यांना विसरूं नको. आला अतिथि हरि च समज.

निवृत्तिदेवाची ही शिकवण आहे आणि ज्ञानदेवाला ती प्रमाण आहे. सर्व शास्त्रांचें रहस्य आणि सर्व सुखाचें सार तींत सांठवलें आहे. हरिपाठाचे हे सहचारी भाव असल्यामुळें, तो समाधि-संजीवन च झाला आहे.

## अध्याय ६

### ४३

संत भेटती आजि मज । तेणें जालों चतुर्भुज
दोन्ही भुजा स्थूळीं सहज । दोन्ही सूक्ष्मीं वाढलिया

आलिंगनें सुख वाटे । प्रेमें चिदानंद गोठे
हर्षें ब्रह्मांड उतटे । समूळ उठे मी-पण

या संतांपरिस उदार । त्रि-भुवनीं नाहीं थोर
मायबाप सहोदर । इष्ट मित्र सोयरे

कृपा-कटाक्षें न्याहाळिलें । आपुले पदीं बैसविलें
बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलें । भक्ता दिधलें वरदान

संतांच्या भेटीनें ज्ञानदेवाला सुख, प्रेम, आनंद, हर्ष, इतका वाटतो कीं त्यामुळें त्याचें मीपण च लयाला जातें. त्यांना मिठी मारतांना त्याला दोन स्थूल बाहु अपुरे पडतात, आणि मदतीला हृदयांतून जणूं दोन सूक्ष्म बाहु आणिक निर्माण होतात ! अर्थात् संतांच्या भेटीनें जीवाचें जीवत्व लोपून त्याला चतुर्भुज ईश्वराची पदवी जणूं प्राप्त होत असते ! याहून अधिक थोरवी ती काय असूं शकते ? पण ह्यांत नवल कांहीं च नाहीं. कारण, 'तुमच्या कृपा-कटाक्षानें जीवाला निज-पद लाभेल' असें देवानें संतांना वरदान च देऊन ठेवलें आहे.

४४

पूर्वजन्मीं सुकृतें थोर केलीं । तीं मज आजि फळासि आलीं
परमानंदु आजि मानसीं । भेट जाली या संतांसीं

माय बाप बंधु सखे सोयरे । यांतें भेटावया मन न धरे
एक एका तीर्थांहूनि आगळे । तयांमाजीं पर-ब्रह्म सांवळें

निर्धनासि धन-लाभु जाला । जैसा अ-चेतनीं प्राण प्रगटला
वत्स विघडलिया धेनु भेटली । जैसी कुरंगिणी पाडसा मीनली

हें पीयूषापरते गोड वाटत । पंढरिरायाचे भक्त भेटत
बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलें । संत भेटतां भव-दुःख फीटलें

संतांची भेट थोर पूर्व-पुण्यानें लाभत असते. त्यांच्या भेटीचा आनंद सामान्य नव्हे. कारण, भव-दुःख च त्यानें फिटत असतें. सर्व च नातीं संतांच्या ठिकाणीं एकवटल्यासारखीं होतात. ते खऱ्या अर्थानें तीर्थ-रूप आहेत. कारण, सगुण परमेश्वर त्यांच्या ठिकाणीं प्रगट आहे. ज्ञानदेवाला संतांच्या भेटीचें सौख्य वर्णावयाला उपमा अपुऱ्या पडतात.

४५

आले हरीचे निवट । वीर विठ्ठलाचे सुभट
भेणें जाले दिग्-पट । पळती थाट दोषांचे

सतत कृष्ण-मूर्ति सांवळी । खेळे हृदय-कमळीं
शांति क्षमा तयांजवळीं । जीवेंभावें अनुसरलिया

सहस्र-नामांचें हतियेर । शंख-चक्रांचे शृंगार
बळ वैराग्याचें थोर । केला मार षड्-वर्गा

ऐसे एकांग वीर । विठ्ठल रायाचे डिंगर
बाप रखुमादेवी-वर । तिहीं निर्धारीं जोडिला

भगवद्-भक्त हे खरे झुंजार आहेत. त्यांच्यासमोर दोषांचे समूह नागवे होऊन पळतात. अर्थात् दोषांचें यथार्थ स्वरूप भक्तांसमोर प्रगट होत असतें. त्यांच्या हृदयांत ईश्वराचें सतत चिंतन असल्यामुळें शांति आणि क्षमा त्यांना नेहमीं साथ देत असतात. हरि-नाम हें त्यांचें हत्यार. ईश्वराचे अंकित होऊन त्याचें वैभव वाढविणें हा त्यांचा शृंगार. आणि वैराग्य हें त्यांचें बल. त्यामुळें षड्-रिपूंचा त्यांच्यापुढें टिकाव च नाहीं. असे हे निश्चयी वीर ईश्वराला जिंकून घेतात यांत नवल कसलें ?

४६

शर्करेची गोडी निवडावया भले । साधु निवडिले सत्-संगती
सत्-संग प्रमाण जाणावया हरि । येर ते निर्धारीं प्रपंच-जात
भानु-बिंब पहा निर्मळ निराळ । अलिप्त सकळ तैसे साधु
ज्ञानदेवो हरि जपोनि निर्मळ । सदा असे सोज्वळ निवृत्ति-संगें

साखरेच्या गोडीची पारख साखरेच्या रसिकांनीं च करावयाची; तशी साधुत्वाची कसोटी संतांशिवाय कोण करणार ? कसोटीस उतरलेल्या सत्पुरुषाच्या संगतीनें च हरीची लब्धि व्हावयाची. इतर हिणकसांच्या संगतींत संसार वाढावयाचा. सत्पुरुष सूर्य-बिंबासारखे स्वयं-प्रकाशी आणि

सोज्वळ, सर्वांना प्रकाश देणारे; पण सर्वांहून उंच आणि वेगळे, निर्मळ आणि निर्लिप्त असतात. निवृत्तिनाथांच्या संगतींत ज्ञानदेवाला हा अनुभव आला आहे.

४७

**आम्ही कापडी रे आम्ही कापडी । पापें बारा वाटां पळती बापुडीं रे**
**समता कावडी रे समता कावडी रे । माजीं नामामृत भरिलें आवडीं रे**
**न लगे दंडणें रे न लगे मुंडणें रे । नाम म्हणूनि कर्माकर्म खंडणें रे**
**दुःख फीटलें रे दुःख फीटलें रे । बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलें रे**

आम्ही निरंतर हिंडणारे यात्रेकरू आहोंत. पापांची आम्हांला भीति नाहीं. उलट पापें च आम्हांला भीत असतात. आम्ही समतेची कावड वाहत असतों, जी नामामृतानें भरलेली असते. आम्हांला अवांतर तपस्येची गरज नाहीं. कर्म करावें कीं करूं नये, कोणतें करावें आणि कोणतें करूं नये— हे प्रश्न आम्हीं देवावर सोंपविले आहेत. त्यामुळें आमच्या दुःखाची समाप्ति झाली आहे.

४८

**योगयाग विधि येणें नव्हे सिद्धि । वायांचि उपाधि दंभ-धर्म**
**भावेंविण न कळे निःसंदेह । गुरूविण अनुभव कैसा कळे**
**तपेंविण दैवत दिधलियाविण प्राप्त । गुजेंविण हित कोण सांगे**
**ज्ञानदेव सांगे दृष्टान्ताची मात । साधूचे संगती तरणोपाव**

संत-संगतीची अपेक्षा न ठेवतां स्वतंत्रपणें योगादि साधन करूं जावें तर कांहीं तरी वाकडें च घडतें. उघड च आहे, भावाशिवाय देव, गुरू-शिवाय साक्षात्कार, तपाशिवाय देवतेची कृपा आणि प्रेमाशिवाय हिताची

गोष्ट कुठून लाभणार ? म्हणून ज्ञानदेवानें तर खूण-गांठ बांधून ठेवली आहे कीं सत्संगतीशिवाय तरणोपाय च नाहीं.

४९

**संतांचे संगती मनो-मार्गे गति । आकळावा श्री-पति येणें पंथें**
**राम-कृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जपें**
**एक तत्त्व नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे**
**नामामृत-गोडी वैष्णवा लाधली । योगियां साधली जीवन-कळा**
**सत्वर उच्चार प्रह्लादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्ण दाता**
**ज्ञानदेवो म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे**

लोक विचारतात, "भक्तांच्या संगतींत कार्यक्रम काय ?" स्थूल कार्यक्रमासाठीं भक्तांच्याकडे जावयाचें नसतें. तेथला कार्यक्रम मुख्यतः मानसिक असतो. त्यांची स्थूल भासणारी क्रिया हि मानसिक अर्थानें भरलेली असते. ते नाम-स्मरण करतांना दिसतील. पण नाम हें त्यांना केवळ शब्द नाहीं. तो त्यांच्या जिवाचा भाव आहे. तें त्यांना एक तत्त्व आहे. किंबहुना तें त्यांचें एक च एक तत्त्व आहे. त्या नादांत त्यांची सर्व साधना चाललेली असते.

योग्यांना जीवनाची कला साधलेली असते. स्थूल कार्य-क्रम हि त्यांचा आंखल्यासारखा दिसेल. भक्तापाशीं नामामृताची गोडी असते. तींतून सर्व कार्य-क्रम आपोआप सुचतो. दोन्ही वस्तुतः एक च आहेत. कारण, दोघांना हि द्वैत माहीत च नाहीं. प्रह्लादाच्या ठिकाणीं नाम-स्मरणाचा उत्कर्ष दिसतो, तर उद्धवाला योगेश्वर कृष्ण गुरु लाभला. त्याच्या कृपेनें तो योगी झाला. दोघांनीं मुक्काम एक च गांठला.

दोहोंत फरक सांगायचा तर इतका च सांगतां येईल कीं योगाचा मार्ग कठिण आहे, नाम-स्मरणाचा सुलभ आहे. पण तो स्वतः सुलभ असला तरी त्याचा जिव्हाळा वाटणारा मनुष्य दुर्लभ च आहे !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नों: दि: ................

## ५०

**साधु-बोध जाला तो नुरोनियां ठेला । ठाईं चि मुरालें अनुभव
कापुराची वाती उजळली ज्योति । ठाईं चि समाप्ति जाली जैसी
मोक्ष-रेखे आला तो भाग्यें विनटला । साधूचा अंकिला हरि-भक्त
ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं । हरि दिसे जनीं वनीं आत्म-तत्त्वीं**

ज्याला साधु-मुखानें बोध लाभला तो वेगळेपणानें उरत च नाहीं. विश्वाशीं एकरूपता अनुभवतो. पुढें अनुभवापुरतें हि द्वैत न उरून त्याचा तो अनुभव हि जिरून जातो. अग्नि कापराला जाळून टाकतो आणि मग आपण हि नाहींसा होतो. साधूचा सेवक मोक्षाची पदवी मिळवितो, आणि मग ती हि पदवी सोडून हरि-भक्त होऊन राहण्याचें भाग्य मिरवितो. ज्ञानदेवाला अशा सज्जनांच्या संगतीची गोडी लागली. त्यामुळें त्याला समाजांत, सृष्टींत, आणि स्वतःच्या हृदयांत, हरि च हरि दिसतो.

## अध्याय ७

५१

**श्रीगुरूसारिखा असतां पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी**
**राजयाची कांता काय भीक मागे । मनाचेया जोगें सिद्धि पावे**
**कल्प-तरू तळवटीं बैसला जो कोणी । काय तयासी वाणी सांगिजो जी**
**ज्ञानदेव म्हणे तरलों तरलों । आतां उद्धरलों गुरु-कृपा**

अनुभवी गुरूपासून ज्याला शिक्षण मिळालें तो पूर्ण स्वावलंबी झाला. कारण, त्याच्या ज्ञानांत कांहीं च शंका किंवा कचरटपणा उरलेला नसतो. तो स्वतंत्र प्रज्ञेनें जी जी कल्पना करील ती जगांत सिद्ध व्हायला च पाहिजे. त्याच्या प्रतिभेंत कशाची च वाण नाहीं. ज्ञानदेव म्हणतो, गुरु-कृपेनें मनुष्य इतका उंच चढतो.

५२

**देव करी तरी काय न होई । दगडाचेनि नई तरिजेल**
**सूर्य-किरणांवरी मुंगियांची हारी । अग्नीचां पाठारीं पीक होय**
**फुटोनियां पाय चालतील भिंती । मेरु मशक येती सम तुका**
**ज्ञानदेवो म्हणे अघटित घडे । गुरु-कृपा जोडे पर-ब्रह्म**

ईश्वर करील तर काय होणार नाहीं? त्याच्या इच्छेनें दगड नदीला तरून जातील. मुंग्या सूर्य-किरणांवर चढतील. अग्नि-कुंडांत पिकें पिकतील. भिंतीला पाय फुटतील. मशक मेरूची बरोबरी करतील.

ईश्वराचें हें अघटित सामर्थ्य आपण कल्पूं शकतों. गुरु-कृपेचें सामर्थ्य हि तसें च आहे. कारण, त्यानें तुच्छ मानलेला जीव हि पर-ब्रह्म-पदवी गांठूं शकतो.

## ५३

**चित्रीं सूर्य-बिंब काढूं येईल चांग । प्रकाशाचें अंग काढितां न ये**
**संन्यासाचें सोंग आणूं येईल सांग । वैराग्याचें अंग आणितां न ये**
**ब्रह्म-ज्ञान मुखें बोलूं येईल सांग । अनुभवाचें अंग आणितां न ये**
**ज्ञानदेवो म्हणे गुरु-कृपा सांग । तरी च्चि हें भाग्य येईल हातां**

चित्रांतला सूर्य प्रकाश देऊं शकत नाहीं. वैराग्य-शून्य संन्यास किंवा अनुभव-शून्य ब्रह्म-ज्ञान यांची ती च गत आहे. अनुभवी गुरूंच्या मार्ग-दर्शनाखालीं ज्यांनीं सांगोपांग साधना केली आहे, त्या भाग्यशाली पुरुषांना च प्रखर-वैराग्य-युक्त संन्यास आणि अनुभवाचें ब्रह्म-ज्ञान लाभत असतें.

## ५४

**गुरु हा संत-कुळींचा राजा । गुरु हा प्राण-विसांवा माझा**
**गुरूविण देव दुजा । पाहतां नाहीं त्रैलोक्यीं**

**गुरु हा सुखाचा सागरु । गुरु हा प्रेमाचा आगरु**
**गुरु हा धैर्याचा डोंगरु । कदा काळीं डळमळी ना**

**गुरु हा वैराग्याचें मूळ । गुरु हा पर-ब्रह्म केवळ**
**गुरु हा सोडवी तात्काळ । गांठ लिंग-देहाची**

**गुरु हा साधकांसि साह्य । गुरु हा भक्तांलागीं माय**
**गुरु हा काम-धेनु गाय । भक्तां घरीं दुभतसे**

**गुरु हा घाली ज्ञानांजन । गुरु हा दाखवी निज-धन**
**गुरु हा सौभाग्य देऊन । साधु-बोध नांदवी**

**गुरु हा भक्तीचें मंडण । गुरु हा दुष्टांचें दंडण**
**गुरु हा पापाचें खंडण । नानापरी वारीतसे**

**काया काशी गुरु उपदेशी । तारक मंत्र दिधला आम्हांसि**
**बाप रखुमादेवी-वरासि । ध्यान मानसीं लागलें**

अनुभवी सद्गुरु ज्या शिष्याला लाभला, त्याला तो सर्व संतांहून थोर आहे. कारण, बाकीचे संत मेघ-वृष्टीनें सर्वसामान्य उपदेश करणारे असतात. पण गुरु, शिष्याची भूमिका लक्षांत घेऊन पहिल्यापासून अखेर-पर्यंत त्याला मार्ग-दर्शन करीत असतो. जणूं काम-धेनू च त्याची तो असतो.

प्राथमिक अवस्थेंत तो त्याला सुख, प्रेम आणि धैर्य देतो. पुढें त्याचें वैराग्य जागृत करून त्याच्या वासनेच्या गांठी सोडवतो. मग त्याच्या डोळ्यांत ज्ञानांजन घालून त्याला आत्म्याचें दर्शन घडवितो. शेंवटीं त्याचा बोध स्थिर करून त्याच्याकडून धर्म-संस्थापनेचें कार्य करवितो.

अशा समर्थ गुरु-रूप शिव-मूर्तीनें काया-रूप काशीक्षेत्रांत ज्ञानदेवाच्या कानांत विश्वोद्धाराचा तारक मंत्र सांगितला. आणि बघतां बघतां ज्ञानदेवाची त्या विचारांत समाधि लागली.

## ५५

**सकळ तीर्थें निवृत्तीचां पाईं । तेथें बुडी देईं माझे मना**
**आतां मी न करी चित्ताचें भ्रमण । वृत्तीसि मार्जन केलें असे**
**एकार्णव जाला तरंगु बुडाला । तैसा देह जाला एक-रूप**
**रखुमादेवी-वरें नवल पैं केलें । तारूं हारविलें मृग-जळीं**

सद्-वृत्ति ही शिष्याची योग्यता, आणि वृत्ति-रहितता हें गुरूचें लक्षण. अशा निवृत्ति-रूप गुरूच्या चरणीं शिष्याचीं सर्व तीर्थें, त्याची सर्व साधना सामावलेली आहे. ज्ञानदेवाचा संकल्प आहे कीं त्या च एका तीर्थांत डुबकी मारायची, आणि अवांतर कोणत्या हि साधनांच्या जोजारांत चित्ताला भ्रमूं द्यायचें नाहीं.

या त्याच्या संकल्पानें त्याच्या सर्व वृत्तींचें परिमार्जन झालें. तो निवृत्ति-स्वरूप बनला. जणूं प्रलय-काळचा सर्वत्र पसरलेला एक च समुद्र ! साऱ्या लाटा लीन झालेल्या ! तसा च त्याचा देह हि निवृत्तींत मिसळून गेला. देवानें काय गंमत केली ! मिथ्या संसाराला तरून जाण्यासाठीं साधनेंचें मोठें जहाज सजविलें होतें, तें त्या मृगजळांत च हरवलें. अर्थात् संसाराचें मिथ्यात्व कळल्यानंतर साधना हि मिथ्या ठरून तिची गरज संपली.

## ५६

**सम सुख शेज निजोनियां काज । साधिलेंसे बीज निवृत्ति-रायें**
**पृथ्वी-तळ शय्या आकाश प्रावरण । भूत-दया जीवन जीव-भूत**
**निजीं नीज आली हारपलिया कळा । ब्रह्मानंद-सोहळा गुरु-शिष्यीं**
**ज्ञानदेवा काज निरालंब रूप । तळीं वरी दीप सतेजला**

साधक भूत-दयेमुळें कर्म-योगांत प्रवृत्त झालेला असतो. त्याची सर्व प्रवृत्ति भूत-दयेच्या प्रेरणेनें चाललेली असते. जसजशी त्याची भूत-दया व्यापक आणि खोल होत जाते, तसतसें इतर जीवांपासून त्याचें अंतर तुटत जातें. अखेरीस सारे जीव आणि मी एक च, सर्वांचें सुख तें च माझें सुख, अशी प्रतीति येऊन तो जणूं सर्व भूतांचा जीव च बनतो. एवढ्या अनुभूतीनंतर सहज च स्थूल क्रिया लोपते, आणि कांहीं न करून हि सर्व घडवून आणण्याची शक्ति हातांत येते. हिला च अकर्मांत कर्म असें म्हणतात.

ही बीजरूप सिद्धि निवृत्तिनाथांना साधल्यामुळें निजून च त्यांचें सारें काम होतें. इतर जीवांहून जो अलगपणानें उरला च नाहीं, तो भूत-दयेची हालचाल तरी काय करणार ? भूतदया-रूप च तो झाला. मग पृथ्वी हें आंथरूण, आकाश पांघरूण आणि सर्व भूतांच्या सुख-साम्याची कल्पना-रूप झोंप घेणें हा च त्याचा कर्म-योग झाला. तो सर्व भूतांच्या निज-स्वरूपांत निजला. म्हणून विषमतेच्या सर्व कला सहज च लोपल्या. गुरु-शिष्य-भेद हि मावळला. अर्थात् ज्ञानाची देवघेव हि थांबून केवळ आनंद च उरला.

आतां नेहमींप्रमाणें भूत-दयेला क्रियेचें आलंबन नको. ज्ञानाला शब्दाचें आलंबन नको. खालीं ठाणवई आणि वर दिवा अशी गरज च नाहीं. खालीं दिवा आणि वर हि दिवा ! आलंबन-रहित दिवा च दिवा ! कल्पितां आला तर कल्पून घ्या !

# प्रकरण दुसरें : भक्ति

## अध्याय ८

५७

**रूप पाहतां लोचनीं । सुख जालें वो साजणी**
**तो हा विठ्ठल बरवा । तो हा माधव बरवा**
**बहुतां सुकृतांची जोडी । म्हणुनि विठ्ठलीं आवडी**
**सर्व सुखाचें आगर । बाप रखुमादेवी-वर**

विठ्ठलाच्या दर्शनानें डोळ्याला किती सुख होत आहे! पण त्यांत नवल कांहीं च नाहीं. माधव आहे च तसा सुंदर ! सर्व सुखाचें आगर च आहे तो! नवल हें च आहे कीं सर्वांना त्याच्या दर्शनानें असा आनंद होत नाहीं. पण यांत हि नवल नाहीं. कारण या आनंदाचें अधिष्ठान केवळ ती बाह्य मूर्ति नाहीं. हृदयांतील प्रेम आहे. ईश्वराविषयीं असें प्रेम अनेक जन्मांच्या पुण्याईनें च लाभत असतें.

## ५८

**बरवा वो हरि बरवा वो । गोविंद गोपाळ गुण-गरुवा वो**
**सांवळा वो हरि सांवळा वो । मदन-मोहन कान्हो गोवळा वो**
**पाहतां वो हरि पाहतां वो । ध्यान लागलें या चित्ता वो**
**पढिये वो हरि पढिये वो । बाप रखुमादेवी-वरु घडिये वो**

ज्ञानदेव ईश्वराच्या मूर्तीचें ध्यान करीत आहे. मूर्तीचें सौंदर्य तर मोहक च आहे. पण तें ईश्वराच्या अनंत गुणांचें प्रतिबिंब-मात्र आहे, छाया-स्वरूप आहे. म्हणून संकेत ओळखून सौंदर्य-द्वारा मंगल गुणांच्या चिंतनांत चित्ताला लावायचें असतें. तसें केल्यानें ईश्वराविषयीं प्रेम वाढून तो त्याच्या गुणांसकट हृदयांत जडून जातो.

## ५९

**रुणु-झुणु रुणु-झुणु रे भ्रमरा । सांडीं तूं अवगुणु रे भ्रमरा**
**चरण-कमल-दळु रे भ्रमरा । भोगीं तूं निश्चळु रे भ्रमरा**
**सुमन-सुगंधु रे भ्रमरा । परिमळ विद्गदु रे भ्रमरा**
**सौभाग्य-सुंदरु रे भ्रमरा । बाप रखमादेवी-वरु रे भ्रमरा**

हे जीव-भ्रमरा, तूं रस सेविण्यासाठीं दुनियाभर भ्रमण करीत असतोस. रस-वृत्ति हा कांहीं अवगुण म्हणतां येणार नाहीं. पण बहिर्मुखता आणि चंचलता हे तुझे मोठे अवगुण म्हटले पाहिजेत. तूं जर अंतर्मुख वृत्तीनें पाहशील तर सौंदर्याची जणूं खाण, आणि ज्यांतील सुगंधाच्या अंशमात्रानें दुनिया भरून राहिली आहे, त्या हरि-चरण-कमळाचें तुला दर्शन होईल. आणि मग, निश्चळ-पणें तेथील रस भोगीत रहा, असें सांगण्याची गरज च राहणार नाहीं!

६०

पांडुरंग-कांती दिव्य तेज, झळकती रत्न-कीळ, फांकती प्रभा
अगणित लावण्य तेज पुंजाळलें न वर्णवे तेथींची शोभा

कानडा हो विठ्ठल कर्नाटकु, तेणें मज लावियेलें वेधीं
खोळ बुंथी घेऊनि खुणेचि पालवी, आळविला सादु नेदी

शब्देंविण संवादु दुजेंविण अनुवादु हें तंव कैसेनि गमे
परे हि परौतें बोलणें खुंटलें, वैखरी कैसेनि सांगे

पायां पडूं गेलें तंव पाऊल चि न दिसे, उभा चि स्वयंभू असे
समोर कीं पाठीमोरा न कळे, ठक चि पडिलें कैसें

रखुमादेवी-वरु हृदयींचा जाणूनि, अनुभवु सौरसु केला
दृष्टीचा डोळां पाहूं गेलें तंव, भीतरीं पालटु जाला

पांडुरंग-मूर्तीचें, ईश्वराच्या साकार स्वरूपाचें, सौंदर्य वर्णन करण्याला शब्द च नाहींत. निर्गुणाचें वर्णन 'अ-रूप' या शब्दानें तरी करतां येतें. हें तर स-रूप असून कोण्या हि रूपाशीं त्याचें साम्य नाहीं. निर्गुण समजावयास कठिण मानलें जातें. पण तें तितकें कठिण नाहीं. कारण तें उघड च निर्गुण आहे. पण हें सगुणाचें पांघरूण घेतलेलें, नाना नाटकें रचणारें, ह्याचा उलगडा सहसा होत च नाहीं. त्यासाठीं केलेल्या जिज्ञासेचें स्पष्ट उत्तर मिळत नाहीं. खुणेनें काय सूचित होईल तें खरें. पण त्याची ओढ मात्र टळत नाहीं. निर्गुणाशीं बोलण्याचा प्रश्न नाहीं. याच्याशीं बोलायचें आहे, पण तें शब्दाशिवाय. पाया पडायचें, पण पाऊल दिसायचें नाहीं. दर्शन घ्यावयाचें, पण समोर कीं मागें कळावयाचें नाहीं.

अशा या अत्यंत गहन स्वरूपाचा छडा लावण्याचा ज्ञानदेवानें प्रयत्न केला. तर अनुभवानें निष्कर्ष निघाला कीं तें रूप आपल्या हृदयांत च स्वयंभू उभें आहे. आणि बाहेर दिसतें तें हि त्याच्या च पडताळयाचें आहे. मग ह्या नवीन दृष्टीनें पाहूं जातां सर्व च अंतरंग पालटून गेलें!

६१

त्रि-भंगीं देहुडा ठाण मांडोनियां राहे
कल्प-द्रुमा तळीं वेणु वाजवीत आहे

गोविंदु वो माये गोपाळु वो माये
सबाह्य अभ्यंतरीं अवघा परमानंदु माये

सांवळें सगुण सकळां जीवांचें जीवन
घनानंद-मूर्ति पाहतां हारपलें मन

शून्य स्थावर जंगम व्यापुनि राहिला अकळ
बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु सकळ

• श्रीकृष्ण आपल्या सहज थाटांत कल्पवृक्षाखालीं वेणू वाजवीत उभा आहे. ज्याला जो ध्वनि ऐकावयाची इच्छा असेल, तो त्यानें ऐकून घ्यावा. ज्याला जें रूप पाहण्याची गोडी असेल, तें त्यानें पाहून घ्यावें. जग त्रिविध आहे, तर तो हि तसा च त्रिभंगी आहे. देहधारी भक्तासाठीं तो देहधारी झाला आहे. गोविंद गोपाळ इत्यादि जगांतलीं हजारों नांवें त्यानें धारण केलीं आहेत. बाह्य आणि आंतरिक सारीं सुख-दुःखें पोटांत जिरवणारा तो परमानंद आहे. तो सर्व गुणांनीं भरलेला, जीवन-स्वरूप, आनंद-मूर्ति, चिंतनाच्या पलीकडे आहे. जड चेतन आणि शून्य तिन्ही व्यापून राहिलेला, तो भक्तांचा लाडका विठ्ठल आहे.

६२

माथे टेकीत बाह्या पसरीत । डांगांचें आधार घेती
एक म्हणती आम्हीं उचलिला पर्वत । बहुत मिळोनि काय नव्हे रे

बाहे कडाडीत मनगटें लचकीत । म्हणोनि उठिले अवघे रे
तयांमाजीं असतां न दिसे बाप । समर्थ थोर तुझी माव रे

काळु आतुडे, परि वेळु नातुडे । म्हणोनि रक्षिलें सकळां रे
बाप रखुमादेवी-वर विठ्ठल साचा । म्हणोनि रक्षिलें आम्हां रे

गोवर्धन पर्वत उचलण्यासाठीं सर्व गोपाळांनीं सामुदायिक उठावणी केली. कोणी आपल्या हातांचा आधार दिला, कोणी डोक्याचा टेका दिला, कोणी काठ्या लावल्या. कोणाचे हात मोडले, कोणाचीं मनगटें लचकलीं. शेंवटीं तो पर्वत उभा झाला.

गोपाळ आनंद-भरांत म्हणाले, "धन्य आम्ही, हा पर्वत उचलला. सामुदायिक प्रयत्नानें काय होणार नाहीं?" शाहणे म्हणाले, "अरे हा सारा कृष्णाचा महिमा. तो आपल्यांत असून तुम्हांला कसा दिसत नाहीं? आपण सारे च आतां मरत होतों कीं! त्याच्या कृपेमुळें जिवंत राहिलों, हें च भाग्य समजा."

वि: ...........
नों: दि: ...........

## अध्याय ९

### ६३

देव आहे जैसा, तैसा नेणवे सहसा
भांबावला कैसा, विश्व-जनु

तया रूप ना रेखा, लय ना लक्षण
तो प्रतिमेसि आणून, वासना-रूपें

देव सर्व-गत, निराळा अद्वैत
तया मूर्तिमंत, ध्याय जनु

तिहीं देवांसि आकारु, जेथूनि विस्तारु
तो ध्वनि ॐ-कारु, त्या आरुता

तेथ नाद ना बिंदु, कळा ना छंदु
अक्षय परमानंदु, सदोदित

अवतरे तें साच नव्हे, होय तें न संभवे
आहे हें आघवें, लाघव त्या

तो एकवट एकला, रचला ना वेंचला
आदि-अंतीं संचला, अनंतपणें

पृथ्वी आप तेज वायु आकाश
हीं सकळ हि हारपती प्रळयांतीं

तो निर्शून्य निरुपम, निरंजन निर्वाण
ते दशा पाषाण, केंवि पावती

**पाहतां या डोळां, परि न दिसे कांहीं केला**
**व्यापूनियां ठेला, बाहिजु भीतरीं**
**तो पद-पिंडा अतीतु, भव-भाव-विरहितु**
**बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु हृदयांतु रया**

"ईश्वर एक च आहे, पण उपासक त्याची बहुविध उपासना करतात" असें श्रुति सांगते. उपासकांच्या भक्ति-भावामुळें त्यांची ती उपासना होते. पण ती च अज्ञान जनतेच्या भ्रमाला कारण झाली आहे.

ईश्वर अ-व्यक्त अ-रूप. तेथें चित्र-कलेचा काय प्रवेश ? तरी पण काल्पनिक संकेत रचून, चित्रकार आपापल्या हौशीप्रमाणें त्याचीं चित्रें प्रतिमा इत्यादि बनवतात. आणि भक्त-जन तसल्या त्या एकदेशी मूर्तींमध्यें सर्व-व्यापक निर्लिप्त परमेश्वराचें भावन करूं लागतात.

कोणी ध्यान-योगी ईश्वराची ज्योतिर्मय ॐकार-स्वरूपांत उपासना करतात. आणि उपपत्ति सांगतात कीं ईश्वराला विश्व-रचनेचा छंद लागला, तेव्हां त्यांतून ॐ हा नाद निघाला. तो च पुढें तीन कलांनीं चिरला जाऊन त्यांतून तीन देव आणि तीन जगें निर्माण झालीं. ही सारी उपपत्ति, ध्यानाला आलंबन म्हणून, गृहीत धरली तरी, ईश्वर-स्वरूपाच्या ती अगदीं च अलीकडची आहे. वस्तुतः तर ती ईश्वराला लागू हि व्हावयाची नाहीं. जो स्वयं-तृप्त, नित्य-परिपूर्ण आनंद-स्वरूप, त्याच्या ठिकाणीं कुठला छंद, नि कुठला नाद, नि कुठलें काय ?

कोणी धर्म-परायण ईश्वराची अवतार-स्वरूपांत भक्ति करतात. म्हणतात, "ईश्वर वेळोवेळीं अवतार घेतो. साधु-परित्राण करतो. धर्माची घडी बसवितो." पण तो समष्टि-स्वरूप, त्याला ना आदि ना अंत;

ना जन्म ना मृत्यु; केवळ निर्विकार ! हें अवतार-कार्य त्याच्या ठिकाणीं कसें संभवेल ? हें सर्व घडत असतें ही गोष्ट खरी; पण तें मायेचें लाघव आहे. त्याचा त्याला काय स्पर्श ?

ईश्वराची निर्विकारता लक्षून, कोणी त्याला शालग्रामादि पाषाण-प्रतीकांत पूजतात. म्हणतात, ‘ माणसाच्या मानानें पाषाण कसा निर्विकार ! त्याला ना राग ना द्वेष, ना लोभ ना मत्सर.’ पण कुठें पाषाण आणि कुठें परमेश्वर ? पृथिव्यादि पंच-भूतें प्रलयांतीं जेव्हां शून्यांत विलीन होतात, त्या हि वेळीं जो त्या शून्याहून वेगळा शिल्लक च राहतो, त्या परिशुद्ध निर्विकार-स्वरूपाला कशाची उपमा द्यावयाची ?

तो तर अंतर्-बाह्य भरून राहिला आहे. इंद्रिय-द्वारा त्याची उपासना खुशाल केली जावो, पण-इंद्रिय-द्वारा त्याचें दर्शन मात्र होणें नाहीं. तो क्षेत्र-क्षेत्रज्ञाहून वेगळा, क्षराक्षरातीत, सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचा जेथें लेश हि संपर्क नाहीं, असा पुरुषोत्तम, सर्वांच्या हृदयांत विराजमान आहे. तेथें च त्याचें दर्शन घ्यावयास पाहिजे.

## ६४

**मलयानिळ शीतळु । पालवीं न ये गाळूं**
**सुमनाचा परिमळु । गुंफितां न ये**

**तैसा जाणा सर्वेश्वरु । म्हणों न ये सान थोरु**
**याचा स्वरूपाचा निर्धारु । कवण जाणे**

**मोतियाचें पाणी । भरूं न ये वो रांजणीं**
**गगनासि गंवसणी । घालितां न ये**

**डोळेयांतील बाहुली । करूं न ये वो वेगळी**
**धांवोनि अचळीं । धरितां न ये**

**विठ्ठल-रखुमाईचे भांडणीं । कोण करी बुझावणी**
**तया विठ्ठल-चरणीं । ज्ञानदेवो**

ईश्वराचें स्वरूप काय, किंवा त्याचा त्याच्या मायेशीं संबंध कोणत्या प्रकारचा, या प्रश्नांचा निर्णय करणें किंवा तो शब्दांत मांडणें अशक्य आहे. ईश्वराचें माप करणें म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखें च आहे. कोणत्या हि मापांत बसायला तो अति व्यापक पडतो. पण म्हणून त्याला व्यापक म्हणावें तर तें हि जमत नाहीं. कारण व्याप्य हि तो आहे. विरोधी विशेषणांपैकीं कोणतें हि एक च त्याच्या वर्णनाला अपुरें पडतें. म्हणून दोन्ही एकत्र वापरावीं तर अर्थ-निष्पत्ति च होत नाहीं. ईश्वराची व्याख्या करण्यासाठीं जितकी जितकी बुद्धि दौडवावी, तितका तितका तो अधिक च पुढें दौडतो. छायेच्या मागें धावण्यासारखा च प्रकार तो होतो.

बरें, ईश्वराची माया तरी त्याच्याहून वेगळी करतां येते का ? द्रव्य आणि द्रव्याचे गुण, वस्तु आणि वस्तूचा आकार, कारण आणि कारणाचें कार्य, एकमेकांपासून भिन्न आहेत कीं अभिन्न आहेत कीं आणिक कशीं आहेत, या बाबतींत दर्शनकारांचीं भांडणें कधीं च तुटलीं नाहींत. वस्तुतः हीं भांडणें दर्शनकारांचीं नसून ईश्वर आणि त्याची माया यांच्यामधलीं आहेत. त्या दोघांना एकत्र राखावें, तरी तीं भांडतात; आणि अलग करावें तर भांडतात च. एवढ्या भांडणाऱ्या माय-बापांची समजूत आम्ही लेकरें कशी घालणार ? म्हणून ज्ञानदेव या भानगडींत न पडतां, मायेचें नांव च सोडून, ईश्वर-चरणीं लीन होणें पतकरतो.

६५

**सर्वादि सर्व-साक्षी तो । विश्वं-भर खल्विदं तो गे बाई**
**आनंदा आनंद तो । प्रबोधा प्रबोध तो गे बाई**
**रखुमादेवी-वरु तो । विटेवरी उभा तो गे बाई**

ईश्वर सर्वांचें उगम-स्थान, सर्व-साक्षी, सर्वांचें भरण करणारा, सर्व-मय आहे. आनंद आणि प्रबोध या तर त्याच्या मोठ्या दोन खुणा च आहेत. पण विटेवर उभा ही एक तिसरी खूण आम्हा भक्तांना लाभलेली आहे, जिचें ध्यान करून आम्ही आमच्या हृदय-रूप विटेवर त्याला नित्य उभा राखत असतों.

६६

**सत्य-ज्ञानानंत गगनाचें प्रावरण । नाहीं रूप वर्ण गुण तेथें**
**तो हा रे श्रीहरि पाहिला डोळेभरीं । पाहतें पाहणें दूरीं, सारोनियां**
**ज्ञानदेवो म्हणे ज्योतीची निज ज्योति । ते हे उभी मूर्ति विटेवरी**

'सत्यम्, ज्ञानम्, अनंतम्' असें ज्या निर्गुण निराकाराचें वर्णन केलें जातें, तो च आम्ही सगुण साकार रूपानें डोळे भरून प्रत्यक्ष पाहत असतों. पण त्यांत पाहणारा कर्ता नाहीं आणि पाहणें क्रिया-पद नाहीं. अशा त्या ईश्वराला आम्ही बाहेर विटेवर उभा करतों. आणि हृदयांत अंतर-ज्योति-रूपानें अनुभवींत असतों.

६७

**कोणाचें हें रूप हा देह कोणाचा । आत्मा-राम साचा सर्व जाणे**
**मी-तूं हा विचार विवेकें शोधावा । गोविंदु हा ध्यावा या चि देहीं**
**ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटीवेगळा । सहस्र-दळीं उगवला सूर्य जैसा**
**ज्ञानदेवो म्हणे नयनांतील रूप । या नांव चित्-पद तुम्ही जाणा**

विश्व-रूपानें नटलेला, विविध देह धारण करणारा, आणि सर्व जाणणारा, एक सत्य-स्वरूप आत्माराम च आहे. देहांत असतांना, देह बाजूला सारून, विवेकानें त्याचें ग्रहण केलें पाहिजे. मग मी-तूं हा विभाग सहज च लटका पडतो. वास्तविक सर्वांच्या हृदय-कमलांत तो एक च चित्-सूर्य अलिप्तपणें प्रकाशमान आहे. ध्यानादि साधनेचे अनेक प्रयोग आपण करतों, पण आपण त्या सर्व प्रयोगांना आधारभूत, त्या सर्वांना प्रकाश देणारे, त्या सर्व प्रयोगांहून वेगळे च आहोंत. माणसाच्या डोळयांत सहस्र भाव उमटलेले असतात. ते सर्व एका आत्म्यापासून च निघालेले आहेत. म्हणून डोळयांतील रूप, किंवा ‘ अक्षि-पुरुष ’, ही एक चैतन्याची खूण च शास्त्रकारांनीं सांगितली आहे.

६८

**तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे । सगुण निर्गुण एक गोविंदु रे**
**अनुमाने ना अनुमाने ना । श्रुति नेति नेति म्हणती गोविंदु रे**
**तुज स्थूळ म्हणों कीं सूक्ष्म रे । स्थूळ सूक्ष्म एक गोविंदु रे**
**तुज दृश्य म्हणों कीं अ-दृश्य रे । दृश्य अ-दृश्य एक गोविंदु रे**
**निवृत्ति-प्रसादें ज्ञानदेवो बोले । बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु रे**

पदार्थांचे वर्ग—भाव आणि अभाव.
भावाचे वर्ग—सगुण आणि निर्गुण.
सगुणाचे वर्ग—व्यक्त आणि अव्यक्त.
व्यक्ताचे वर्ग—स्थूल आणि सूक्ष्म.

तर्क-शास्त्र विचारतें : “ईश्वराला तुम्ही कोणत्या कोटींत घालाल?”

श्रुति म्हणते : “कोणत्या च कोटींत घालणार नाहीं.”

भक्त म्हणतात : “दोन्ही कोटींत घालूं.”

ज्ञानदेव म्हणतो : “कोटी च नाहींत, आणि ईश्वर आहे. म्हणून तर्काचें काम च नाहीं.”

६९

**फळाचें बीज कीं बीजाचें फळ । म्हणूनि पत्र पुष्प मूळ चोजवे ना**
**ऐसी हे रचना न कळे गा देवा । सिद्धान्त अनुभवा साक्ष देतो**
**मृत्तिकेची पृथ्वी कीं पृथ्वीची मृत्तिका । या गति अनेका चोजवे ना**
**बाप रखुमादेवी-वरु निरंतरीं । सबाह्य अभ्यंतरीं नांदतसे**

बीज आधीं कीं फळ आधीं? जगाची रचना कशी झाली आहे? कार्य-कारणांचा संबंध कशा प्रकारचा? अशासारख्या प्रश्नांची चर्चा करण्याची पुष्कळांना हौस असते. वस्तुत: हे प्रश्न कधीं सुटायचे हि नसतात, आणि त्यांचा आध्यात्मिक जीवनाशीं कांहीं संबंध हि नाहीं. आध्यात्मिक सिद्धान्त प्रत्यक्ष अनुभवावर उभे असतात. “आत्मा अंतर-बाह्य सर्वत्र भरलेला आहे,” या अनुभवाची आध्यात्मिक दृष्ट्या मुख्य गरज आहे. त्यांत सर्व सिद्धान्तांचा सहज च समन्वय होतो.

७०

**कांहीं न करिजे ते तुझी सेवा । कांहीं नव्हेसि तें तूं देवा**
**नेणिजे तें तुझें रूप । जाणिजे तितुकें पाप गा देवा**
**स्तुति ते तुझी निंदा । स्तुतीजोगा नव्हेसि गोविंदा**
**बाप रखुमादेवी-वरा विठ्ठला । एवढा साभिलाष कां धरिला**

कर्म-योगी कर्मानें ईश्वराची सेवा करण्याचा हव्यास धरतो. ज्ञान-योगी बुद्धीनें ईश्वराचें स्वरूप जाणण्याची हिंमत करतो. भक्त वाणीनें ईश्वराचे गुण गाण्याची हौस बाळगतो. वस्तुतः कांहीं न करण्यानें त्याची सेवा होते. नेणिवेनें त्याचें स्वरूप जाणलें जातें. आणि मौनानें च त्याची योग्य स्तुति होते. असें त्याचें स्वयंभू स्वतःसिद्ध स्वरूप आहे. अशा स्थितींत ज्ञानदेवाच्या लक्षांत च येत नाहीं, कीं एवढी विपरीत अभिलाषा साधक कां धरतात, आणि ईश्वर त्यांना कां धरायला लावतो.

## अध्याय १०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७१ २०१८७

**सकळ नेणोनियां आन । एक विठ्ठल चि जाण**
**पुढती पुढती मन । एक विठ्ठल चि जाण**

**गुरु-गम्य ही खूण । एक विठ्ठल चि जाण**
**बुझसी तरी तूं निर्वाण । एक विठ्ठल चि जाण**

**हे चि भक्ति हें चि ज्ञान । एक विठ्ठल चि जाण**
**बाप विठ्ठलाची आण । एक विठ्ठल चि जाण**

चित्तांतून अवांतर सर्व ज्ञानें काढून टाकून एका ईश्वराला च ओळख. गुरूपाशीं त्याची विद्या शिकून घे, मनानें त्याचें मनन कर, बुद्धीनें त्याचा निश्चय कर. भक्ति-प्रेम वेगळें आणि ज्ञान वेगळें, असें आपण म्हणतों. हें इतर विषयांत बरोबर असलें तरी ईश्वराला तें लागू नाहीं. कारण, ईश्वराला जाणणारा त्याच्यावर प्रेम केल्याशिवाय राहूं च शकत नाहीं. म्हणून ज्ञानदेव निकरानें सांगत आहे, एक ईश्वराला जाणून घे, म्हणजे सर्व कांहीं त्यांत आलें.

## ७२

दीप-दीपिका शशि-तारा । होतु का कोटि वरी रे
परि न सरे निशी, नुगवे दिवसु । दिनकर-नाथेंविण जियापरी रे
नुद्धरिजे नुद्धरिजे नुद्धरिजे । गोपाळेंविण नुद्धरिजे ॥ ध्रु० ॥

नगर भ्रमतां जन्म जावो । परि प्रवेश एक्या द्वारें रे
तैसा यजिजो भजिजो पूजिजो । परि उकलु नंद-कुमरें रे

सर्वावयवीं शरीर सांग । परि विरहित एक्या जीवें रे
तैसा धिक् तो श्रोता, धिक् तो वक्ता । जो वाळिला विठ्ठल-देवें रे

गलित-शिर हें कलेवर रे । उदकेंविण सरिता भयंकर रे
रवि-शशीविण अंबर तैसें । हरीविण जिणें असार रे

शिखि-पक्षि-पत्रीं डोळे । जेंवि अकाल-जलद-पडळें रे
तैसीं गोकुळ-पालक-बाळेंविण । कर्में सकळें विफळें रे

यम नियम प्राणायाम प्रत्याहार । हे सकळ उपाय परि अपाय रे
जंव तमाळ-नीळ सांवळा हृदयीं । ठाण मांडुनि न राहे रे

मी उत्तम पैल हीनु । भूतीं द्वेषाद्वेष ठेले रे
केलेनि कर्में उपखा निपजे । सुख तें दूरीं गेलें रे

आतां असोत हे भेदाभेद । आम्ही असों एक्या बोधें रे
बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु । निवृत्ति-मुनिराय-प्रसादें रे

दिवे तारका आणि चंद्र, सगळे मिळून दिवस करूं शकत नाहींत. दिवस सूर्यानें च उगवायचा. इतर साधनें आणि ईश्वर-भक्ति यांची ही तुलना आहे. इतर साधनें संसारांतल्या संसारांत काय प्रकाश पाडतील तो खरा. पण संसार च छेदून टाकणारा प्रकाश त्यांनीं मिळावयाचा नाहीं. आंतल्या आंत भटकायचें असल्यास रस्ते अनेक आहेत. बाहेर पडायला रस्ता एक आहे. केवळ श्रवण-व्याख्यानादि ज्ञान-मार्ग प्राण-हीन ठरतो. केवळ कर्मं करायला लावणारा कर्म-मार्ग दृष्टि-हीन ठरतो. म्हणून आत्म-निग्रहाचा योग-मार्ग स्वीकारावा, तर तो हि ईश्वर-भक्तीच्या अभावीं सिद्धीं-कडे नेणारा अपाय होऊन बसतो.

मी उत्तम आणि दुसरे हीन हा उच्च-नीच भाव, किंवा अमके माझे बाकीचे परके हा भेद-भाव, नाहींसा होणें ही सर्व साधनांची कसोटी आहे. सर्वत्र ईश्वर पाहणारी भक्ति च तेवढी या कसोटीवर उतरूं शकते. इतर साधनांनीं हे अनिष्ट भाव न वाढले तर मेहरबानी, असें म्हणण्यासारखी स्थिति आहे. म्हणून सर्व भेदाभेद सोडून विश्वात्मैक्य-रूप भक्तीचा आश्रय करूं या. अशी बुद्धि निवृत्ति-मुनींच्या प्रसादानें ज्ञानदेवास लाभली आहे.

## ७३

**अकार उकार मकार करिती हा विचार।**
**परी विठ्ठल अपरंपार न कळे रया**
**संतांचे संगती प्रेमाचा कल्लोळा।**
**आनंदें गोपाळांमाजीं खेळे**
**बाळे-भोळे भक्त गाताती साबडे।**
**तयांचें प्रेम आवडे विठोबासि**
**रखुमादेवी-वरु परब्रह्म-पुतळा।**
**तेथील हे कळा निवृत्ति जाणे**

अकार, उकार, मकार, असला विश्लेषणात्मक तात्त्विक विचार किती हि केला तरी त्यानें ईश्वर कसा कळणार ? कारण, तो संश्लेषण-स्वरूप आहे. तीन मात्रांचा ॐकार बनला. पण तो त्या तीन मात्रांच्या बेरजेच्या हि पलीकडे, अर्ध्या मात्रेवर आहे म्हणतात. आणि ही अर्धी मात्रा गणितांत अर्धी असली तरी वस्तु-स्थितींत अपार आहे.

तुकड्यांच्या बेरजेंतून पूर्ण निर्माण होऊं शकत नाहीं. आधीं तुकडे करायचे, मग बेरीज करायची, ही तार्किक प्रक्रिया पूर्णाचें आकलन करण्याला निरुपयोगी आहे. ईश्वर तर पूर्णाच्या हि पलीकडे, केवळ अपरंपार आहे. त्याचें आकलन प्रेमाशिवाय होणारें नाहीं. ईश्वर आहे ज्ञान-मय, पण तो लाभत असतो प्रेमानें. ही त्याची खुबी अनुभवी पुरुषांच्या लक्षांत आली आहे.

## ७४

**भजनापरिस साधन आणिक । कलि-युगीं देख आन नाहीं**
**सर्व देहीं भजन हें चि निज ज्ञान । मग मुक्तपण आपेंआप**
**मीपण मावळे सद्भाव उजळे । सुखाचे सोहळे गुरु-खूण**
**श्रीगुरुनिवृत्ति-चरणप्रसादें । भजनीं आनंदे ज्ञानदेवो**

भजन म्हणजे सर्व देहीं भजन, म्हणजे च ईश्वर-भावनेनें भूत-सेवा, यासारखें कलि-युगांत दुसरें साधन नाहीं. निरनिराळ्या गटांचे झगडे किंवा कलह हें कलि-युगाचें स्वरूप आहे. कलि शब्दाचा अर्थ च तो आहे. म्हणून सर्वोदयासाठीं झटणारें हें भजन हा च त्यावर तोडगा आहे. परस्परांचीं वास्तविक हितें परस्परांच्या विरुद्ध नसतात, हें निज-ज्ञान त्याचा पाया आहे. त्यानें मुक्तीचा मार्ग सहज च मोकळा होणारा आहे. मग संकुचित मीपणा लोपेल. परस्पर सद्भाव जागृत होईल. सर्वत्र सुख उचंबळेल. ज्ञानदेवाला निवृत्ति-चरण-प्रसादानें लाभलेलें हें खुणेचें भजन आहे. त्यांत च त्याला सदा आनंद वाटत असतो. कुणाला वाटणार नाहीं ?

७५

**स्व-रूपाकारणें विश्व-रूप घेतलें । सगुणें झांकिलें निर्गुण रया**
**द्रष्ट्टयाचे दीप्ती दृश्य चि न दिसे । सम-रसीं भासे तेज तयाचें**
**चित्-स्वरूपीं नांदे तत्-स्वरूपीं भासे । ॐकार सरिसें तदाकार**
**प्रेम-कळी ओतलें सोज्वळित तेज । तेथें तूं विराज ज्ञानदेवा**

वस्तुतः मुळांत निर्गुण स्वरूपाच्या प्रकाशनासाठीं हें सगुण विश्व-रूप धारण केलें आहे. पण परिणाम विपरीत झाला. लोक-दृष्टींत सगुणानें निर्गुण झांकून च टाकलें. उलट विचारकांच्या विचार-दृष्टींत द्रष्ट्याची—निर्गुणाची—दीप्ति इतकी फांकते कीं दृश्याचा—सगुणाचा—लोप होतो.

सर्व-सामान्य लोक-दृष्टि आणि विचारकांची विचार-दृष्टि यांहून वेगळी भक्तीची दृष्टि आहे. तिनें व्युत्थान आणि समाधि दोहोंची कसर काढून टाकणारी समरस अवस्था लाभते. या समरसांत दृश्याचा लोप न होतां द्रष्ट्याचें तेज भासमान होतें. त्या अवस्थेंत ईश्वर चैतन्य-स्वरूपांत—सगुणांत—नांदतो. तरी चैतन्यापलीकडील तत्-स्वरूप निर्गुण भासत च राहतें. शब्द बोलावा तर तदाकारता लोपते, आणि तदाकार व्हावें तर शब्द मावळतो, ही नेहमींची अडचण. पण समरस अवस्थेंत इकडे ॐकार उच्चारावा आणि तिकडे तदाकार हि व्हावें.

या अवस्थेचें थोडक्यांत वर्णन 'प्रेम-कलिकेमध्यें ओतलेलें प्रखर तेज' असें करतां येईल.

(१) सगुणानें निर्गुण प्रकट व्हावें.

(२) दृश्य न लोपतां द्रष्ट्याचें तेज फांकावें.

(३) चैतन्याच्या खेळांत—कर्म-योगांत—वागत असतांना पलीकडील शांति अनुभवावी.

(४) शब्द बोलत असतांना निःशब्दांत लीन असावें.

(५) प्रेमाची कोमलता आणि ज्ञानाची प्रखरता यांचा योग साधावा.

असें या अवस्थेचें विवरण होईल. या अवस्थेंत तूं नित्य विराजमान हो, असें ज्ञानदेवाचे गुरु ज्ञानदेवाला सांगत आहेत.

## ७६

**समाधि हरीची, सम सुखेंविण ।**
**न साधेल जाण द्वैत-बुद्धी**
**बुद्धीचें वैभव, अन्य नाहीं दुजें ।**
**एक्या केशीराजें सकळ सिद्धि**
**ऋद्धि सिद्धि निधि, अवघी चि उपाधि ।**
**जंव तया परमानंदीं मन नाहीं**
**ज्ञानदेवीं रम्य, रमलें समाधान ।**
**हरीचें चिंतन सर्व काळ**

सर्वत्र सुख-साम्य योजिल्याशिवाय ' हरीची समाधि ' लाभणार नाहीं. भेद-भावाचें निर्दलन करून सुख-साम्य संपादण्यांत च बुद्धीचें वैभव आहे. पण दुर्दैवानें अवांतर ऋद्धि सिद्धि आणि निधि मिळविण्यांत मनुष्याला बुद्धीचें वैभव वाटतें. पण जोंपर्यंत त्या सुख-साम्य-रूप परमानंदाकडे मन नाहीं तोंपर्यंत या सर्व उपाधि च होत. ज्ञानदेवाला तर त्या च एका ध्येयाचें, त्या हरि-मय समाधीचें, चिंतन करण्यांत, त्यासाठीं तळमळण्यांत, रम्य समाधान लाभलें आहे.

७७

**देह दंडूनि पाईक, अनुसरला जीवें । तंव स्वामीचें गूज हातासि आलें**
**पाईकपण गेलें, स्वामी होऊनि ठेलें । परि नाहीं विसरलें स्वामियातें**
**पाईकपणें ऐसा, आठवु चि नाहीं । स्वामीवांचूनि कांहीं जाणे चि ना**
**रखुमादेवी-वरु, विठोजी उदारु । पाईक तो साचारु स्वामी केला**

सेवकानें कष्ट सोसून सेवा केली, त्यामुळें स्वामीच्या हृदयाचा तो स्वामी झाला. अर्थात् त्याचें पूर्वीचें सेवकपण गेलें आणि त्याला स्वामीची पदवी आली. तरी तो स्वामीला विसरला नाहीं च. त्यानें आपला सेवकपणा च कायम राखला.

स्वामींनीं उदारपणें सेवकाला स्वामीची पदवी द्यावी. सेवकानें नम्रपणें आपली सेवकाची पदवी सोडूं नये. यांत च गोडी भरलेली आहे.

## अध्याय ११

७८

**लक्ष लावूनि अंतरीं । कृष्णा पाहती नर-नारी**
**लावण्य-सागर हरि । परमानंदु**

**छंदें छंदें वेणु वाजे । ठाईं ठाईं घनु गाजे**
**उतावीळ मन माझें । भेटावया**

ब्रह्म-विद्येचा पुतळा । गाई राखतो गोवळा
श्रुती नेणवे ते लीळा । वेदां सनकादिकां

निवृत्ति-दासाचा दातारु । बाप रखुमादेवी-वरु
भक्तां देतो अभय-करु । क्षण क्षणा

कृष्ण-अवतारांतलें तें मधुर चित्र अजून भक्तांच्या चित्तांत सारखें खेळत असतें. वर मेघ गर्जून राहिला आहे. खालीं मेघ-श्याम हरि वेणु वाजवीत आहे. ब्रह्म-विद्येचें शिखर गांठून सामान्य गोवाऱ्याप्रमाणें गाई राखत आहे. तें दृश्य सनकादिकांच्या हि कल्पनेबाहेरचें आहे. ब्रह्म-साक्षात्कार झाला आणि कर्मे गळून पडलीं, हा त्यांचा अनुभव. यानें तर ब्रह्मांत कर्म मिसळून दिलें ! निवृत्ति-दासावर याची च कृपा असून भक्तांना त्याचें अभय-वचन आहे, कीं तुम्ही निरंतर कर्में करून हि माझ्या भक्तीनें मोक्ष गांठूं शकतां. तुम्हांला भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

## ७९

नभ नभाचेनि सळें । क्षोभु वाहिजे कालिंदी-जळें
सासिन्नले जगाचे डोळे । तें रूप पाहावया

भलतैसी हांव । मना न पुरे तेथींची धांव
लावण्य-सिंधु सींव । सांडूनि जातो गे माये

कटावरी ठेवूनि हात । जना दावी संकेत
भव-जलाब्धीचा अंत । इतुला चि

**सम-चरणांचिया खुणा । उभा पंढरीचा राणा**
**तो आडे जना मना । दुर्लभ गे माये**

**आमुचे हृदयींची श्रीमूर्ति । घेऊनि विठ्ठल-वेषाची बुंथी**
**आतां चाळविसी किती । बाप पालट नेघे**

**बाप रखुमादेवी-वरा विठ्ठला । तुवां मजसीं अबोला कां धरिला**
**जंव जीव आहे उरला । तंव निघों पाहे**

कृष्णावतारीं ज्याच्या सांनिध्यास्तव एका आकाशाला दुसऱ्या आकाशाचा हेवा वाटत होता, आणि ज्याच्या स्पर्शासाठीं यमुनेचें पाणी वर चढत होतें, तो सर्व जगाचे डोळे आपल्याकडे ओढून घेणारा आणि मनाची गति कुंठित करणारा प्रभु, आज आमच्यासाठीं कमरेवर हात ठेवून भीमा नदीच्या किनाऱ्यावर उभा आहे !

संसारनदी भयानक दिसते, पण फारशी खोल नाहीं. कमरेइतकें च पाणी तींत आहे, असें तो संकेतानें सांगत आहे. त्याची ती सम-चरण मूर्ति सर्वांना समत्वाचरणाचा बोध देत आहे. वास्तविक ती मूर्ति आहे आमच्या हृदयांतली, पण बाहेरचें सोंग घेऊन उभी आहे.

चित्ताचा पालट केव्हां होणार ? ती मूर्ति हृदयांत केव्हां प्रकटणार ? आणि तिचा शब्द आंतून स्पष्टपणें केव्हां ऐकूं येणार ? ज्ञानदेवाला ही च एक तळमळ लागून राहिली आहे. अजून जीव उरला आहे, म्हणून या तळमळीमुळें बाहेर निघूं पाहतो आहे. निघून च गेल्यानंतर काय होईल कोणास ठाऊक !

८०

पाहे पां ध्वजेचें चिरगुट । राया जतन करितां कष्ट
तैसा मी एक पतित । परि तुझा मुद्रांकित
मषी-पत्र तें केवढें । रावो चालवी आपुलेनि पाडें
बाप रखुमादेवी-वर-दा । सांभाळीं आपुलेया बिरुदा

ज्ञानदेव देवाला म्हणतो—" देवा, मी एक सामान्य पतित जीव आहे ही गोष्ट खरी, परंतु तुझा मुद्रांकित भक्त आहे. झेंड्याचें फडकें तें काय, पण त्याच्या प्रतिष्ठेसाठीं राजाला कष्ट करावे लागतात. राजाच्या सहीचें चिटोरें तें केवढें, पण राजाच्या स्वतःच्या किमतीइतकी त्याची किंमत ठरते. ती च स्थिति माझी आहे. मी तुझें यश फडकविणारा झेंडा आहे. मी तुझी आज्ञा जाहीर करणारें तुझें आज्ञा-पत्र आहे. त्याची प्रतिष्ठा सांभाळणें तुला भाग आहे."

८१

परिमळाची धांव भ्रमर ओढी ।
तैसी तुझी गोडी लागो मज
अवीट गे माये विटे ना ।
जवळीं आहे परी भेटे ना
तृषा लागलियां जीवनातें ओढी ।
तैसी तुझी गोडी लागो या जीवा
बाप रखुमादेवी-वरीं विठ्ठलीं आवडी ।
गोडीयेसि गोडी मिळोनि गेली

भ्रमर फुलाकडे ओढला जातो, किंवा तान्हेला पाण्याचा ध्यास घेतो, तसें ईश्वराचें आकर्षण वाटलें पाहिजे. गोडी लागण्याची च मुख्य अडचण

आहे. एकदां लागली म्हणजे ती सुटायची च नाहीं. मग त्या एका च गोडींत बाकीच्या सर्व गोडी लयाला जातील. किंबहुना त्या एकीनें साऱ्या च गोड होतील.

अनुक्रम ............, वि: ..............
क्रमांक ......८२............ नों: दि: ..............

वाराणसी-यात्रे जाईन । प्रयाग-तीर्थ पाहीन
त्रि-वेणिये स्नान करीन । परि मी वीट नव्हेन
विठोबा पाईंची वीट । मी कई बा होईन

एकांगुष्ठीं तप करीन । पृथ्वी पात्र चि लाहीन
देह कर्वतीं देईन । परि मी वीट नव्हेन
विठोबा पाईंची वीट । मी कई बा होईन

बहुतां पुण्यांचां सायासीं । चरण जोडिले विटेसीं
निवृत्ति-दास म्हणे परियेसी । परि मी वीट नव्हेन
विठोबा पाईंची वीट । मी कई बा होईन

तीर्थें, तपें आणि त्याग करून हि तारण नाहीं. तारण आहे लीनतेनें. जेव्हां विठोबाच्या पायाखालची मी वीट होईन, केवळ शून्य बनून जाईन, तेव्हां च माझी साधना सफल झाली असें मी मानीन. अनेक पुण्यांच्या परिणामीं ईश्वराविषयीं भक्ति वाटूं लागली आहे. पण भक्तीची हि परिणति संपूर्ण निरहंकृतींत झाली पाहिजे.

८३

**सुखाचिया गोठी आतां किती हो करणें । सुखें सुख अनुभवणें ऐसें करीं**
**कैसेनि कीजे मनासि रक्षण । भावासि बंधन केंवि घडे**
**बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु चि पुरें । सुखीं सुख पुरे ऐसें करी**

ज्ञानी पुरुषाच्या आत्म-सुखाच्या नुसत्या गोष्टी आम्ही किती दिवस करीत रहावयाच्या ? आम्हांला त्याचा प्रत्यक्ष अनुभव व्हावयास नको का ? पण त्यासाठीं अनिष्ट संस्कारांपासून मनाचें संगोपन करावें लागेल. विशिष्ट भाव च मनांत स्थिर होईल असें करावें लागेल. आणि जमत नाहीं तें हें च. पण ईश्वराविषयीं भक्ति असली तर हें हि अवघड नाहीं. म्हणून ज्ञानदेव म्हणतो, " देवा, तूं मला पुरेसा आहेस. तुझ्या प्रेम-सुखांत माझीं सर्व सुखें पुरतील असें कर, म्हणजे माझें बाकीचें कार्य सहज च होऊन जाईल. "

८४

**रात्रं-दिवस वाहतसें चिंता । केधवां धडौता होईन मी**
**खिरजट घोंगडें फाटकें तें कैसें । वेंचिलें तैसें भोगिजे गा**
**वित्त नाहीं गांठीं जीवित्वा आटी । उघडी पाठी हींव वाजे**
**घोंगडें देईल तो एक दाता । रखुमादेवी-वरा मागों रे आतां**

फाटकी घोंगडी मी कसा तरी वापरतों आहे. आणि धड केव्हां मिळेल अशी आशा राखून आहे. जी आहे ती वापरल्याशिवाय सुटका च नाहीं. पण इकडे उघड्या पाठीला हींव तर वाजतें च आहे. गांठीं पैसा नाहीं. आणि प्राण-शक्ति आटत चालली. म्हणून आपल्या कमाईची आशा सोडून मी आतां त्याच्यापाशीं च मागतों. तो च मला धड देऊं शकेल.

साधकाला स्व-बुद्धीप्रमाणें साधन आचरल्याशिवाय गत्यंतर नाहीं. पण शेंवटीं ईश्वर-शरणतेशिवाय साधनेची पूर्णता होण्याचा संभव नाहीं.

## ८५

कान्होबा तुझी घोंगडी चांगली । आम्हांसि कां दिली वांगली

स्व-गत सच्चिदानंदें मिळोनि शुद्ध सत्त्व-गुणें विणली रे
षड्-गुण गोंडे रत्न-जडित तुज श्याम-सुंदरा शोभली रे

षड्-विकार षड्-वैरी मिळोनि ताप-त्रयें जी विणली रे
नवा ठाईं फाटुनि गेली ती त्वां आम्हांसि दिधली रे

ऋषि मुनि ध्यातां मुखीं नाम गातां संदेह-वृत्ति विरली रे
बाप रखुमादेवी-वरे विठ्ठले त्वत्-पदीं वृत्ति मुरली रे

ईश्वर सच्चिदानंद-स्वरूप; आम्ही ताप-त्रय-मग्न. ईश्वर शुद्ध सत्त्व-गुणी; आम्ही त्रिगुणांची मिसळ. ईश्वर सर्व-गुण-मंडित; आम्ही सर्व-दोष-संपन्न. ईश्वर अखंड; आम्ही फाटके. हा असा भेद कां ? हा संदेह कांहीं केल्या चित्तांतून जाईना. एकदां एक योगी ध्यान करतांना पाहिला, एकदां एक भक्त नाम गातांना पाहिला, आणि माझा संदेह सहज च जिरून गेला. लक्षांत आलें कीं साधनेचें आणि भक्तीचें सुख अनुभविण्यासाठीं हा भेद आहे. तेव्हांपासून त्याच्या चरणीं माझी वृत्ति लीन झाली.

## ८६

तूं माझा स्वामी मी तुझा रंक । पाहतां न दिसे वेगळीक
मी-तूं-पण जाऊं दे दूरीं । एक चि घोंगडें पांघरों हरी
रखुमादेवी-वरा विठ्ठलराया । लागेन मी पायां वेळोवेळां

तूं माझा स्वामी आहेस आणि मी तुझा सेवक आहें, यांत कांहीं शंका नाहीं. पण विचार करतां हा भेद टिकत नाहीं. म्हणून तो आतां जाऊं दे, आणि एक च रूप आपण दोघे हि धरूं या. एवढा अभेदाचा अनुभव मला येऊं दे. मग मी तुमचा कायमचा दास होऊन राहीन.

८७

पाईका मोल नाहीं देसील तें काई ।
पाईक न मागे कांहीं भोग्य-जात
देसील तें काई न देसील तें काई ।
पाईक न मागे कांहीं तुजवांचूनि
रखुमादेवी-वरा विठ्ठलाचा पाईं ।
पाईका मोल नाहीं तैसें जालें

ईश्वराच्या भक्ताला बाजारांत किंमत नाहीं. कारण, बाजाराला च त्याच्यापाशीं किंमत नाहीं. त्याला एक ईश्वर च पाहिजे. ईश्वर असल्यावर त्याला कांहीं लागत नाहीं. आणि नसल्यावर दुसरें कांहीं चालत नाहीं. मिळून दोन्ही बाजूंनीं त्याला जगाच्या बाजारांत किंमत उरली नाहीं.

## अध्याय १२

८८

घनु वाजे घुण-घुणा, वारा वाजे रुण-झुणा
भव-तारकु हा कान्हा, वेगीं भेटवा कां

चांदु वो चांदणें, चांपे वो चंदन
देवकी-नंदनेंविण, नावडे वो

चंदनाची चोळी, माझें सर्व अंग पोळी
कान्हो वनमाळी, वेगीं भेटवा कां

**सुमनाची सेज, शीतळ वो निकी**
**पोळे आगीसारिखी, वेगीं विझवा कां**

**तुम्ही गातसां सु-स्वरें, ऐकों नेदावीं उत्तरें**
**कोकिळे वर्जावें, तुम्ही बाईयांनो**

**दर्पणीं पाहतां रूप, न दिसे वो आपुलें**
**बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलें, मज ऐसें केलें**

साधकाच्या जीवनांत अशी एक अवस्था येते कीं ज्या वेळीं त्याला ईश्वराचा तीव्र वियोग वाटूं लागतो. त्याचें जगाच्या भाषेंत वर्णन करणें अशक्य च असतें. तथापि मानवाच्या संतोषासाठीं कांहीं तरी भाषा वापरावयाची, म्हणून विरहासक्तीच्या भाषेंत तो अनुभव मांडला जातो. त्या अवस्थेंत भक्ताला जगांतील सर्व शीतलता तापदायी होते. माधुर्य कडू लागतें.

ज्ञानदेव आपला अनुभव सांगतो—देहाकडे पहावें तर कधीं कांहीं च दिसत नाहीं. कधीं भलतें च दिसतें. आणि कधीं देहाच्या जागीं देवाचें च रूप दिसूं लागतें. कधीं शून्यता, कधीं भ्रांति, कधीं उत्कंठा अशी ही विचित्र दशा आहे.

## ८९

**पडिलें दूरदेशीं, मज आठवे मानसीं**
**नको हा वियोग, कष्ट होताती जीवासि**

**दिनु तैसी रजनी, मज जाली गे माये**
**अवस्था लावुनि गेला, अझुनी कां न ये**

**गरुड-वाहना गंभीरा, येईं गा दातारा**
**बाप रखुमादेवी-वरा, श्रीविठ्ठला**

देवा, तुझा वियोग आतां मला असह्य आहे. कारण, तुझी अर्धवट आशा लागल्यापासून वृत्तीच्या ओढाताणीला सीमा च राहिली नाहीं.

कधीं वृत्ति इतकी जड बनते कीं दिवस आणि रात्र मिळून एक मोठी रात्र च होऊन जाते. प्रतिभा वर उठत च नाहीं. कधीं वृत्ति इतकी चंचल बनते, कीं दिवस आणि रात्र मिळून एक लांब च लांब दिवस बनतो. कल्पनेच्या भरारीला शांति च मिळत नाहीं.

तुझें प्रत्यक्ष दर्शन घडून तुझ्या स्फूर्तीचा आणि गंभीरतेचा मला साक्षात्कार होईल तर च धडगत आहे.

९०

**पैल तो गे काऊ कोकताहे । शकुन गे माये सांगतसे**

**ऊड रे ऊड रे काऊ । तुझे सोनेनि मढवीन पाऊ**
**पाहुणे पंढरिराऊ । घरा कैं येती**

**दहींभाताची उंडी । लावीन तुझे तोंडीं**
**जीवा पढिये तयाची गोडी । सांग वेगीं**

**दूधें भरुनी वाटी । लावीन तुझे ओठीं**
**सत्य सांगें गोठी । विठो येईल काई**

**आंबेया डाहाळी । फळें चुंबीं रसाळीं**
**आजिचे रे काळीं । शकुन सांगें**

**ज्ञानदेवो म्हणे । जाणिजे खुणे**
**भेटती पंढरिराणे । शकुन सांगे**

ईश्वराच्या भेटीच्या उत्कंठेनें मी कधीं तर माणसांतून उठतों, आणि पांखरांत जाऊन बसतों. मी त्यांना म्हणतों, "तुम्ही पृथ्वी सोडून आकाशांत उडणारे आहांत, तुम्हाला ईश्वराचें दर्शन असलें पाहिजे. माझ्या घरीं पंढरीचे पाहुणे केव्हां येतील, मला सांगा. तुम्हाला काय हवें तें मी देईन." ते म्हणतात, "तुझें कांहीं आम्हाला नको, पंढरीचे राणे तुला अवश्य भेटतील. केव्हां भेटतील, तुझ्या हृदयांत च कळेल मग."

## ९१

**देऊनियां भेटी मजसीं न करी गोठी । लांचावला जीव पाठीं न राहे वो**
**निष्ठुर म्हणों तरी आपंगितो मातें । व्यापूनि जीवातें उरी उरवितो**
**दाखवा वो माये धरीन तयाचे पाये । तयालागीं जीव आहे उतावीळ**
**भेटीचेनि सुखें मन चि होये मुकें । तें रूप देखें परी बोलवेना**
**रखुमादेवी-वरें विठ्ठलें अंग लपवूनि । चैतन्य चोरूनि नेलें गे माये**

ईश्वराचें एका क्षणांत विजेसारखें दर्शन होतें, आणि तसें च तें लोपतें. मग दीर्घकालपर्यंत पुन्हां होत च नाहीं. त्या दर्शनाचें स्मरण आणि त्याची तळमळ मात्र लागून राहते. ज्याला त्याला विचारावें, तो केव्हां भेटेल. पण सांगतो कोण ? शेवटीं अति च हाल झाल्यानंतर पुनः एकदां भेट होते. तर मन मावळतें, वाणी खुंटते, आणि देह-भावनेसकट चैतन्य जणूं चोरीला जातें. अर्थात् अनुभवाला हि अवकाश उरत नाहीं. पुनः थोड्या वेळानें पूर्वीची च दशा.

## ९२

**दुडीवरी दुडी साते निघाली । गौळण गो-रस म्हणों विसरली**
**गोविंद घ्या वो दामोदर घ्या वो । तंव तंव बोलती मथुरेचिया वो**
**गोविंदु गो-रसु एक चि नांवा । गो-रस विकूं आलें तुमचेया गांवा**
**रखुमादेवी-वरें विठ्ठलेंसीं भेटी । आपुले संवसाटीं करुनि ठेला**

गवळण डोक्यावर दह्याचें मडकें घेऊन बाजाराला निघाली. 'दहीं घ्या जी दहीं' म्हणण्याच्या ऐवजीं म्हणते, 'देव घ्या जी देव'. बाया तिला विचारतात, 'तूं दहीं विकतेस कीं देव विकतेस ?' ती म्हणते, 'माझ्या भाषेंत देव आणि दहीं एक च आहे.'

ज्ञानदेव म्हणतो—ईश्वराचा जेव्हां ध्यास लागतो तेव्हां सर्व पदार्थांना तो आपलें च रूप देत असतो. मग मी हि नाहीं आणि माझा व्यवहार हि नाहीं.

९३

**याति कुळ माझें गेलें हारपोनि । श्रीरंगावांचूनि आन नेणें**
**किती वो शिकवाल मज वेळोवेळां । मी तया गोवळा रातलिये**
**भोग हे भोगणें मातें नाहीं चाड । भक्ति-प्रेम गोड लेइलें माये**
**रखुमादेवी-वरु जीवींचा जिव्हाळा । कांहीं केलिया वेगळा नव्हे गे माये**

"मीं तर त्या गोपाळाला वरलें आहे."

"त्याला वरून काय करशील ? त्याला ना जात ना कुळ."

"मीं त्याला मनानें वरलें त्या क्षणीं च माझें हि जातकुळ संपलें आहे. आतां तुमच्या शिक्षणाचा मला काय उपयोग ?"

"हो, पण लोक वाळींत टाकतील, आणि संसाराचें सुख गमावून बसशील."

"पण सुखाची चाड असेल तर ना ? चाड आहे भक्तिप्रेमाची. तें तर गोड च गोड,—मी अंगभर लेइलेली आहें. आतां तो जिव्हाळा कसल्या हि धाकानें कसा दूर होणार ?"

## अध्याय १३

९४

**तूझी सेवा करीन मनोभावें वो । माझें मन गोविंदीं रंगलें वो**
**नवसीं ये नवसीं ये । माझे नवसीं ये वो**
**बाप रखुमादेवी-वरे विठ्ठले वो । चित्त-चैतन्य चोरूनि नेलें वो**

मला केवळ गोविंदाचा ध्यास लागला आहे. माझें चित्त आणि चैतन्य दोन्ही त्यानें जणूं चोरून नेलीं आहेत. आतां मला दुसरें चिंतन करण्याची सोय नाहीं. पण अजून त्याचें मला दर्शन नाहीं. मी त्याला म्हणतों— माझ्या नवसाला ये, मला दर्शन दे. म्हणजे मग निरंतर मनोभावानें मी तुझी सेवा करीत राहीन. दर्शनाशिवाय सेवा कशी करतां येईल? दर्शन नसतांना च मी सेवा करायला जाईन, तर ती अ-सेवा नाहीं होणार?

## ९५

**रंगा येईं वो येईं वो येईं**
**विठाई किटाई माझे कृष्णाई कान्हाई**
**वैकुंठ-वासिनी वो जगत्र-जननी**
**तुझा वेधु ये मनीं**
**विश्व-रूपें विश्वं-भरे कमल-नयने कमलाकरे वो**
**तूझें ध्यान लागो बाप रखुमादेवी-वरे वो**

हे माझे आई! तूं माझ्या हृदयांत येऊन रहा. प्रेमरूप वैकुंठांत राहणें तुला आवडतें, असें मी ऐकतों. आणि माझ्या हृदयांत तुझ्या प्रेमा-शिवाय कांहीं च नाहीं. म्हणून तिथें तूं अवश्य येऊन रहा. तूं या विश्वाची जननी आहेस, तूं स्वतःच विश्व-रूपिणी आहेस. विश्वाचें भरण करणारी तूं च आहेस. कमलवत् निर्लिप्त नेत्रांनीं तूं ह्या विश्वाचें कौतुक पाहणारी साक्षि-रूपिणी आहेस. निर्लिप्ततेची तर तूं खाण च आहेस. माझ्या हृदयांत राहण्यानें तुला तर लेप लागणार च नाहीं. आणि मी मात्र तुझ्या स्पर्शानें तुझें ध्यान लागून तुझ्यासारखा होऊन जाईन.

९६

गोपाळा रे तुझें ध्यान लागो मना
आनु न विसंबें हरी जगत्र-जीवना

सोनियाचा दिवस आजि अमृतें पाहला
नाम आठवितां रूपीं प्रगट पैं जाला

तनु मनु शरण विनटलों तुझां पाईं
रखुमादेवी-वरावांचुनी आनु नेणें कांहीं

इतर सर्व आधार सोडून दिल्यामुळें ईश्वराचें ध्यान लागण्याला आतां कांहीं च अडचण उरली नाहीं. आजचा दिवस फार भाग्याचा आहे. आज नाम-स्मरणाबरोबर त्याचा अर्थ हि प्रगट झाला आहे. मुखानें नाम घ्यावयाचें, म्हणजे त्याबरोबर आपलें शारीरिक जीवन आणि मानसिक चिंतन ईश्वराच्या चरणीं वहावयाचें. मन, वाणी आणि शरीर तिन्ही अंगें ईश्वरी प्रेमानें भरून काढावयाचीं. आज माझी तशी भावना झाली आहे. म्हणून आतां तुझें च ध्यान लागो, असें मी त्याला दृढनिश्चयानें म्हणत आहें.

९७

माझे जीवींची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी
पांडुरंगीं मन रंगलें । गोविंदाचे गुणीं वेधलें
जागृति स्वप्न सुषुप्ति नाठवे । पाहतां रूप आनंदीं आनंद सांठवे
रखुमादेवी-वर सगुण निर्गुण । रूपें विटेवरी दाविली खूण

आम्हा भक्तांच्या दृष्टीनें निर्गुण, सगुण आणि साकार तिन्ही एका श्रीमूर्तींत सांठविलेलीं आहेत. सुषुप्तींत निर्गुण अनुभवावें. स्वप्नांत सगुण भावावें. जागृतींत साकार पहावें. पण त्या श्रीमूर्तीच्या दर्शनापुढें आम्हाला

हीं तिन्ही आठवत नाहींत. आमच्या हृदयाची आवड ही च, कीं त्याच्या यशाची ध्वजा जगभर मिरवावी आणि भक्तांच्या मेळाव्यांत रोवावी.

९८

**अवघां डोळां तुज म्यां पाहावें । अवघां श्रवणीं तुज चि ऐकावें**
**अवघी मूर्ति तुज पैं ध्यावें । अवघां चरणीं तुझां पंथीं चालावें**
**रखुमादेवी-वरु अदट दाविला । माझां देहीं देखिला ब्रह्माकारें**

ईश्वराविषयीं मला कांहीं च डळमळीतपणा उरलेला नाहीं. कारण, माझ्या देहांत मी त्याला प्रत्यक्ष च अनुभवीत आहें. यापुढें सर्वांच्या सर्व इंद्रियांनीं मीं त्याला अनुभवावें एवढी च एक हौस आहे.

९९

**अवघा चि संसार सुखाचा करीन । आनंदें भरीन तिन्ही लोक**
**जाईन गे माये तया पंढरपुरा । भेटेन माहेरा आपुलिया**
**सर्व सुकृताचें फळ मी लाहीन । क्षेम मी देईन परब्रह्मीं**
**रखुमादेवी-वरा विठ्ठलाची भेटी । आपुले संवसाटीं करुनी ठेला**

“सृष्टि आणि संसार सर्व सुखमय करीन” ही माझी प्रतिज्ञा आहे. त्यासाठीं संतांच्या मेळाव्यांत जाईन. हृदय-पुंडरीकाचा ठाव घेईन, नाना साधनें करीन, आणि सर्व साधनांचें फल स्वरूप ईश्वर-दर्शन प्राप्त करीन. मग त्याची भेट झाल्यानंतर प्रत्येक पदार्थावर त्याचा च रंग चढेल आणि मी च लोपून माझी प्रतिज्ञा पूर्ण होईल.

१००

माझिये हृदयीं बुंथी । ते डोळां सगुण-प्रीति
वाचे नाम-संपत्ति । ऐसें चि असो

म्हणोनि रखुमादेवी-वरा । विठ्ठला उदारा
भावें जोडलासि आम्हां
श्रुति पुराणें वर्णिती । नेति नेति तुझा महिमा

तुझें नाम रूप सुंदर । हें चि निरंतर
देईं आम्हां सर्वोत्तम रया

परमेश्वरा ! तूं निर्गुण, निराकार, केवळ अनिर्वाच्य. तुझा महिमा आमच्या हृदयाला कसा आकलन होणार ? तूं आमच्या डोळ्यांना कसा दिसणार ? तुझें वर्णन आम्ही आमच्या तुटपुंज्या वाणीनें काय करणार ? जिथें वेद-पुराणांना हि नेति नेति म्हणावें लागलें, तिथें आमचा काय पाड ?

पण म्हणून तर तूं भक्तांच्या भावनेला वश होऊन आमच्यासाठीं उदारपणानें सगुण, साकार, सुलभ झाला आहेस. आतां आम्ही आमच्या हृदयाला तुझ्या ध्यानाचें पांघरूण घालूं शकतों. डोळे भरून तुला पाहूं शकतों. वाणीनें तुझें नाम गाऊं शकतो. निर्गुण तर तूं आहेस च. पण जोंपर्यंत आम्हाला हे डोळे आणि ही वाणी लाभली आहे, तोंपर्यंत तुझें हें च सगुण सुंदर रूप आणि सर्वोत्तम मधुर नाम आम्हाला निरंतर लाभो, अशी आमची प्रार्थना आहे.

# प्रकरण तिसरें : दर्शन

## अध्याय १४

### १०१

हरि आला रे हरि आला रे । संत-संगें ब्रह्मानंदु जाला रे
हरि येथें रे हरि तेथें रे । हरिविण न दिसे रितें रे
हरि आदी रे हरि अंतीं रे । हरि व्यापक सर्वां भूतीं रे
हरि जाणा रे हरि वाना रे । बाप रखुमादेवी-वरु राणा रे

ज्ञानदेवाला ईश्वराचा सगुण साक्षात्कार पहिल्या प्रथम झाला, त्या प्रसंगाचें वर्णन ज्ञानदेव करीत आहे.

सर्व संतांना बरोबर घेऊन ईश्वर मला भेट देण्यासाठीं आला आहे. संतांच्या संगतीमुळें च मला एवढा आनंद लाभूं शकला. दिक्-कालानें निर्माण केलेले सारे भेद आतां मावळले. सर्व भूतांमध्यें हरीशिवाय कांहीं उरलें नाहीं. सर्व बुद्धि-शक्तीनें त्याला जाणावें, आणि सर्व वाक्-शक्तीनें त्याला वर्णावें, याशिवाय आतां दुसरें काम नाहीं.

### १०२

आजि सोनियाचा दिनु । अमृतातें वर्षे घनु
सबाहेजु अभ्यंतरीं । अवघा व्यापक मुरारी
दृढ विटे मन-मुळीं । विराजित वनमाळी
बरवा संत-समागमु । प्रगटला आत्मा-रामु
बाप रखुमादेवी-वरु । कृपा-सिंधु करुणाकरु

आजचा दिवस निःसंशय सोन्याचा दिवस आहे. कारण, आज धर्म-मेघरूप समाधीच्या अमृताची वर्षा होऊन राहिली आहे. विटेवर

भक्त-वत्सल उपास्य देवता उभी आहे. ती च हृदयाच्या गाभाऱ्यांत दर्शन देऊन राहिली आहे. आणि ती च व्यापक विश्व-रूपांत प्रकट झाली आहे. एवढी त्रिविध प्रतीति एकवटल्यानंतर आणखी कोणत्या कृपेची अपेक्षा करावी ?

## १०३

**इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं । तयाचा वेलु गेला गगनावेरी**
**मोगरा फुलला मोगरा फुलला । फुलें वेचितां भार कळियांसि आला**
**मनाचिये गुंती गुंफियेला शेला । बाप रखुमादेवी-वरीं विठ्ठलीं अर्पिला**

निवृत्तिनाथांनीं एक लहानसें च दिसणारें आत्मज्ञानाचें बीज पेरलें त्यांतून एक जीवनव्यापी उपासनेची वेल अंकुरित होऊन आकाशावर चढली. बघतां बघतां तिला विविध विचाररूपी असंख्य फुलें लागलीं. जितकीं वेचावीं, तितकीं नवीन येत च आहेत ! हीं विचार-कुसुमें मननाच्या गुंफणींत गुंफण्याचें भाग्य, ज्ञानदेव म्हणतो, मला लाभलें. ज्ञानदेवानें त्यांचा सुंदर हार रचून तें उत्तरीय भगवंताला समर्पित केलें आहे.

## १०४

**गुजगुजीत रूप सांवळें सगुण । अनुभवितां मन वेडें होय**
**भ्रमर-गुंफा ब्रह्म-रंध्र तें सुरेख । पाहतां कौतुक त्रैलोक्यीं**
**आनंद-स्वरूप प्रसिद्ध देखिलें । निजरूप संचलें सर्वां ठाईं**
**ज्ञानदेवो म्हणे या सुखाची गोडी । अनुभवाची आवडी सेवी रया**

जीव-भ्रमराचें चित्त कशांत गुंतलेलें असतें ? —सुखानुभवाच्या गोडींत. पण आम्हाला तर सर्व सुखाची मूस, आनंदाचें जणूं रूप च असें ईश्वराचें सगुण दर्शन झालें आहे. योग्यांना त्यांच्या ध्यान-कालीं, ब्रह्म-

रंध्रांत तें सुख उपलब्ध होतें, तें च आम्हाला साकार मूर्तीच्या चिंतनानें तिन्ही लोकांत पहावयास सापडतें. मग आमची ती सगुण मूर्ति, आणि आम्ही स्वतः, आणि हें विश्व, तिन्ही एकरूप अनुभवून मन केवळ वेडें होऊन जातें.

## १०५

**सगुणाची सेज निर्गुणाची बाज । सांवळी विराजे कृष्ण-मूर्ति**
**मन गेलें ध्यानीं कृष्ण चि नयनीं । नित्यता पर्वणी कृष्ण-सुखें**
**हृदय-परिवरीं कृष्ण मनो-मंदिरीं । आमुचां माज-घरीं कृष्ण बिंबे**
**निवृत्ति निघोट ज्ञानदेवा वाट । नित्यता वैकुंठ कृष्ण-सुखें**

निर्गुणाची बाज मांडली आहे. तीवर सगुणाची शय्या रचली आहे. त्या शय्येवर साकार मूर्ति पहुडली आहे. असें हें विश्वाचें स्वरूप आहे. आमचें मन त्या मूर्तीच्या ध्यानांत रमलें आहे; डोळा तिच्या दर्शनांत; नव्हे, तिचें दर्शन च आमच्या डोळयांत. अंतःकरणाच्या आवारांत चिंतनाचें मंदिर, त्याच्या आंत जीवनाचें गर्भागार, आणि त्याच्या हि आंत ती मूर्ति—असा हा नित्यानंद आहे! निखळ वृत्ति-शून्यता ही त्या वैकुंठाकडे जाण्याची वाट ज्ञानदेव सतत चोखाळीत असल्यामुळें तो नेहमीं वैकुंठांत च असतो.

## १०६

**देहाचेनि दीपकें जंव पाहें सभोंवतें । तंव अवचितें ध्यान केलें**
**निराकार वस्तु आकारा आणिली । कृष्णीं कृष्ण केली सकळ सृष्टि**
**लय गेलें ध्यानीं ध्यान गेलें उन्मनीं । नित्य हरि-पर्वणी सर्वां रूपीं**
**रखुमादेवी-वर विठ्ठल अभय । भयाचें पैं भय हारपे कृष्णीं**

आत्मा प्रकाशरूप, पण सारा प्रकाश देहाच्या पडद्यानें झांकलेला. ही होती आमची जीव-दशा. पण उपासना-मूर्तीच्या चिंतनानें ती दशा

आतां पार पालटली आहे. आतां देह हा आत्म्याची ज्योत प्रकट करणारा एक दिवा च झाला आहे. त्या दिव्याच्या प्रकाशांत सभोंवार नजर टाकावी तर सगळीकडे दिवे च दिवे दिसतात. सर्वांचे देह जणूं आत्म-ज्योतीनें पेटलेले दिवे!

मग ध्यान कसलें करता? न करतां हि तें होत च आहे. निराकार वस्तु आकारांत लोपली होती, पण आतां ती च आकारांत प्रगट झाली आहे. आतां रज्जु-सर्प मावळला आणि सुवर्ण-कंकण उगवलें! एका कृष्ण-मूर्तीच्या चिंतनानें सारी च सृष्टि कृष्णमय करून टाकली. जगांत एक च वस्तु झाल्या-नंतर चित्त कुठें हि धावलें तरी एकाग्रता च! चित्त आवरून ध्यान करावें तरी ती च! आणि तें ध्यान विसर्जन करावें तरी पुन्हां ती च!

इतकें झाल्यावर सर्व च भय गेलें, किंबहुना भयाचें हि भय गेलें. म्हणून आतां खुशाल पूर्वीसारखें भ्यायला हि हरकत नाहीं! जीं भयें साधका-वस्थेंत योग्य होतीं, तीं सिद्धावस्थेंत संभाळलीं म्हणून तरी काय बिघडलें?

## १०७

**जागृति पुसे साजणी । कवण बोलिलें अंगणीं**
**निरखितां वो नयनीं । वृंदावनीं देखियेला**

**स्वप्न सांगे सुषुप्ती । असे ममता हे चित्तीं**
**विठ्ठल होईल प्रतीती । मग गर्जती तुर्ये**

**मज बोलों नये ऐसें केलें । मन उन्मनीं वेधिलें**
**बाप रखुमादेवी-वरें विठ्ठलें । थितें नेलें ‘मी-माझें’**

जागृतींत कुठें पावलांचा आवाज ऐकतों. वाटतें, अंगणांत कोण बोललें? पहायला जातों तर अंगणाचें होतें वृंदावन, आणि माणसाचा होतो श्रीकृष्ण!

स्वप्नांत त्या च एका मूर्तीचीं चित्रें हलतांना दिसतात. लक्षांत येतें कीं, चित्राला दुसऱ्या कशाची च प्रीति उरलेली नाहीं.

झोंप लागते तर इतकी गाढ, कीं सारी अनुभूति कृष्णमय झालेली. कांहीं केल्या जागा च होत नाहीं. लोक 'ज्ञानदेवा ज्ञानदेवा' म्हणून हांका मारतात. पण ऐकतो कोण? म्हणून शेंवटीं विठ्ठलनामाची गर्जना करतात. तेव्हां ज्ञानदेव जागा होतो!

ज्ञानदेवाची दशा बोलून सांगण्यासारखी नाहीं.

## १०८

**तुझिये निडळीं कोटि चंद्र प्रकाशे**
**कमल-नयन हास्य-वदन हांसे**

**कृष्णा हाल कां रे कृष्णा डोल कां रे**
**घडिये घडिये घडिये गूज बोल कां रे**

**उभा राहोनियां कैसा हालविती बाहो**
**बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु नाहो**

देवा! कोटि कोटि चंद्रांची सौम्य प्रेममय कांति तुझ्या भाल-प्रदेशावर मी पाहत आहें. तुझें तें प्रसन्नतेनें हंसणारें मुख, तुझे ते निर्लिप्त निर्मळ नेत्र माझ्या समोरून कधीं च दूर होत नाहींत. पण तरी तेवढ्यानें माझें समाधान होत नाहीं. मला आतां तुझी हालचाल पहावयाची आहे. क्षणोक्षणीं तूं माझ्याशीं गुज-गोष्टी बोलत आहेस, असें मला हवें आहे. चिंतन-कालीन दर्शन पुरेसें नाहीं. सक्रिय आणि बोलणारें दर्शन हवें आहे.

इतकें म्हणतां च ज्ञानदेवाचें कोड पुरविणारा श्रीकृष्ण आपला हात हालवूं लागला!

१०९

देखिले तुमचे चरण । निवांत राहिलें मन
कासया त्यजीन प्राण । आपुले गे माये

असेन धणीवरी । आपुले माहेरीं
मग तो श्रीहरि । गीतीं गाईन गे माये

सकळ हि गोत माझें । पंढरीसि जाण
बाप रखुमादेवी-वरा । विठ्ठलाची आण

तुमचे चरण मीं पाहिले. माझें मन शांत झालें. मी आतां खुशाल या देहांत राहूं शकतों. कारण, देहांत असलों तरी मी आपल्या च ठिकाणीं असेन. आणि देवाचीं गाणीं गात राहीन. माझे सर्व नातेवाईक या संतांच्या मेळाव्यांत आहेत. देवाची शपथ आहे—मी प्राण-त्यागाची गोष्ट आतां यापुढें बोलणार नाहीं.

## अध्याय १५

११०

योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी
पाहतां पाहतां मना न पुरे धणी

देखिला देखिला माये देवाचा देवो
फीटला संदेहो निमालें दुजेपण

अनंत वेषें अनंत रूपें देखिलें तयासि
बाप रखुमादेवी-वरीं खूण बाणली कैसी

योगी विश्व बाजूला सारून परमेश्वराला पाहण्याचा प्रयत्न करतो. म्हणून त्याला तें जमत च नाहीं. उलट तत्त्व-विचारांचे नाना संदेह निर्माण होतात आणि

भेद अधिक च पक्का होतो. ज्ञानदेव म्हणतो, मीं ह्याच्या उलट प्रक्रिया करून विश्वासकट च ईश्वराला पाहून घेतलें. त्यामुळें अनंत रूपानें आणि अनंत वेषानें मला त्याचें दर्शन लाभलें; अणि निरंतर लाभत च आहे. पण इतकें असून दर्शनाची खुबी ही कीं विठ्ठल-मूर्तीची उपासनेची खूण मात्र लोपली नाहीं.

## १११

**रूप सामावलें दर्शन ठाकलें । अंग हारपलें ते चि भावीं**
**पाहों जाय तंव पाहणेयावेगळें । ते सुख-सोहळे कोण बोले**
**जेथें जाय तेथें मौन चि पडिलें । बोलवेना पुढें काय करूं**
**सरिता ना संगम ओघ ना भ्रम । नाहीं क्रिया कर्म तैसें जालें**
**जाणों जाय तंव जाणणेयासारिखें । नवल विस्मय देखें कवणा सांगों**
**बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु चि अंगीं । निवृत्ति-रायें वेगीं दाखविला**
**आदि-अंतीं तो चि सबराभरितु । रूप-नाम-रहितु नीच-नवा**

ईश्वराचें रूप आतां माझ्या च रूपांत सामावून गेलें आहे. त्यामुळें दशन हि कुंठित झालें आहे. एक भाव मात्र उरला, आणि देह हि त्यांत च जिरला. इकडे देह नाहीं, तिकडे देव नाहीं. अशी ही दशा आहे! प्रलय-कालीं सर्व जलमय झाल्यानंतर उगम नाहीं, ओघ नाहीं, संगम नाहीं. तद्वत् आतां पाहण्यासारखें नाहीं, बोलण्यासारखें नाहीं. करण्या-सारखें हि नाहीं.

पण म्हणून कांहीं च नाहीं असें मात्र नाहीं. आश्चर्याची गोष्ट हि कीं ज्ञान स्पष्ट आहे, जरी जाणायचें कांहीं नाहीं. आतांपर्यंत हृदयांत

आत्म-रूपानें ईश्वराला पाहत होतों, पण निवृत्तिनाथांच्या बोधाचा चमत्कार असा कीं आज देहाचें अंग अंग च तो बनला आहे! त्याला नांव ना रूप. पण आज त्यानें सर्व नामें आणि सर्व रूपें घेतलीं आहेत. आणि रोज नवीं नवीं घेत च आहे, अंतीं तो च आहे, आणि मधें हि घनदाट तो च भरला आहे !

## ११२

**सुख सोज्वळ मोतियाचें लेणें । दिधलें जाईजणें बाइये वो**
**देशीं नाहीं देशाउरीं नाहीं । हाटणीं नाहीं तें पाटणीं नाहीं**
**लक्षाचेनि लाभें जोडलें निधान । बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु जाण**

लक्षाची किंमत देऊन मुलखावेगळी अमूल्य वस्तु मिळविली आहे. पण मालकी मात्र एका क्षणापुरती च आहे. दुसऱ्या क्षणाला मालकी हवी असेल तर पुन्हां लक्ष द्यावें लागेल. प्रत्येक क्षणीं नवें नवें लक्ष आणि प्रत्येक क्षणीं नवा नवा मालकी हक्क!

## ११३

**सुंदर सुरेख ओतिलें, पर-ब्रह्म-तेज फांकलें**
**तें व्योमीं व्योम सामावलें, नयनीं वो माये**

**कमल-नयन, सुमन फांकलें**
**तें परिमळाथिलें, मकरंदीं वो माये**

**संकोचला संसार, पारुषला व्यवहार**
**ब्रह्मानंद अपार, जाला वो माये**

**मधुर वेद-वाणी, न पवे जयाचे गुणीं**
**ते ठाकविले निर्वाणीं, नेति नेति वो माये**

यापरौतें बोलणें, न बोलणें होणें
तें म्यां आपुलें आंगवणें, केलें वो माये

ऐसियां तो ओठीं, लागलें तयापाठी
रखुमादेवी- वरीं भेटी, विठ्ठलीं वो माये

ज्ञान-योग्याचें निर्गुण निराकार ब्रह्म जणूं फुलझाडाचें बीज आहे. ध्यान-योग्याचा सगुण निराकार परमेश्वर फुलझाडाची कळी. आम्हा भक्तांचा सगुण साकार विश्व-व्यापक विष्णु उमललेलें फूल आहे. त्याच्या परिमळानें ही सर्व सृष्टि दरवळून गेली आहे. त्याच्या कांतीनें सर्व विश्व रमणीय झालें आहे.

कमल-नयनाची ती कांति आज सारीच्या सारी माझ्या नयनांत जिरली आहे. पाण्यांत पाणी मिसळण्याची उपमा उपनिषदांनीं दिली आहे· पण माझी स्थिति आकाशांत आकाश कालवल्यासारखी झाली आहे! ब्रह्मानंदानें सर्व सृष्टि व्यापल्यामुळें संसाराला रहायला जागा च उरली नाहीं.

एवढे मधानें भरलेले वेद, पण त्यांनीं हि त्याची गोडी वाखाणण्याच्या प्रयत्नांत हार खाऊन 'नेति नेति' म्हणून स्वस्थ बसावें. कारण, बोलण्यासारखें तें स्वरूप च नाहीं. पण हस्त-गत मात्र तें होऊन चुकलें आहे. इतक्या हि उपर माझें बोलणें ओसरत नाहीं आणि शोध चालू च आहे !

विठ्ठलाच्या भेटीचा चमत्कार च हा कीं लब्धीनंतर हि शोध चालू च रहावयाचा!

## ११४

स्व-रूपाचेनि भानें बिंब हें ग्रासिलें
परी खूण न बोले काय करूं

रूपाचा दर्पण रूपेंविण पाहिला
द्रष्टा हि निमाला नवल काई

जिकडे जाये तिकडे दर्शन सांगाती
उदो ना अस्तु हे नाहीं द्वैत-स्थिति

रखुमादेवी-वरु विठ्ठलु चि एक
भोगी सम सुख एकपणें

ईश्वर-स्वरूपाच्या अनुभूतीबरोबर हें संपूर्ण जगद्बिंब ग्रासल्यासारखें झालें. म्हणजे काय?—कांहीं च दिसेनासें झालें? कीं वेगळें कांहीं दिसूं लागलें? त्याची अशी कांहीं च खूण सांगतां येण्यासारखी नाहीं. जग म्हणजे आपलें रूप पाहण्याचा आरसा च आहे. जसें आपण तसें जग. अ-रूपानें आरशांत पाहिलें. अर्थात् जगाची दृश्यता लोपली. आणि पाहणाऱ्याचा द्रष्टेपणा हि गेला. दृश्य आणि द्रष्टा वगळून केवळ दर्शन च उरलें. कुठें हि तें आहे च आहे.

त्याला उदय नाहीं, अस्त नाहीं; समाधि आणि व्युत्थान ही भानगड नाहीं. कांहीं वेळ स्फूर्ति आणि कांहीं वेळ अस्फूर्ति, असलें द्वैत नाहीं. जगांत असंख्य जीव उरले च नाहींत. एक च एक विठ्ठल आहे. आणि तो सुख-साम्याचा अनुभव अखंडपणें घेऊन राहिला आहे!

११५

कोटीची भरोवरी सरोनि गेली शरीरीं
संसाराची उरी कांहीं नुरे चि गे माये

लक्षाचा लाभ मज घडला गे माये
कवणें उपायें चरण जोडिले वो

चिंतनीं चिंतितां काय चिंतावें
तें अवघें चि मनीं रूप गिळालें गे माये

बाप रखुमादेवी-वरु देहेंविण आलिंगिला
तो समर्थ माल्हाथिला बाइये वो

कोटि कोटि जन्म आचरलेली साधना या देहांत आतां चरितार्थ झाली, संपून गेली. कारण, साधनेची तलवार चालवायला समोर संसार च उरला नाहीं! निरंतर लक्ष लावून अविच्छिन्न उपासना केल्याचा हा लाभ मला लाभला. कोण्या उपायानें हे चरण जोडले, असें विचारूं च नका! कोणता उपाय केला नाहीं, असें विचारा.

आतां चिंतन कसें करायचें? चिंतन करायचें म्हणजे कांहीं वगळावें लागतें, कांहीं धरावें लागतें. ती तर आतां सोय च नाहीं. कारण, हें सगळें च हरि-स्वरूप म्हणून चित्तांत ठसून गेलें आहे, चित्तानें जगं गिळून टाकलें आहे. देह फेकून देऊन मी त्याला कवटाळून चुकलें आहे. आणि तो परम-समर्थ माझ्या ठिकाणीं जिरून गेला आहे!

## अध्याय १६

### ११६

सुखाचा निधि सुख-सागर जोडला
म्हणोनि काळा दाढुला मज पाचारी गे माये

प्रेम नव्हाळी, मज जाली दिवाळी
काळे वनमाळी आले घरा गे माये

बाप रखुमादेवी-वरु पुरोनि उरला
सबाहेजु भरला माझे हृदयीं गे माये

तो आनंदाचा ठेवा, आनंद-समुद्र, आज मला परिपूर्ण वश झाला आहे. म्हणून मी त्याच्याकडे जाण्याऐवजीं तो च माझ्याकडे येऊन मला हांक मारीत आहे! आज मला खरोखर दिवाळी आहे.

प्रेमाची केवढी नवलाई, कीं संसाराचा रंग ज्याला कधीं च लागला नाहीं, आणि संसाराच्या गांवाबाहेर च ज्याचा संचार, तो आज माझ्या घरीं आला आहे! घरीं येऊन सारें घर त्यानें व्यापिलें आहे. आणि तरी हि जागा अपुरी पडून शेंवटीं माझें हृदय त्यानें अंतर्बाह्य भरून टाकलें आहे!

### ११७

पांचासहित लयातीत जालियें वो
प्रेम भक्ती अनुसरलियें काळया रूपासि वो

ठाईंचा चि काळा अनादि बहु काळा
म्हणोनि वेदा चाळा लाविला गे माये

बाप रखुमादेवी-वरें जन्मावेगळें पैं केलें
म्हणोनि आज जालियें बाइये वो

पांची इंद्रिय-वृत्तींचा निरोध करून समाधि साधायची असते. पण मीं तर त्या समाधीला हि मागें सारून ईश्वराच्या सगुण स्वरूपाला, कृष्ण-मूर्तीला, वरलें आहे. सर्व इंद्रिय-वृत्ति त्यास समर्पून प्रेम-स्वरूप भक्ति साधली आहे.

कृष्ण हा नांवाप्रमाणें खरोखर च काळा आहे! महामायावी आहे! प्राचीन काळापासून, अनादि काळापासून तो तसा च आहे. म्हणून तर वेदासारख्यांना त्यानें वेड लावलें आहे! त्यानें मला संसारांतून सोडविलें, जन्म-मरणापासून विभक्त केलें, म्हणून मी त्याची एकनिष्ठ भक्त होऊं शकलें!

## ११८

**काळा लपंडाई काळे रात्रीं खेळे**
**मी स्व-सवें वेधिली जाय काळचा छंद**

**काळें निळें हें अभ्र भासलें**
**ऐसें रूप देखिलें निर्गुणाचें**

**ऐसा हा सांवळा माझिये दृष्टी माल्हाथिला**
**उजरूनि गेला हा विठ्ठलु गे माये**

**ऐसें भुलविलें जाण काळेपणें आपणें**
**रखुमादेवी-वरु जाणें येर कांहीं नेणें**

मायेची काळी रात्र पसरली आहे, आणि तो मायावी प्रभु तसलें च काळें रूप घेऊन लपंडाव खेळून राहिला आहे. काळयांत काळें लपून जातें आणि ओळख कुणाला च पटत नाहीं. पण मी मात्र नेमकी आणि सहज त्याच्याकडे ओढली जाते. काळी रात्र मला आडवी येत नाहीं.

आकाशाच्या निळ्या भूमिकेवर पाण्यानें भरलेले काळे मेघ जसे खुलून दिसतात, तसें मला त्याचें रूप दिसलें. तो तर निर्गुण, त्याला रूप कसलें? पण शून्य आकाशावर हि निळा रंग उमटतो आणि तो च मेघाच्छन्न होऊन काळाभोर बनतो; तसा निर्गुणाचा सगुण आणि सगुणाचा सुंदर साकार बनलेला तो श्याम माझ्या दृष्टीला वश झाला, माझ्या दृष्टींत जणूं जिरून गेला!

तेव्हांपासून त्याचा लपंडाव चालेनासा होऊन मला तो अगदीं सरळ होऊन गेला. काळेपणाच्या साम्यामुळें माया आणि मायावी यांतील भेद ओळखतां न आल्याकारणानें आजवर त्यानें खूप च भ्रमांत टाकलें होतें. पण दृष्टीच्या प्रकाशानें तो भेद उजळून दाखविल्यामुळें मी आतां मायावीला च ओळखतें, मायेला ओळखत च नाहीं.

## ११९

**मन मुरडोनि डोळां लेइलें । काळेपणें मिरवलें रूप तयाचें**
**बरवें रूप, काळें अमोलिक । म्हणोनियां सांगतसें शुद्ध भावें**
**रखुमादेवी-वरु अगाध काळें । म्हणोनि सर्वत्र अर्पियेलें**

मागें ईश्वराचें ध्यान करीत होतों. होतां होतां मन अंतरात्म्यांत इतकें लीन होऊन जाई, कीं तें कांहीं केल्या बाहेर येऊं च नये. पण आतां मात्र अगदीं च उलट झालें आहे. जेव्हांपासून जगभर कृष्ण-मूर्ति प्रगट झाली, तेव्हांपासून मन परतून डोळ्यांत येऊन बसलें आहे. जणूं डोळा च तें बनलें आहे.

हरीचें तें उज्ज्वल अमूल्य रूप पाहत च रहावें. कसें आहे तें रूप?—तें आहे काळें-कुळकुळीत! ( मी विनोदानें म्हणत नाहीं, सरळ भावानें म्हणतों.) आणि तें पुनः थोडें थोडकें नाहीं, गडगंज भरलेलें आहे. त्याच्या एका कुंचल्यानें सारें जग रंगलेलें आहे!

माया ईश्वराला झांकून टाकते म्हणून ती कुरूप काळी. ईश्वर त्या मायेस झांकून टाकतो म्हणून तो उज्ज्वल काळा.

## १२०

**काळा पुरुष तो हा गगनीं जो नांदे । अनुभवाचे भेदें भेदला जो**
**भेदूनि अभेद अभेदूनि भेद । सच्चिदानंद जेथें नाहीं**
**ज्ञानदेव तेथें अक्षय राहिला । आत्मा म्यां पाहिला या दृष्टीसीं**

परमेश्वर तो, जो या हृदयाकाशांत नांदतो. तो च महाकाशांत नांदतो. अखंड एक-रस. परंतु ज्याच्या त्याच्या दृष्टि-भेदानें त्याविषयीं वेगवेगळा अनुभव येतो. कुणाला तो सत् भासतो, कुणाला चित्, कुणाला आनंद. आणखी कुणाला तो सच्चिदानंद-स्वरूपांत दर्शन देतो. वस्तुतः तो या हि पलीकडचा म्हटला पाहिजे.

पण त्याचें वर्णन करायला शब्द च अपुरे आहेत. म्हणून सारे च शब्द-वाद सोडून त्याच्या ठिकाणीं अखंड निवास करावा, हें च सार आहे. ज्ञानदेव म्हणतो, ही दृष्टि लाभल्यामुळें भेद आणि अभेद ह्यांचें कोडें उलगडून मला त्याचें आत्म-रूपानें निरंतर दर्शन होत असतें.

## १२१

**निळें हें व्योम निळें हें सप्रेम । निळेपणें सम आकारलें**
**नीळ-वर्ण ब्रह्म नीळ-वर्ण कर्म । नीळ-वर्ण आश्रम गुरु देखें**
**निळेपणें वर्तों निळेपणें खातों । निळेपण पाहतों निळेपणें**
**ज्ञानदेव आला नीळ-वर्ण शाळा । निळेपणें गोवळा रातलियें**

ध्यानावस्थेंत योग-मायेनें वेढलेल्या ईश्वराचा, कृष्ण-वर्ण-साक्षात्कार होत असतो. तसा आकाश-प्रतीक-द्वारा त्याच्या व्यापकतेवर धारणा-ध्यानादि

करीत असतांना त्याचा नील-वर्ण-साक्षात्कार हि होत असतो. तो अनुभव वर्णीत असतां ज्ञानदेव म्हणतो—

ईश्वर-स्वरूप निळें च निळें दिसून राहिलें आहे. आकाशाप्रमाणें व्यापक. पण आकाश पोकळ असतें तसें पोकळ नव्हे, प्रेमळ! पण प्रेमांत पक्षापाताची कल्पना येऊं पाहते तसें हि नव्हे, समत्व-युक्त! अशा त्या प्रातिभ दर्शनांत सर्व साधना निळया रंगानें रंगलेली. सारे व्यवहार हि त्या च रंगांत. ज्ञानदेव जणूं नील-वर्णाच्या शाळेंत शिक्षण घेऊन राहिला आहे! गोपी श्रीकृष्णाच्या नील-वर्णाच्या ध्यासानें स्वतः तशी च बनून त्याच्याशीं समरस झाली—ती च ही स्थिति!

## १२२

**नीळ-वर्ण रजें नीळ-वर्ण बुझे । नीळिमा सहजें आकारिली**
**नीळ-प्रभा दिसे नीळपणें वसे । नीळिये आकाश हारपलें**
**निळेपण ठेलें नीळिये गोविलें । निळेपण सोंवळें आम्हां जालें**
**ज्ञानदेवो निळा पर-ब्रह्मीं गोविला । कृष्ण-मूर्ति सांवळा हृदयीं वसे**

निळा आरसा समोर मांडला आहे. त्याला निळया रंगाचा लेप दिला आहे. आंत निळया रंगाचा चेहरा दिसूं लागला आहे. मधलें आकाश हि निळया रंगांत लोपलें आहे. निळें व्हावें, निळयांत रमावें, निळयामध्यें पावन व्हावें. असा हा हरि-रंग ज्ञानदेवाच्या हृदयांत भरला आहे.

## १२३

**काळें ना सांवळें, श्वेत ना पिवळें**
**नाद-बिंदांहूनि वेगळें तें कवण रे चांगया**
**गोडापरिस गोड, गगनाहूनि वाड**
**चवदा भुवना जयाची चाड तें कवण रे चांगया**

**ज्ञानदेवीं मानवलें, माझें मज सांगितलें**
**दोहीं मिळोनि एक जालें भलें केलें चांगया**

एकदां ज्ञानदेव आणि चांगदेव एकमेकांच्या आध्यात्मिक अनुभवांचा पडताळा घेत असतां ज्ञानदेवानें चांगदेवास विचारलें—

" ध्यानावस्थेंत जें विविध-भाव-सूचक विचित्र वर्णांनीं नटतें, जें अंतर्नाद ऐकवितें, जें तेजो-बिंदु रूपानें दोन्ही भुवयांच्या मध्यें नाचूं लागतें, आणि थोड्या च वेळांत शांत होऊन या सर्वाला लटकें पाडतें, तें तत्त्व कोणतें? जें प्रियाहून प्रियतर वाटतें, गगनाहून विशाल भासतें, त्रि-भुवनाला ज्याची अत्यंत गरज असून उपलब्धि नाहीं, तें तत्त्व काय आहे?"

चांगदेव म्हणाला—मला वाटतें आपण च तें आहोंत. ध्यान ही आपली कल्पना-मात्र आहे. आणि सृष्टीची सर्व गोडी आपल्यांत च सांठविली आहे.

ज्ञानदेव म्हणाला— मला हें फार आवडलें. माझ्या मनांतलें च हें तूं सांगितलेंस. आतां मी आणि तूं एक झालों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि: ..................

## अध्याय १७

१२४

**मेरूपरतें एक व्योम आहे । तेथें एक पाहे तेज:पुंज**
**तेज नव्हे तेज:पुंज नव्हे । शीतल नव्हे शांत हि नव्हे**
**रखुमादेवी-वरु विठ्ठलु हि नव्हे । नव्हे तो होये चतुर्देहेंविण**

सर्वोच्च स्वर्गापलीकडे परम-साम्यरूप आकाश पसरलेलें आहे. आणि तेथें एक तेज पेटलेलें आहे. वस्तुतः त्याला तेज हि म्हणतां येत नाहीं, आणि पेटलेलें हि म्हणतां येत नाहीं. कारण 'तेज' म्हटलें म्हणजे प्रखरता

सूचित होते, आणि 'पेटल्या' नें सक्रियता. पण म्हणून त्याला शीतल किंवा शांत हि म्हणतां येणार नाहीं. कारण, तें प्रखरता पोटांत सांठवून शीतल आहे. त्याच्या शांतींत क्रियेची प्रचंड प्रेरणा भरलेली आहे. तें सगुण-शक्ति-युक्त निर्गुण आहे.

मग जर तें असें परस्पर-विरोधी उभय-शक्तींनीं संपन्न आहे, तर भक्तांच्या भाषेंत त्याला ईश्वर च कां म्हणूं नये?–'ईश्वर' म्हणत नाहीं, कारण ईश्वर म्हटल्यानें, उगी च हें सृष्टीचें आडंबर डोळयापुढें उभें राहतें!

मग शून्य च म्हणा ना?–शून्य म्हणजे 'नाहीं', असें जर समजणार नसाल तर शून्य म्हणायला हरकत नाहीं. कारण, तें आहे. तेजस्वी, शांत, उभयरूप, शून्य,– चारी प्रकारांहून वेगळें असें तें आहे.

## १२५

**दृष्टीचें सुख अंतरीं देख। ॐकार आरुष बोलतासी**
**नादुलें ऐकसी बिंदुलें न देखसी। कोंदलें चौपासीं सांवरेना**
**उफराटिये दृष्टी निवृत्तीचां शेंजारीं। ज्ञानदेवा भेटी होऊनि ठेली**

ध्यान-समाधींत मग्न होऊन राहणाऱ्या एका साधकास उद्देशून ज्ञानदेव बोलत आहे:—

दृष्टीचा आनंद निःसंशय आंत भरला आहे. अंतर्याम जितकें उज्ज्वल होईल तितकें जग हि मंगल होईल. आंतील आत्मा-रामाचें दर्शन झालें म्हणजे बाहेर हरि-स्वरूप भरलेलें दिसेल. नुसतें भरलेलें च नव्हे, पण भरून सांडूं लागलेलें. मग लक्षांत येईल, कीं आजपर्यंत तूं जें जें कांहीं बोलत होतास, आणि आज हि जगांत जें कांहीं बोललें जात आहे, तो नकळत बोबड्या भाषेंत 'ओंकार'- जप च आहे.

पण अजून तुझी ती स्थिति नाहीं. तूं अखंड अनाहत-ध्वनि तर ऐकून राहिला आहेस, तरी रूप-दर्शन तुला बिंदु-मात्र नाहीं. दृष्टि अंतर्मुख करून क्रिया-शून्य समाधि गांठावी, एवढें पुरेसें नाहीं. पुढें ती समाधि हि जिरून तिचें सहज-स्थितींत पर्यवसान व्हावें लागतें. पुन्हां दृष्टि परतवून ध्यान-वृत्तिरूप सापेक्ष निवृत्तीची समाप्ति करावी लागते. वस्तुतः ही च खरी निवृत्ति असते. नंतर डोळे उघडून खुशाल जगाकडे पहावें. रूप-दर्शनाला तोटा च नाहीं!

## १२६

**दूरीं ना जवळीं त्रिभुवन-मंडळीं । तें मनाचां मूळीं बैसलेंसें**
**पाहतां न दिसे भानु-प्रकाशें । येरव्हीं तें असे मशकीं रया**
**बोलों जातां जेणें जिह्वाचि खादली । पाहतां पाहतां नेली चर्म-दृष्टि**
**निवृत्ति-दास तुम्ही बहुत न बोला । रखुमादेवी-वरा ध्याइजेसु उगला**

ईश्वर दूर हि नाहीं, आणि जवळ हि नाहीं. त्याचा बाह्य जगांत शोध करणें च चुकीचें आहे. अंतःकरणाच्या अगदीं मुळाशीं त्याचें अधिष्ठान आहे. अंतर-वृत्तीनें पाहिलें तर तो सूक्ष्म जीव-जंतूंत हि, अणु-रेणूंत हि, दिसून येईल. एरवीं बाह्य दृष्टीनें, विज्ञानाच्या प्रकाशांत, किती हि शोध घेतला तरी तो दिसणार नाहीं.

त्याला पाहण्यास दृष्टि निरुपयोगी; कारण, तो च दृष्टीचा द्रष्टा. त्याचें वर्णन करण्यास वाणी कुचकामाची; कारण, तो च वाणीचा वक्ता. म्हणून ज्ञानदेव म्हणतो, "आध्यात्मिक चर्चा फार करूं नका!" हृदयाधिष्ठित परमेश्वराला शांतिपूर्वक निहाळूं या, ध्याऊं या.

१२७

**चंचळ चांदणें सोमेंविण भासलें । तेज निमालें रवि-बिंबेंविण**
**जगत्र-जीवनु म्हणे जगासि कारण । तें अणु-प्रमाण तेथें दिसे**
**रखुमादेवी-वरु अणु-प्रमाण भासला । सगुण निर्गुण जाला बाइये वो**

मनोरूप चंद्र लोपला आहे. पण अनेकविध मंगल-भावनारूप तारकांचें सौम्य चांदणें लुकलुकत आहे! तर्क-रवि तर केव्हां च अस्तवल्यामुळें विचारांचे किरण पार मावळले आहेत! अशा त्या निर्विचार प्रसन्न अवस्थेंत एक अणु-प्रमाण परम-सूक्ष्म स्वरूप ज्ञानदेवाला दिसून राहिलें आहे. तिन्ही जगाचें जीवन, विश्वाचें आदि-कारण म्हटलेला तो माया-पति भगवान्, एका ल्हानशा बिंदूंत सांठविला आहे! त्यांतून च विश्व-रूप सगुण आणि विश्वातीत निर्गुण फांकलें आहे!

१२८

**निशियेचे भरीं, भानु प्रतिबिंबीं बिंबला**
**बिंब चि गिळूनि ठेला, बिंबामाजीं**

**रात्रीं सूर्य वाहे, दिनु चंद्र जाये**
**विपरीत गे माये, देखियेलें**

**उदो ना अस्तु, तेथें कैंचेनि त्रि-गुण**
**आपण चि दर्पण, होऊनि ठेला**

**ज्ञानदेवो म्हणे, अनुभवी तो जाणे**
**संत तिये खुणें, संतोषले**

समाधीच्या खोल अवस्थेंत काय पाहिलें?----परमात्मा आपल्या प्रतिबिंबांत, जीव-स्वरूपांत, मिसळून गेला; आणि हें सर्व जगद्-बिंब गिळून तो पुन्हां आपल्या मूळ स्वरूपांत प्रकाशूं लागला!

अशा प्रकारें जीव ईश्वर-स्वरूप आहे आणि जग मिथ्या आहे अशी प्रतीति आली, म्हणजे जीवनाचें स्वरूप च पालटतें. दिवस फिक्का पडतो, रात्र उज्ज्वल होते. सर्व च मूल्यें विपरीत होतात. वृत्तींचे उदयास्त मावळतात. अर्थात् त्रि-गुणांचा खेळ च संपतो. वृत्तींचा चढ-उतार च नाहीं, मग त्रि-गुण काय करणार? मनुष्य जगूं आरसा होऊन बसतो. स्वतःला विकार च नाहीं; इतरांच्या विकारांचें नेमकें माप पाहून घ्यावें !

ज्ञानी मनुष्याची ही खूण च आहे, कीं जगाचें स्वरूप जें जगाला कधीं च कळत नाहीं, तें त्याच्या निर्विकार बुद्धींत नेमकें उमटतें! ज्ञानदेवानें सांगितलेली ही खूण ऐकून निवृत्तिनाथांना संतोष वाटला.

## १२९

**अनुपम्य तेजें धवळलें ब्रह्मांड । विश्व-रूपीं अखंड तदाकार**
**रसीं रस मुरे प्रेमाचें स्फुंदन । एक-रूपी घन हरि माझा**
**नाद आणि ज्योति परिपूर्ण आत्मा । परेसि महात्मा उजेडला**
**निवृत्ति-उपदेश ज्ञानिया लाधला । तत्त्वीं तत्त्व बोलिला ज्ञानदेवो**

साऱ्या जगावर अद्भुत कांति पसरली. घनदाट हरि-प्रभेनें ब्रह्मांड धवळलें! विश्वाकाराच्या मुसेंत तदाकारता, हरिमयता, ओतली ! त्याला हि खंड नाहीं, आणि हिला हि खंड नाहीं. ब्रह्म-रसांत जीवन-रस मुरला. सारें जीवन म्हणजे जणूं प्रेमाचें स्फुंदन—प्रेम-प्रकाशन !

अंतर्यामांत अखंड अंतर्नाद ऐकूं येत आहे, बाहेर भूतमात्रीं हरि-ज्योति दिसत आहे, असा अंतर्-बाह्य हरीनें वेढलेला तो पूर्ण पुरुष. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तिन्ही अवस्था त्याला वरून वरून येवोत, पण अंतरनुभवानें तो महान् आत्मा ह्या तिन्हींहून वेगळा च आहे ! त्याला कायमचें उजेडलें आहे. निवृत्तिनाथांची ही कृपा आहे, जी ज्ञानदेवाकडून एवढें तत्त्व-सार बोलवीत आहे.

## अध्याय १८

### १३०

**विश्व-रूप पाहें तंव सभोंवतें रूपडें । पाहें चहूंकडे तें चि दिसे**
**काय करूं सये कैसा हा देव । माझा मज भाव एक तत्त्वीं**
**सम तेज पाहें तंव एक चि वो तेज । ॐकार सहज निमाला तेथें**
**मूळ चि मूळ खूण न सांपडे सर्वथा । व्यापिलें गे चित्ता तेजें येणें**
**ज्ञानदेवो निवृत्तीसि हे खूण पुसत । सांगावें त्वरित गुरु-राजें**

ज्ञानदेव आपला विश्वरूप-दर्शनाचा अनुभव सांगत आहे— विश्वरूप पाहूं लागलों, तर आधीं चारी बाजूला हरीचें रूप दिसूं लागलें. थोड्या वेळानें पालटत पालटत त्याचें माझ्या च रूपांत रूपांतर झालें. सगळीकडे मी च मी, एक च एक, माझी च मीं भक्ति करावी अशी पाळी आली. कांहीं वेळ तर दोन्ही स्वरूपांत साम्य होतें. पुढें दोन्ही मिळून एक च बनलें. साम्याची जागा ऐक्यानें घेतल्यानंतर ईश्वर-नाम हि लोपलें. भक्ति खुंटली. माझें चित्त माझ्यानें च व्यापलें.

सहन होईना. साम्यापर्यंत बरें होतें. देवाभक्तांचें अद्वैत असावें, पण वेगळेपणा ओळखण्याची थोडी खूण हि असावी, अशी मनाची हौस. त्याऐवजीं एकत्वाचा मारा झाल्यामुळें व्याकुळ होऊन, प्रथमदर्शनीं मी निवृत्तिनाथास म्हणूं लागलों—“ खूण कुठें आहे ? खूण दाखवा ! खूण दाखवा ! ”

### १३१

**विश्वाचें आर्त माझे मनीं प्रकाशलें । अवघे चि जालें देह ब्रह्म**
**आवडीचें वालभ माझेनि कोंदाटलें । नवल देखिलें नभाकर गे माये**
**रखुमादेवी-वरु सहज नीटु जाला । हृदयीं नीटावला ब्रह्माकारें**

सर्वांच्या हृदयांतील आर्तता, सर्वांचें दुःख, माझ्या हृदयांत उमटत असतें. हें सर्व विश्व माझें च शरीर आहे, आणि तें हि पुन्हां ब्रह्ममय आहे, असें मी अनुभवतों. सर्वांना आवडणारें प्रेम मी च होऊन बसलों आहे. आपला प्रीति-भंग होऊं नये, आपले मनोरथ सुफलित व्हावे, याविषयीं त्या त्या प्राण्याला जी जी तळमळ वाटते ती ती सर्व मला च वाटते.

मला क्षुद्र म्हणून कांहीं भेटत च नाहीं. जें भेटतें तें आकाशासारखें विशाल आणि महान् भेटतें----मग तो क्षुद्र मानलेला जंतु का असेना! असंख्य आकाशें एकमेकांना भेटून राहिलीं आहेत, असें माझें अद्‌भुत् दर्शन आहे! माझ्यासाठीं जणूं आकाशांची खाण च उघडली आहे!

ऋजु-कुटिल नाना वेष घेऊन परमेश्वर लीला करून राहिला आहे, असें म्हणतात. पण माझ्यासाठीं कुटिल किंवा वांकडें कुठें च नाहीं. जें आहे तें ऋजु नीट च आहे. वरून वरून काम-क्रोधादिकांनीं, किंवा द्वेष-ईर्षा-असूया आदिकांनीं, प्रेरित होऊन वागतांना कुणी दिसलें, तरी त्यांच्या त्या विकारांच्या मुळाशीं शुभाकांक्षा च भरलेली आहे, असें मीं त्यांच्या हृदयांत प्रवेश करून पाहून घेतलें आहे. विकारांच्या मुळाशीं असलेली ब्रह्म-प्रेरणा—विकारांची ब्रह्माकारता—ओळखल्यामुळें मला सहज च सर्वांविषयीं सहानुभूति वाटते.

## १३२

**अगाधपण माझें अंगीं बाणलें**
**वरपडें देखिलें मृत्तिका-लिंग**

**तयासि चैतन्य नाहीं चळण नाहीं**
**गुण नाहीं रूप नाहीं**

**माझां शरीरीं ज्योतिर्लिंग उगवलें**
**अगाध कवळिलें हस्तेंविण**
**रखुमादेवी-वरु ज्योतिर्लिंग विश्व-नाथ**
**तेणें माझा मनोरथ पुरविला गे माये**

शरीर म्हणजे मातीचा पिंड, या भावनेनें साधनेचा आरंभ केला. आज त्या भावनेचें अति दिव्य रूपांतर झालेलें आहे. अजून तो आहे मातीचा पिंड च, पण त्याच्या अर्थाची खोली मात्र अगाध झाली आहे. आज तें बनलें आहे मातीचें ज्योतिर्-लिंग! त्यांत स्थूल बुद्धीची चेतना नाहीं, मनाचें चळण नाहीं, इंद्रियांचा गुण नाहीं, हाडा-मांसांचें रूप नाहीं. असें हें अगाध ज्योतिर्-लिंग, मीं बिनहातानें, प्रारब्ध-शेष-बळानें, भक्ती-साठीं धरून ठेवलें आहे. ईश्वराच्या कृपेनें, ज्यासाठीं वैराग्य धारण केलें होतें, तो माझा सर्व मनोरथ पूर्ण झाला आहे.

१३३

**स्वर्ग जयाची साळोंखा । समुद्र-पाळी पिंड देखा**
**शेषासारिखी बैसका । जो आधार तिहीं लोकां**

**लिंग देखिलें देखिलें । त्रि-भुवनीं विस्तारलें**

**मेघ-धारीं स्नपन केलें । तारा-पुष्पीं वरि पूजिलें**
**चंद्र-फळ जया वाहिलें । ओंवाळिलें रवि-दीपें**

**आत्म-नैवद्य समर्पिलें । ब्रह्मानंदीं मग वंदिलें**
**ज्योतिर्-लिंग हें ध्याइलें । ज्ञानदेवें हृदयीं**

विश्वरूप स्वयं-भू ज्योतिर्-लिंग समोर दिसत आहे. शेषाची बैठक मांडली आहे. समुद्र-वलयांकित पृथ्वी, मधला पिंड झाली आहे. स्वर्ग मूलाधाररूप साळुंका. या दिव्य ज्योतिर्-लिंगाची पूजा हि सांगोपांग होऊन चुकली आहे!

मेघ-धारांनीं त्याला स्नान घातलें आहे. तारकारूप फुलें वाहिलीं आहेत. चंद्ररूप फळ समर्पिलें आहे. सूर्यरूप दिव्यानें ओवाळलें आहे. समस्त जीव-राशीचा जीवभावरूप नैवेद्य त्याला निवेदिला आहे. विराट् रूपांतील् ब्रह्मानंदानें त्याला वंदन केलें आहे.

अशा या महापूजेचें ज्ञानदेव हृदयांत ध्यान करीत असतो.

## १३४

**चहू शून्यां आरौतें महाशून्या परौतें । सर्वांशीं पाहतें तें चि तें गा**
**शून्य निर्शून्य दोन्हीं हारपलीं । तेथूनि पाहिली निज वस्तु**
**ध्येय ध्याता ध्यान निरसूनि तीन्ही । जालों निरंजनीं अति लीन**
**ज्ञानदेवो म्हणे अनुभवी तो जाणे । गुरु-मुखें खूण सांगितली**

ध्यानाच्या चरमस्थितींत जीवाची कल्पना-सृष्टि सर्वस्वी लोपते. जवळजवळ स्वरूप-शून्यता च प्राप्त होते. चित्त-चतुष्टय शून्य होतें. त्या हि पलीकडील दहराकाश, जीव-प्रकृति, ती हि शून्य होते.

चित्त-चतुष्टयाच्या अलीकडे व्यक्त सृष्टि उभी च असते. जीव-प्रकृतीच्या पलीकडे अव्यक्त सृष्टि तशी च असते. दोन्ही ध्यान-कक्षेच्या बाहेर. ध्यान-शक्तीनें त्यांचा लोप व्हावयाचा नसतो. गणिताच्या भाषेंत दोन्ही अनंत किंवा निर्शून्यें आहेत. एक व्यक्त किंवा अलीकडील निर्शून्य. दुसरें अव्यक्त किंवा पलीकडील निर्शून्य.

हीं दोन्ही निर्शून्यें, आणि जीवाच्या कल्पनेंतील तीं चारी पांची शून्यें, मिळून विश्व-रूप बनलें आहे. हें सर्व बनलेलें, आणि या सर्वांस पाहणारें, एक च एक ब्रह्म-तत्त्व आहे. तीं च आपली सर्वांची निज-वस्तु आहे.

शून्याचें निरसन केलें म्हणजे निर्शून्य सहज च निरुपद्रवी होतें. आणि उभयातीत अशा त्या निज-वस्तूचें दर्शन होतें. मग ध्यानाची

गरज संपली. ध्येयमयता—तदंजनता—मावळली. निरंजनता उगवली. अगदीं सामान्य माणसाप्रमाणें आतां तो दिसेल. ज्ञानदेव म्हणतो—ही अवस्था मीं अनुभविली आहे. आणि अनुभवानें च ती कळणारी आहे.

पण निवृत्तिनाथांनीं ती अवस्था समजावण्यासाठीं एक खुणेचा शब्द शोधून काढला आहे. त्यांनीं तिला 'अतिलीन' अवस्था असें नांव दिलें आहे. सामान्य मनुष्याचें चित्त सगळीकडे जात असतें. ह्याचें हि सगळीकडे जाईल. त्याचें हि चित्त लीन नाहीं याचें हि चित्त लीन नाहीं. पण त्याचें लीन नाहीं म्हणजे तें अलीन आहे. ह्याचें लीन नाहीं म्हणजे तें अतिलीन आहे.

## अध्याय १९

१३५

**जाणोनियां नेणपण अंगीं बाणलें**
**नेणोनियां जाणपण सहज नेणवलें वो माये**

**आत्म-ज्ञानाची गति जाली निवांत**
**प्रबोध-तत्त्व मी पावलें वो माये**

**गुरु-मुखें जें जोडे तें फिटे सांकडें**
**रखुमादेवी-वर कोडें कवतिकें वो माये**

अज्ञान जाऊन ज्ञान लाभलें, म्हणजे साधकाला जाणीव बाधत असते. माझी मात्र ज्ञानानंतर नेणीव च पक्की झाली. जाणीव कशी असते, तें मला कळलें च नाहीं. आत्म-ज्ञानाचा वेग आपोआप च जिरला, आणि

ज्ञानी होण्याऐवजीं मी ज्ञान-स्वरूप झालों. गुरु-मुखानें जेव्हां ज्ञान लाभतें, तेव्हां सर्व साधना अशी सहजपणें साधते, आणि जाणिवेचें मोठें संकट टळतें.

१३६

जाणों गेलियें तंव जाणणें राहिलें
पाहों गेलियें तंव तें चि जालें गे माये

इंद्रियांसहित चित्त ठकलें चि ठेलें
मी माझें विसरलें स्वयें भाव

ऐकोनि देखोनि मन होय आंधळें
परतोनि मावळे नाहीं तेथ

अविद्या निरसली माया तुटली
त्रि-गुण-साउली तेथें रूप कैचें

चांग विचारिलें विवेकें उगवलें
ज्ञान हारपलें तयामाजीं

मुकियाचे परी आनंदु भीतरीं
अमृत जिव्हारीं गोड लागे

बाप रखुमादेवी-वरु विठ्ठलु जागे
संत ये खुणे संतोषले

मी ईश्वराला जाणायला गेलें तर जाणणें बाजूला च राहिलें, पण माझें च अस्तित्व नाहीसें झालें. त्याचें दर्शन होण्याच्या अगोदर च मी तद्रूप झालें. इंद्रियांसकट चित्ताला आश्चर्यानें घेरलें.

कांहीं तरी दिव्य नाद ऐकूं येत आहे, दिव्य रूप दिसत आहे, असा भास होई. पण त्यावर अनुमान रचण्याची शक्ति मनांत उरली नाहीं. कांहींसें सावध होऊन मनानें तसा प्रयत्न हि केला. पण हार खाऊन तें मागें परतलें. त्याचें तेज कमी पडून शेवटीं तें नाहींसें च झालें. आधीं तत्त्व-विचार पुष्कळ करून ठेवला होता. आत्मानात्म-विवेकाचा हि प्रकाश मिळविला होता. पण तो सारा त्याच्यापुढें लटपटला. सारें ज्ञान त्याचेसमोर हारपलें.

ईश्वर-दर्शन म्हटलें, तरी पाहणाऱ्याच्या ठिकाणीं अलग राहून पाहण्या-पुरतें द्वैत पाहिजे. ईश्वराला मायेचें वेष्टण पाहिजे. त्रि-गुण नाहींत तरी त्रि-गुणांची छाया तरी पाहिजे. हें सारें च खंडित झालें, मग दर्शन कसलें करता?

दर्शन नाहीं, तर तें काय अदर्शन म्हणायचें? तें दर्शन हि नव्हतें आणि अदर्शन हि नव्हतें. तें आस्वादन होतें. मुक्यानें अमृत चाखलें, त्याचें तो वर्णन काय करणार? चाखलेल्या कोणत्या हि गोडीचें वर्णन अशक्य च. अमृताच्या गोडीचें त्याहून अशक्य. आणि मुक्याकडून सुतराम् अशक्य.

पण त्याची कांहीं खूण तरी सांगाल कीं नाहीं? 'जागृतींतील गाढ झोंप' अशी या अवस्थेची खूण सांगतां येईल. अर्थात् इंद्रियें, मन, बुद्धि, अहंकार सर्व निजलीं आहेत, आणि देहांत परमेश्वर जागत आहे!

## १३७

**चैतन्य चोरुनि नेलें चित्त माझें सर्व गेलें**
**पाहें तंव तंव तन्मय जालें गे माये**

**देवें नवल केलें मन माझें मोहिलें**
**विसरु तो आठवु जाला गे माये**

१०४८०

यासि जाणावयालागीं अनुहतें पाहें
तंव त्रि-भुवन तन्मय जालें गे माये

बाप रखुमादेवी-वरें विठ्ठल-रायें
माझें सबाह्य अभ्यंतर व्यापिलें गे माये

त्याला मी जसजशी पाहत गेलें, तसतशी तन्मय च होत गेलें. शेंवटीं सारा जीव-भाव लोपला. जणूं चैतन्य च चोरीला गेलें! मग बिचाऱ्या चित्ताची काय गत? ईश्वर-स्मरण हि लटकें पडलें. सर्व विकारांचें विस्मरण हें च त्याचें स्मरण झालें.

अनाहत ध्वनि ऐकूं येत होता. त्याचा मागोवा घेत घेत ईश्वराचें विशिष्ट स्वरूप जाणण्याचा प्रयत्न केला, तर त्रिभुवन च त्या नादानें भरून गेलें. ईश्वराच्या विशिष्टतेचा पत्ता लागला नाहीं. माझें अंतर्-बाह्य सर्व ईश्वरानें भरून गेलें.

१३८

आपुला गुण-ग्राम सांडोनियां गेलियें
निवांत राहिलियें निर्गुणीं वो माये

परोपरी पाहतां सर्व-रूपीं गोपाळ
तो मजपासीं परी वेळ न लगतां वो माये

अनुवाद खुंटला सर्वांगें भेटला
गुण-ग्राम तुटला सहज वो माये

ऐसें म्यां रूपें आपुलें आपण चि केलें
रखुमादेवी-वरें विठ्ठलें वो माये

मी आपल्या या त्रिगुणात्मक संसाररूप गांवाला सोडून गेलें. आणि निवांतपणें निर्गुणाच्या एकांतांत जाऊन राहिलें. तेथें अनेकविध ध्यानचिंतनें

करतां करतां दर्शन झालें, कीं ईश्वर च हें सर्व झाला आहे. ज्याला मी त्रिगुणात्मक संसार समजत होतें तो हि त्याचें च रूप आहे. तो निरंतर माझ्या च पाशीं आहे. त्याच्या माझ्यामध्यें एका क्षणाचा हि पडदा नाहीं.

आतां बोलण्याचें काम च नाहीं, तो मला सर्वांगानें भेटून चुकला आहे. आणि तो त्रि-गुणांचा गांव च उडून गेला आहे. त्रिगुणात्मक मायेवर निर्गुण चिंतनाचें कलम केलें, त्यांतून सगुण परमेश्वर फलित झाला. ईश्वरानें स्वतः आपलें च रूप मला देऊन, माझ्याकरवीं हा असा चमत्कार सिद्ध केला!

## १३९

**भेटीसि गेलियें तंव तें चि जालियें**
**भुलली ठेलियें मज न कळे कांहीं**

**परतलिया दृष्टी जंव मागुता न्याहाळीं**
**तंव काळी ना सांवळी मूर्ति, चोजवेना**

**काय सांगों माये न कळे तयाची सोये**
**येणें मनाचें, मोडूनि पाये वेधियेलें**

**आशेचिये हांवे तंव तो परता चि धांवे**
**निराशेसि पावे वेळु न लगतां**

**रखुमादेवी-वरीं विठ्ठलीं उपाओ**
**ज्ञानदेवा भावो निवृत्ति-पाईं**

त्याला भेटायला गेलें तर तो च मी झालें! संज्ञा हारपली. पुन्हां भानावर येऊन पाहतें तर मूर्तीचें दर्शन च नाहीं. त्याची तऱ्हा कांहीं लक्षांत येत नाहीं. चिंतनाची गति कुंठित होते. पण लागलेला वेध मात्र सुटत नाहीं!

अनुभवानें एक गोष्ट कळली, कीं त्याच्या हि दर्शनाची हांव राखावी तर तो दूर च जातो. विषयांच्या आसक्तीनें ईश्वर-दर्शनाचा प्रश्न च नाहीं. पण ईश्वर-दर्शनाच्या आसक्तीनें हि तें दुरावतें. उलट ती हि आसक्ति सोडून स्वस्थ चित्तानें साधन आचरीत रहावें, म्हणजे त्याची भेट लवकरांत लवकर होते. म्हणून गुरु-चरणीं भाव ठेवून सेवा करीत राहणें हा च ईश्वर-प्राप्तीचा उपाय ज्ञानदेव समजला आहे.

१४०

**मजमाजीं पाहतां मी-पण हारपलें । ठकलें चि ठेलें सये मन माझें**
**आंत विठ्ठलु बाहेर विठ्ठलु । मी चि विठ्ठलु मज भासतसे**
**मी-पण माझें नुरे चि कांहीं दुजें । ऐसें केलें निवृत्ति-राजें म्हणे ज्ञानदेवो**

मी माझ्यामध्यें पाहतें, तर माझें मीपण हरवलेलें दिसतें. त्यामुळें मन अगदीं स्तंभित झालें आहे. माझ्या आंत विठ्ठल, माझ्या बाहेर विठ्ठल, मी स्वतः हि विठ्ठल. आणि हें सर्व अनुभवणार पुन्हां मी च. याला काय म्हणावें? मीपण च हरवलें म्हणावें? कीं वेगळें मीपण उरलें नाहीं, मीपण व्यापक झालें म्हणावें? कांहीं म्हणा, पण निवृत्तिनाथांनीं माझी ही अशी स्थिति करून ठेवली आहे खरी.

१४१

**अधिक देखणें तरी निरंजन पाहणें**
**योगिराज विनवणें मना आलें वो माये**

**देह बळि देऊनि साधिलें म्यां साधनीं**
**तेणें समाधान मज जोडलें वो माये**

**अनंगपण फीटलें माया-छंदा सांठविलें**
**सकळ देखिलें आत्म-स्वरूप वो माये**

चंदन जेंवि भरला अश्वत्थ फुलला
तैसा म्यां देखिला निराकार वो माये

पुरें पुरें आतां प्रपंच पाहणें
निजानंदीं राहणें स्वरूपीं वो माये

ऐसा ज्ञान-सागरु रखुमादेवी-वरु
विठ्ठलु निर्धारु म्यां देखिला वो माये

यापुढें ध्यान-चिंतनादिकांचा प्रयोग चालविणें म्हणजे अनुभविलेलें ब्रह्म-तत्त्व पुन्हां पुन्हां पाहणें आहे. त्यांतून अधिक निष्पत्ति व्हायची नाहीं. त्यापेक्षां ज्याच्या कृपेनें एवढा ब्रह्मानुभव लाभला, त्या ईश्वराची आणि श्रीगुरूची स्तुति सहज गात रहावी हें मनाला बरें वाटतें. देहाचें बलि-दान होऊन चुकल्यामुळें साधना संपली आहे. समाधान झालें आहे. कामने-सह मायेचा छंद जिरवून परिपूर्ण आत्म-स्वरूप डोळयांनीं पाहिलें आहे.

आत्म-स्वरूप निराकार म्हणावयाचें, पण मला तर तें च विश्वाकार दिसून राहिलें आहे. जणूं चंदनाला फळें लागलीं आहेत ! पिंपळ फुलला आहे ! आतां संसाराच्या दर्शनाची गोष्ट च काढूं नका ! केवळ स्वरूपानंदांत राहणें आहे. परमात्मा ज्ञान-समुद्र, सृष्टिरूप लाटांनीं उसळून राहिला आहे !

## १४२

निरंजन-वना गेलियें साजणी
तेथें निर्गुणें माझां मनीं वेधियेलें

सुखाची अति प्रीति जाली गें ब्रह्मीं
श्रीगुरु निवृत्ति-मुनि मी जालें गे माये

**रखुमादेवी-वरु विठ्ठलु सहजावला**
**निर्गुण दाविला विसुरा गे माये**

ब्रह्म-चिंतनरूप निर्जन अरण्यांत मी राहूं लागलें, तेथें निर्गुगानें माझें मन वेधून घेतलें. निर्गुण हें चिंतनाला कठिण म्हणविलें जातें. पण मला तें सोपें होऊन बसलें त्याची च गोडी वाटूं लागली. त्यांत च मी रमून गेलें.

इतकी कीं जणूं मी निवृत्ति-गुरु च बनलें. निवृत्तिनाथांची जी स्थिति ती च माझी स्थिति झाली. निर्गुण परमात्मा सृष्टिरूपानें सगुण साकार झाला आहे, असें अनुभविलें. अर्थात् ईश्वर सहज होऊन गेला. निर्गुण चिंतनाची गरज संपली. इतक्याउपर विरंगुळा म्हणून घटकाभर त्यांत बुडी मारून बसायचें असेल तर बसावें !

## अध्याय २०

### १४३

**चातकेंविण लक्ष अंतरीं चि ठसलें । तेथें एक बोळलें ब्रह्म-मेघ**
**तें जीवन अमृत जीवासि आलें । तयाहूनि एक आगळें गे माये**
**रखुमादेवी-वरु हातेंविण स्पर्शलें । चक्षूविण देखिलें ब्रह्म गे माये**

एक चातक असतो, तो मेघाकडे लक्ष लावून बसतो, आणि मेघ त्याच्यासाठीं बरसतो, असें सांगतात. इथें चातक नाहींसा झाला आहे. आणि लक्ष मात्र लागून राहिलें आहे. चित्त-शून्य निर्विकार निदिध्यसन चाललें आहे. त्यामुळें प्रसन्न होऊन शेंवटीं एकदां ब्रह्म-रूप मेघानें अमृत-वर्षा केली. जीवाला संजीवन लाभलें. जीव ब्रह्म झाला.

पण मुख्य चमत्कार याहून वेगळा च आहे. ज्ञानदेव म्हणतो—तशा त्या अद्वैत स्थितींत हि ब्रह्माचें दर्शन अणि स्पर्शन माझें चालू च आहे. बिनडोळयांनीं, आणि बिनहातांनीं !

१४४

पावलों जी म्हणें, देखिलें देखणें
गेली आधीं तेणें, दृष्टि माझी

उचललिया बाह्या, क्षेम देईन तया
गेली माझी माया, देह-त्यागें

आनंदें स्फुंदत, येती अश्रु-पात
अगा गुरु-नाथ, देवराया

निवृत्ति-दास म्हणे तूंतें जीवें ओवाळिलें
शिर निरोपिलें, तुझां चरणीं

प्राप्तव्य पावलें. पाहण्याचा ध्यास लागला होता, तें पाहिलें. पण पाहतां क्षणीं दृष्टि हारपली. मग बाहूंनीं कवटाळूं गेलों, तों देह च गळून पडला. माया-निरास झाला आणि ईश्वर-दर्शनाचा प्रयोग संपला !

समोर गुरुमूर्ति उभी आहे. सात्विक भावांनीं भरून, आणि गुरूंच्या नांवाचा उद्घोष करून, ज्ञानदेवानें गुरु-चरणीं जीव-भाव समर्पिला आहे.

१४५

तूं तों माझें मी तों तुझें । ऐक्य जालें तेथें कैचें दुजें
तूं तो मी गा मी तो तूं गा । अज्ञानें बापुडीं नेणति पैं गा
निर्गुण होतें तें गुणासि आलें । अज्ञान निरसूनि एक चि जालें
ज्ञानदेवो म्हणे परतूनि पाहीं । जीवाचा जीवनु कवणे ठाईं

तूं माझा आहेस आणि मी तुझा आहें. एवढी प्रीतीची एकता झाल्यानंतर दुजेपणा उरणार च कोठून? वस्तुतः तूं आणि मी हा भेद मुळांत नाहीं च आहे. पण अज्ञानामुळें जीवाच्या लक्षांत येत नाहीं, म्हणून तूं च मी झाला आहेस असें विचारानें जाणावें लागतें. आणि अनेकविध साधना करून दृष्टि परतवून, जीवाचें जीवन-स्थान शोधीत शोधीत, मी च तूं व्हावें लागतें. आणि इतकें झाल्यानंतर ह्या सर्व उपद्व्यापाची गरज नव्हती असें लक्षांत येतें.

१४६

**देव पूजूं गेलों ठेवोनियां भाव । तंव जालों देव स्वतःसिद्ध**
**नाठवे चि कांहीं देव-भक्तपण । सागरीं लवण मेळविजे**
**चराचर रूप देव चि पैं जाला । लय होउनि ठेला आत्म-रूपीं**
**नाहीं आवाहन कैंचें विसर्जन । स्व-रूपीं चि लीन ज्ञानदेवो**

पूर्वीप्रमाणें भक्ति-पूर्वक देवाची पूजा करायला गेलों, तर मी च देव होऊन बसलों. पूजेपुरता हि देवाभक्तांचा वेगळेपणा उरला नाहीं. मीठ समुद्राला भेटायला गेलें, तर तें च समुद्र झालें. हरि चराचरांत भरून पूजा व्यापक झाली. तो च हरि आत्म-स्वरूपांत जिरून ती नाहींशी झाली. आवाहन आणि विसर्जन हें पूजेचें लक्षण. पण व्यापकतेमुळें आणि एकात्मतेमुळें आवाहन शक्य नाहीं. आणि आवाहन नाहीं, म्हणजे विसर्जन हि नाहीं. पूजा-विधि आटोपला! स्वरूपावस्थान उरलें!

१४७

**आतां यापरतें उरलें नाहीं कांहीं**
**देहीं चि विदेही होउनि ठेलों**

**आमुचे आम्ही देव आमुचे आम्ही भक्त**
**आमुचे आम्ही मुक्त एक-विध**

आमुचें आम्ही ज्ञान आमुचें आम्ही ध्यान
सोहं-रश्मि खूण हाता आली

ज्ञानदेवो म्हणे निर्गुण निरंजन
मनाचें मोहन मूर्तीमाजीं

कर्मयोगी कर्म आचरतो. आणि फल-त्यागाच्या युक्तीनें त्यापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतो. आम्हांला ही भानगड च नाहीं. कारण आम्ही देहाहून वेगळे च आहोंत.

भक्ति-मार्गांत भक्त देवाची भक्ति करतो, आणि देव त्यावर कृपा करून त्याला मुक्ति देतो. पण आमच्या बाबतींत तो हि मार्ग खुंटला. कारण देव, भक्त, कृपा सारीं आमच्या च ठिकाणीं एकवटलीं आहेत.

क्षराक्षर-विचारानें ईश्वर वेगळा करावा, आणि त्याचें ध्यान-चिंतन करीत रहावें, ही ज्ञान-मार्गाची प्रक्रिया हि आम्हांला कुचकामाची आहे; कारण सोऽहं-सूत्र हातीं आल्यामुळें, पृथक्करणाची गरज च उरली नाहीं. सर्व विचार आणि चिंतन आमच्यांत च सामावलें.

पण ज्ञानदेव म्हणतो, एवढ्या निर्गुण स्थितींत हि माझ्या मनाचा सगुण-साकाराविषयींचा ओढा मात्र कायम च आहे.

## १४८

दुधावरली साय निवडूनि दीधली । तैसी परी जाली आम्हां तुम्हां
धालों मी ब्रह्में उद्गार संभ्रमें । अनुदिनीं प्रेमें डुल्लतसें
नाठवे आशा देहावरी उदास । मी-तूं-पण भास चोजवेना
रखुमादेवी-वरु मुरोनि राहिला । तो आनंदु देखिला संत-जनीं

दुधाच्या कणाकणांत साय सांठविलेली असते. दूध तापवल्यानें ती वेगळी दिसून पडते इतकें च! तसें विश्वांत ब्रह्म भरलेलें आहे. तपश्चर्येनें, साधनेनें, तें प्रगट करावें लागतें. तेवढ्यापुरतें च तुम्हाआम्हां साधकांचें काम. तें ज्यांनीं केलें, त्यांना जणूं साय निवडून दिल्यासारखी झाली. ज्याच्या प्रतिभेला एवढें दर्शन झालें, त्याला दूध तापवून साय अलग करण्याची हि गरज नाहीं.

तुम्हां संतांच्या कृपेनें हें दर्शन मला लाभलें. समग्र ब्रह्मानुभूति, तृप्ति-रूप सहज वाक्-स्फूर्ति, आणि निरंतर विश्व-प्रीति, असें माझें जीवन झालें आहे.

देहांवर आशा च नाहीं. तेव्हां त्यावर उदास होण्याचें हि कारण नाहीं. आतां मी वेगळा आणि इतर जीव वेगळे असा भास, करूं गेलें तरी साधायचा नाहीं. जीवनांत ईश्वर मुरून राहिला आहे. आणि त्यांतून निर्माण होत असलेला आनंद संत पाहत च आहेत.

## १४९

**जिणें देउनि देहीं, निःशंक होइजे । मां मरणें मरण तयासि म्हणिजे**
**जिणें तें काई मरणें तें काई । जिणें मरणें दोहीं चोजवेना**
**सिंधु-बुडबुडा क्षणामाजीं आटे । सिंधु-बुडबुडा कधीं चि नाटे**
**बाप रखुमादेवी-वराचां पाईं । ज्ञानदेव पाहीं मरण जाणे**

जगणें देहावर सोंपवून स्वस्थ असावें, म्हणजे मरण परभारें च मरून जातें. वस्तुतः स्वरूपाच्या ठिकाणीं जगणें हि नाहीं आणि मरणें हि नाहीं. समुद्राचा बुडबुडा समुद्रापासून अलग कल्पून घेतला, तर तो क्षणांत आटून जाणार आहे. आणि समुद्रापासून वेगळा न पाडतां, तो समुद्रमय च आहे हें ओळखलें तर तो कधीं च आटायचा नाहीं. असंख्य बुडबुडे येत च राहतील. आणि समुद्र आटायचा नाहीं च आहे. ईश्वराच्या पायीं जीवभाव समर्पण करणें, एवढें एक च मरण ज्ञानदेव जाणतो.

## अध्याय २१

१५०

धर्म जागो निवृत्तीचा हरि-नामें उत्सावो
कर्म धर्म लोपलें माझें फिटला संदेहो
धर्म अर्थ काम पूर्ण दान मान समूहो
नेघें मी इंद्रिय-वृत्ति राम-कृष्ण-नामीं टाहो

कल्पना मावळली कल्प-वृक्ष-तळवटीं
चिंता हारपली माझी नित्य अमृताची वाटी
मन हें मग्न जालें नित्य वसे वैकुंठीं
ताप-त्रय पाप गेलें नाना दोषांचे थाटीं

आत्मा-राम निर्गमले वेद-शास्त्र-गुह्य-ज्ञानें
वासना चि मोहो-जाळी ते विराली नाना स्थानें
फुटले नाना घट तुटलीं बंधनें
सुटलिया जीव-ग्रंथी ऐसें केलें गुरु-ज्ञानें

बुद्धि बोध सवंगडे सजीव कर-चरण
नयनीं नयन जाले चक्षु मी समाधान
दिव्य देह अमृत-कळा दश दिशा परिधन
सर्व हें ब्रह्म जालें फळलें विज्ञान

निवृत्ति गुरु माझा अंधपण फेडिलों
सर्वत्र दृष्टि जाली एक-तत्त्वें राहिलों
निरसली माया-मोहो रामांजन लेइलों
ज्ञानदेवो ज्ञान-गंगे निवृत्ती बुडविलों

आतां जगभर निवृत्तीचा धर्म जागो. आणि सर्वत्र हरि-नामाचा उत्साह असो ! माझी इह-पर-कर्तव्य-भावना आणि पुरुषार्थ-प्रेरणा, दान-मानादि सामाजिक प्रवृत्ति आणि इंद्रियांची विषयांविषयीं वृत्ति,—सारीं च खंडलीं आहेत. केवळ एक नाम-स्मरणाचा ध्यास आहे.

सद्गुरुरूप कल्प-वृक्षाच्या छायेंत कल्पना करण्याचें काम च उरलें नाहीं. भक्तिरूप अमृताच्या निरंतर सेवनानें चिंता नाहींशी झालेली आहे. हरि-प्रेमरूप वैकुंठींच्या आनंदांत मन मग्न आहे. दोष-शोधन होऊन पाप फिटल्यामुळें ताप हि पळाला आहे.

वेद-शास्त्रादिकांचें रहस्य उकलून आत्मा-रामाची खूण पटली आहे. तत्परिणामीं मोह—जालरूप वासना, वासनांचीं अनेकविध आलंबनें वासनांतून निर्माण होऊं शकणारे आगामी देह, आणि एकूण हृदयाचे सर्व ग्रंथि, एकदम च तुटले आहेत.

बुद्धि आणि बोध यांचा कितीक जन्मांचा वियोग आतां फिटला आहे. हाता-पायांत नवीन चैतन्य आलें आहे. डोळयाच्या आंत डोळा उघडला आहे. किंबहुना मी च डोळा झालों आहे. त्यामुळें सर्व च समाधान आहे. देहाचें दिव्य परिवर्तन झालें आहे! जणूं अमृत-कळा च त्यांत ओतली आहे ! दाही दिशा पूर्वींसारख्या पोकळ राहिल्या नाहींत. घनदाट भरून गेल्या आहेत. सर्व च ब्रह्मरूप होऊन विज्ञान फळास आलें आहे.

निवृत्ति-गुरूंची ही कृपा आहे. त्यांनीं माझा आंधळेपणा दूर करून मला एक जीवन-व्यापी दृष्टि दिली. तिच्या आधारानें मी जगलों. आत्माराम-रूप रमणीय अंजन डोळ्यांत पडलें. मायेचा काळोख दूर झाला. निवृत्ति-नाथांनीं ज्ञानदेवाला ज्ञान-गंगेंत समाधि दिली. आतां त्यांचा च धर्म जागो! आणि सर्वत्र हरि-नामाचा उत्साह असो!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... विः ...............
क्रमांक ........................ नों दिः ..............

परिशिष्ट

# ज्ञानदेवांचें स्मरण

## मरठी जनतेसाठीं निरोप्या

ज्ञानदेवांचा मराठी जनतेवर उपकार अद्वितीय च आहे. कुराणांत पैगंबरानें म्हटलें आहे, "एकेक जमातीसाठीं ईश्वराकडून एकेक प्रेषित येत असतो." मला वाटतें, मराठी भाषिकांसाठीं ज्ञानदेव हा असा प्रेषित आहे. जशी भारतावर, तशी मराठी प्रदेशावर हि ईश्वरानें कृपेची अपार वृष्टि केली आहे. अनेक सत्पुरुष येथें अवतरले आहेत. या सर्वांत, मराठी भाषेपुरतें बोलायचें तर, ज्ञानदेवांचें स्थान अनन्य साधारण आहे. 'झाले बहु, होतील बहु, आहेत हि बहु, परंतु या सम हा.' असें च म्हणावें लागतें.

## ज्ञानदेव अणि ज्ञानी शंकराचार्य

ज्ञान-प्रकाशनांत ज्ञानदेवांशीं तुलनीय पुरुष गेल्या हजार बाराशें वर्षांत शंकराचार्य दिसतात. पण ज्ञानदेवांच्या ज्ञान-प्रकाशांत जो सौम्यतेचा ओलावा आहे तो शांकर-भाष्यांत आढळणारा नाहीं. '**तेज परि शीतल शशांकाचें**' अथवा '**मार्तंड जे तापहीन**' असें ज्ञानदेवांचें स्वरूप आहे. शंकराचार्य हि करुणा-समुद्र होते. '**श्रुति-स्मृति-पुराणानां आलयं करुणालयम्**' असें च त्यांचें हि वर्णन त्यांच्या शिष्यांनीं केलें आहे. पण शंकराचार्यांची करुणा हि प्रखर होती आणि ज्ञानदेवांची ज्ञान-प्रभा हि सौम्य आहे. त्यामुळें ज्ञानदेव 'माउली' होऊं शकले. शंकर 'आचार्य' च राहिले.

## ज्ञानदेव आणि योगी गोरखनाथ

ज्ञानदेव योगी होते त्या बाबतींत त्यांच्याशीं तुलनीय पुरुष गोरखनाथ दिसतात. गोरखनाथ ज्ञानदेवांच्या गुरु-परंपरेंत हि होते. परंतु गोरखनाथाच्या

मार्गांत जो 'गूढ-वाद' दिसतो तो ज्ञानदेवांनीं मुळीं च ठेवला नाहीं. ज्ञानदेवांच्या योगाचा भक्तीपुढें साष्टांग नमस्कार आहे. "**योगेविण दावित कैवल्य डोळां**' असें ज्ञानदेवांनीं भक्ताचें वर्णन केलें आहे.

**योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी**
**पाहतां पाहतां मना न पुरे धणी।**

योगी जग दूर सारून देवाला शोधूं पाहतो. त्यामुळें शून्य च त्याच्या पदरीं पडतें. ज्ञानदेव सबंध जग च ईश्वररूप पाहतात. त्यामुळें त्यांना पूर्ण दर्शन आहे. गोरखनाथाला जर शून्यवादी म्हटलें तर ज्ञानदेवांना पूर्णवादी म्हणतां येईल. शून्यवादी गोरखनाथानें सबंध हिंदुस्थान पायाखालीं घातला, तरी पण त्याचा गुपित पंथ च बनला. ज्ञानदेवांनीं सबंध समाज आत्मसात केला. त्यांनीं च म्हटलें आहे:–

**इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं**
**त्याचा वेलु गेला गगनावेरी।**

## ज्ञानदेव आणि भक्त तुकाराम

ज्ञानदेव परम भागवत होते. त्यांची तुलना आपण तुकारामाशीं च करूं. 'ज्ञानदेव तुकाराम' असा एक बोल मराठी जनता बोलत च असते. पण ज्ञानदेवांशीं आपली केलेली तुलना तुकारामाला असह्य होईल. तुकारामाची भक्ति गंगेसारखी आहे. ती हिवाळ्यांत शुभ्र आहे. पावसाळ्यांत पिंगट आहे. तिला चढउतार हि आहेत. ती समुद्रापर्यंत पोचून हि वाहती आहे. अशा च भक्तीची ज्ञानदेवांनीं हि शिफारस केली आहे. पण ज्ञानदेवांची स्वतःची भक्ति मात्र आकाश-गंगेसारखी दिसते. तिला चढ नाहीं, उतार नाहीं. तिला खळ-बळ नाहीं, खोली आहे. ती सहज-स्थिति आहे. '**माझिये सहज-स्थिति भक्ती नाम**' तुकारामाला हि या स्थितीचा शेंवटीं अनुभव आलेला आहे. उलट ज्ञानदेवांच्या अभंगांत हि, तळमळीचे कांहीं उद्गार सापडतात. तथापि एकंदर नमुना आकाश-गंगेचा दिसतो.

## निर्दोष धर्म-ग्रंथ : ज्ञानेश्वरी

ज्ञान, योग आणि भक्ति तिहींचा संगम ज्ञानदेवांच्या जीवनांत दिसत असला तरी त्यांची मुख्य प्रेरणा धर्म-संस्थापनेची दिसते. ज्ञानेश्वरी हा एक सांगोपांग धर्म-ग्रंथ आहे. धर्माच्या नांवावर कोणत्या हि वेडगळ समजुतीला किंवा संकुचित भावनेला ज्ञानदेवांनीं थारा दिलेला नाहीं. हा ज्ञानदेवांचा विशेष च आहे. गुणविकासावर भर देऊन आणि निष्काम आणि निरपेक्ष नीति विवरून ज्ञानदेवांनीं संतोष मानला आहे. जीवनाला जखडून टाकणारी भाराभर बंधनें आणि तपशीलवार संस्कारांचें जाळें यांपासून ज्ञानदेवांचा धर्म सर्वथा मुक्त आहे. मराठी भाषिकांसाठीं ज्ञानेश्वरी हा एक धर्मग्रंथ सुपर्याप्त आहे. दुसऱ्या कोणत्या हि धर्मग्रंथाची तुलना करतां, तो हिणकस ठरणारा नाहीं. त्याला अद्वैताचा मजबूत पाया आहे. त्यांत सामान्य जनांसाठीं निर्दोष-भक्ति-मार्गाचा आदर्श मांडलेला आहे. भक्तींत निष्क्रियता येऊं दिलेली नाहीं. अनवरत कर्मयोग उपदेशिला आहे. गुणोत्कर्षाची दिशा दाखवलेली आहे. समाजाविषयींचें अत्यंत उदार दर्शन मांडलें आहे. सांप्रदायिक अभिमानाला जागा ठेवलेली नाहीं. सुधारणेचा मार्ग अडवून धरलेला नाहीं. याहून अधिक निर्दोष धर्म-रचना कोणता हि देहधारी काय साधूं शकेल?

## ज्ञानदेवांची अहिंसा वृत्ति

पण ज्ञानदेवांच्या या सगळ्या गुणांपेक्षां त्यांच्या ज्या गुणावर मी मोहित आहें, तो गुण म्हणजे त्यांचें मार्दव, त्यांची विनयशीलता, त्यांची अहिंसा होय. या बाबतींत त्यांची तुलना कोणाशीं करावी हें च मला समजत नाहीं. सॉक्रेटीसाची क्षमा, शांति, अहिंसा प्रसिद्ध आहे. पण दुसऱ्यांना बोचणारा विनोद तो करूं शकत होता. येशूख्रिस्त तर दयेची मूर्ति च आहे. पण "हे ढोंग्यांनो, तुम्हांस हाय हाय!" इत्यादि शापवचनें जेव्हां तो बोलतो तेव्हां त्याच्या दयेनें समत्व-बुद्धि मागें सारली असें म्हणावें लागतें. तुकारामाला "**तुका म्हणे जें जें भेटे । तें तें वाटें मी ऐसें**" एवढें दर्शन

झालें होतें. इतकें असून "**तुका म्हणे माझें खवळलें तोंड**" ही त्याची संवय कांहीं सुटत नाहीं. गांधीजींचा अहिंसेविषयींचा आग्रह प्रसिद्ध च आहे. आणि राजकारणाचा व्यवहार त्यांनीं सतत सांभाळला, या उपाधीचा विचार करतां निःसंशय वाङ्मय-तपाचा जो आदर्श त्यांनीं प्रकट केला आहे, तो निरुपम च आहे. परंतु निरुपाधिक विचार केल्यास त्यांच्या हि वाणीला अनेकदा कठोरतेचा स्पर्श झालेला दिसेल. गांधींचा गुरु टॉल्स्टॉय. त्याची गोष्ट च बोलायला नको. तो तर चवताळून अहिंसेचा बचाव करतो! ज्ञानदेवांच्या वाणींत कुठें हि कटुतेचा लेश आढळत नाहीं. जगानें त्यांचा कांहीं कमी छळ केला नव्हता! पण त्याची त्यांनीं मुळीं च खंती केली नाहीं. किंबहुना त्याचा त्यांनीं कुठें उल्लेख हि केला नहीं.

पण असा एक उल्लेख आमच्या शिवाजीनें शोधून काढला आहे. तो आपण येथें नमूद करूं या. गीतेच्या बाराव्या अध्यायांत भक्त-लक्षणांत—

**"जो न लोकांस कंटाळे, ज्यास कंटाळती न ते"**

असें एक दुहेरी लक्षण मांडलें आहे. तें समजावून सांगतांना—

**"समुद्राचेनि माजें। जलचरां भय नुपजे।**
**आणि जलचरीं नुबजें। समुद्र जैसा॥"**

असा समुद्र-जलचर-न्याय निर्देशून ज्ञानदेव म्हणतात—

**"तेवीं उन्मत्तें जगें। जयासी खंती न लगे।**
**आणि जयाचेनि आंगें। न शिणे लोक॥**

'जग उन्मत्त वागलें तरी भक्ताला खंती वाटत नाहीं. आणि भक्ताच्या मोकळ्या वागणुकीनें जगाला शीण होत नाहीं,' असें ज्ञानदेवांनीं विवरण केलें आहे. यांत जगाला जें "उन्मत्त" विशेषण जोडलें आहे, त्यांत समाजाची ज्ञानदेवांशीं झालेली वागणूक सूचित होते असें शिवाजी म्हणतो. शिवाजीचें संशोधन निःसंशय मार्मिक आहे. आणि तो सुचवितो तसें सूचन त्यांत असूं

हि शकेल. पण ज्ञानदेवांच्या त्या वाक्याची थोडी अधिक छाननी करावयास पाहिजे. समुद्र नेहमीं खळबळ करायचा च. इतकें असून माशांना त्याचा उपद्रव च व्हायचा नाहीं. मासे नेहमीं स्वैर-संचार करीत रहायचे च, पण समुद्राला त्याचें कांहीं वाटायचें नाहीं. अशा रीतीनें समुद्र आणि मासे दोघे हि सहज भावानें वागत रहायचे. आणि इतकें असून हि दोघांना दोघांचा कंटाळा यायचा नाहीं. या दृष्टांतांत भक्त आणि जनता यांचा स्वभावानुरूप मोकळा व्यवहार दर्शविला आहे. जगानें कांहीं उन्मत्त व्यवहार केला तरी ज्ञानदेवांनीं तो उन्मत्त मानलेला नाहीं.तें जगाचें सहज-वर्तन होय असें च ते समजले आहेत. या रीतीनें हें हि वचन कटाक्ष-सूचक नसून कारुण्य-सूचक च आहे.

ज्ञानदेवांचें स्मरण मला नेहमीं च असतें आज कांहीं निमित्तानें विशेष स्मरण झालें. 'सेवक' साठीं कांहीं लिहायचें होतें, तर हें च लिहून काढलें.

सेवक, डिसेंबर १९५३

# शब्द-कोश

यच्च-यावत् सर्व शब्दांचा अर्थ देण्याची कल्पना निघाली होती, पण तितक्याची गरज न वाटल्यामुळें मुख्य शब्दांचा तेवढा अर्थ दिला आहे. शब्दांपुढील आंकडे पद्यांचे आहेत. कोशाच्या रचनेंत नेहमींपेक्षां थोडा फरक आहे. अनुस्वाराला व्यंजनाच्या आधीं जागा दिली आहे. ज्ञ संस्कृतसरणी प्रमाणें जकारांत अथवा प्राकृत सरणीप्रमाणें सर्व वर्णांच्या शेंवटीं घालीत असतात. येथें मराठी उच्चाराकडे लक्ष देऊन तो दकारांत घातला आहे. ळ हें लचें च रूप असल्यामुळें त्याची जागा ल नंतर योजिली आहे. क्ष ककारामध्यें घातला आहे.

**अंडज**–अंडयांतून जन्मणारा ३१
**अंतराय**–अडथळा, विघ्न १४
**अंबर**–आकाश ७२
**अकळ**–अनाकलनीय ६१
**अकार**–ॐकाराची पहिली मात्रा ७३
**अक्षय**–परिपूर्ण ६३
**अचळी**–छाया ६४
**अजपा**–सहज आणि सतत चाललेला 'सोऽहं'–जप २७
**अदट**–निश्चळ ९८
**अनंगपण**–सकामता १४१
**अनुपम्य**–निरुपम, अलौकिक, दिव्य १२९
**अनुमानणें**–तर्कणें, तर्क करणें ६८
**अनुवादणें**–अनुवाद करणें, बोलणें, संभाषण करणें ६
**अनुवादु**–संभापण ६०, १३८
**अनुहत**–अनाहत ध्वनि, अव्याहत होणारा 'सोऽहं'–नाद १३७
**अपभ्रंश**–पतन १६
**अभ्यंतर**–अंतर्याम, अंतरात्मा १६
**अर्णव**–समुद्र ५५
**अर्थ**–चार पुरुषार्थांपैकीं एक, द्रव्य १५०
**अवचितें**–सहज, अनायास, अप्रयत्नानें १०६
**अवस्था**–उत्कंठा ८९
**अवीट**–अव्यय, अक्षय; रुचकर १६ ४०, ८१
**अशेख**–पूर्ण २४
**अश्वत्थ**–पिंपळ १४१
**अष्टांग योग**–यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि ३०

**अष्टोत्तरशें**–एकशें आठ ९
**आंगवणें**–स्वाधीन ११३
**आकळणें**–आकलन करणें;
हस्तगत करणें २४, ४९
आकलन होणें; हस्तगत होणें १०
**आगम**–शास्त्र, विशेषत:
शैव शास्त्र १५
**आटणें**–नाश होणें ३१
**आटी**–क्षय, श्रम, खटपट ८४
**आण**–शपथ ७१
**आतुडणें**–येणें, प्राप्त होणें ६७
**आत्माराम**–आत्मा हा च राम ६२
**आन**–अन्य, दुसरें ७१
**आनु**–अन्य ९६
**आपंगिणें**–आपलें म्हणणें, जवळ
करणें ९१
**आपणपें**–आपल्या ठिकाणीं, स्वत: ४
**आपैसा**–आपणहून ४
**आमिष**–मांस, प्रलोभन-रूप ४
**आरुता**–अलीकडला ६३
**आरुष**–बोबडा १२५
**आरौतें**–अलीकडे १३४
**आर्त**–आर्तता, दु:ख १३१
**आळविणें**–हांक मारणें
(आ+लप्) ६०
**आवाहन**–देवाला बोलाविणें १४६
**उंडी**–गोळा, घास ९०
**उकलु**–सुटका ७२
**उकार**–ॐकाराची दुसरी मात्रा ७३
**उगला**–शांतिपूर्वक १२६
**उगवणें**–उलगडा करणें–होणें,
प्रकाश मिळविणें ३,१३६
उदित होणें, प्रगट होणें १३२
**उजरणें**–ऋजु होणें, सरळ होणें,
उजळणें ११८
**उठणें**–नाहींसें होणें ४३
**उतटणें**–फुटणें, उत्पूरित होणें ४३
**उत्सावो**–उत्सव, उत्साह १५०
**उदो**–उदय १२८
**उद्गार**–वचन, ढेकर १४८
**उद्भिज्ज**–बीजापासून
जन्मणारा ३१
**उन्मनी**–मनापलीकडील
अवस्था, मनाची अपेक्षा
नसलेली अवस्था १०६,१०७
**उपखा**–व्यर्थ श्रम ७२
**उपमा**–बरोबरी २८
**उरी**– शेष, शिल्लक ११५
**उरी उरविणें**–(भेद) शिल्लक
राखणें ९१
**ऋद्धि**–वैभव ७६
**एकवट**–परिपूर्ण-स्वरूप ६३
**एकांग**–दृढनिश्चयी ४५
**एकांगुष्ठीं**–पायाच्या एका आंग-
ठ्यावर उभें राहून ८२
**एकार्णव**–प्रलय-सागर ५५
**ॐकार**–ईश्वर-वाचक ६३,१३०
**कंदु**–मधुकंद, मधाचा गड्डा ६

कट—कटि, कंबर ७९
कमलाकर—कमलांची खाण ९५
कर्नाटकु—नाटकी, कौतुकी ६०
कलेवर—शरीर ७२
कळा—मात्रा, अवयव ५६,६३
—रहस्य, खुबी ७३
—कांति, तेज १५०
कळविणें—धरणें १३२
काजळी—वातीचा गूल १४
कानडा—दुर्गम ६०
कापडी—यात्रेकरू ४७
काम—चार पुरुषार्थांपैकीं एक १५०
कारण—प्रमेय ३७
काळा—कपटी, मायावी ११७
किटाई—'कृष्णाई'चें एक रूप ९५
कीळ—किरण ६०
कुरंगिणी—हरिणी ४४
कुसरी—कुशलता ४,४१
कोकणें—ओरडणें ९०
क्षेम—आलिंगन ९९,१४४
खल्विदं—(खलु इदम्) खरोखर हें विश्व ६५
खाजें—खाद्य ४
खिरजट—जीर्ण झालेलें ८४
खूण—संकेत, निर्देश ओळखण ३, १७, २५, ७१, ७४, ९०, ११०, ११४, १२८, १३०, १३४, १३६, १४७.
खोळ—परिधान, गुंडाळायचें वस्त्र ६०
गंवसणी—खोळ, आच्छादन ६४
गति—अनुभव ११, ६९
गमणें—कळणें ६०
गव्हार—अडाणी ९
गह्वर—रहस्य १२
गुंती—गुंफण, धागा १०३
गुज—जिव्हाळा, प्रेम ४८
गुजगुजीत—गोजिरवाणें १०४
गुढी—पताका ९७
गुण-गरुवा—गुण-गौरवान्वित, गुणांनीं श्रेष्ठ ५८
गुण-ग्राम—गुण-समूह, गुणांचा गांव १३८
गुरु-मुख—अनुभवी पुरुषाचें वचन १, ३, १३५
गुरु-लिंग—पूज्य गुरु १५
गेह—घर ७
गोडी—रुचि ८१,९०, १०४
गोवळा—गोपाळ, गुराखी ५८
गोसावी—स्वामी १८
घट—देह (लाक्षणिक) ३४, १५०
घडणें—चिकटणें २४,५८
घन—घनदाट, निरवकाश १२९
घ्राण—नाक ५
चतुर्देह—चारी देह, चारी रूपें १२४
चांग—चांगलें, सम्यक् १२
चाड—गरजेचा प्रश्न, आशंका,३३, ९३
—गरज १२३
चातक—ढगांचें च पाणी पिऊन राहणारा एक पक्षी १४३

**चांपे**–चांफ्याचें फूल ८८
**चित्त-चतुष्टय**–मन, बुद्धि अहंकार आणि चित्त २०
**चित्पद**–चैतन्याची खूण ६७
**चित्स्वरूप**–चैतन्य-स्वरूप सगुण ७५
**चेइणें**–जागणें ३
**चैतन्य**–चेतनता, भान १४,१३७
**चोजवणें**–कळणें ६९, १३९, १४८, १४९
**छंदु**–कामना, गायन, नाद, ६३
**जंगम**–फिरणारा, परिव्राजक १५
**जंबूक**–कोल्हा ८
**जगत्र**–जगत्–त्रय ९५, ९६ १२७
**जलाब्धि**–समुद्र ७९
**जाईजणें**–जाणारें, क्षणापुरतें ११२
**जारज**–गर्भाशयापासून जन्मणारा ३१
**जिणें**–जीवन १४९
**जितासी**–जगतोस (जी–जगणें) ५
**जिव्हार**–हृदय, अंतरात्मा १३६
**जिव्हाळा**–अंत:करण, जीवातु २१
**जीव-ग्रंथी**–जीवाच्या गांठी, हृदयांतील गुंती, (कॉम्‌प्लेक्स) १५०
**जीवन**–पाणी ८१
**जीवनु**–जीवविणारा, जीवनदाई १४५
**जोडणें**–लाभणें १, २४, ३०
**जोडी**–कमाई ४५, ५२, ५७ १००, ११२, ११५
**ज्योति**–तेज १२९
**झणें**–सावधानता सूचक निषेधक अव्यय १४, २६
**टाहो**–घोष, ध्यास १५०
**ठक**–स्तंभन ६०
**ठकणें**–फसवणें, थकित होणें, स्तंभित होणें ७,१३६, १४०
**ठा**–राहणें ४, १२८
**ठाकणें**–गांठणें, पावणें थांबणें, २,२४, १११
**ठाकविणें**–स्तंभित करणें ११३
**ठाण**–थाट, ठेवण ६१
–स्थान, अवस्थिति ७२
**ठेला**–(ठा–राहणें) राहिला १२८
**ठेलें**–राहिला (भावे प्रयोग) ४
**डांग**–फांदीं, काठी ६२
**डिंगर**–पुत्र, सेवक ४५
**ढाळ**–घाट २
**तत्स्वरूप**–अलिप्त स्वरूप, निर्गुण ७५
**तदाकार**–तद्रूप, ब्रह्मरूप ७५
**तमाळ**–एक झाड ७२
**तापत्रय**–आधि, व्याधि, उपाधि ८५
**तिळोदक देणें**–तिलांजलि देणें, शेंवटचा विधि करणें २०
**तुर्या**–समाधि-अवस्था, सर्वसाक्षिणी १०७
**तूक**–वजन, बरोबरी ५२

**त्रि-पुटी**–तीन पुटांचा समाहार, अंग-त्रयात्मक पूर्ण विचार ६७
**त्रि-भंगी**–त्रि-वक्र, त्रि-गुणात्मक ६१
**त्वचा**–चामडी ५
**थाट**–समूह ४५, १५०
**थितें**–असतें असणारें १०७
**दर्पण**–आरसा ११४,१२८
**दातारु**–वरद, देणारा ७८
**दादुला**–पति ११६
**दारुण**–भयानक ६
**दिग्पट**–विवस्त्र, दिगंबर, नागवे ४५
**दीप्ति**–दिपवणारा, प्रकाश ७५
**दुडी**–मडकें ९२
**दृश्य**–दर्शन-विषय, सृष्टि ७५
**दृष्टान्त**–अनुभव ४८
**देशाउर**–देशांतर, परदेश ११२
**देहुडा**–दीड पायावर उभा ६१
**द्रष्टा**–पाहणारा, दर्शन-कर्ता ७५
**द्रुम**–वृक्ष ६१
**धडौता**–आंगभर वस्त्र असलेला, धड वस्त्राचा ८४
**धणी**–तृप्ति, समाधान १०९, ११०
**धरणें**–ठाणें देऊन बसणें १३
–धीर धरणें, आवरणें ४४
**धरिजेसु**–धरावीस ५
**धांडोळणें**–धुंडाळणें, शोधणें १५
**धारणा**–प्रतिभा, कल्पना-शक्ति ३९
**ध्याइजेसु**–ध्यावेंस १२६
**ध्याता**–ध्यान कर्ता ६७
**ध्येय**–ध्यान-विषय ६७
**धर्म**–चार पुरुषार्थांपैकीं एक १५०
**धवळणें**–प्रकाशणें १२९
**नई**–नदी ५२
**नभ**–आकाश ७९
**नभाकर**–आकाशाची खाण १३१
**नलिका**–नळी (जिला पोपट भ्रमानें पकडून ठेवतो) ४
**नवनीत**–लोणी ३७
**नवल**–आश्चर्य १३७
**नव्हाळी**–नवलाई ११६
**नांदुलें**–सूक्ष्म नाद १२५
**नाडणें**–ठकणें, फशीं पडणें १६
**नाद**–अव्यक्त ध्वनि, अनाहत, ॐकार-बीज अंतर्नाद ६३, १२३, १२९
**नारायण**–नरसमूह-देवता, सर्वांतर्यामी परमेश्वर ३६
**नाहो**–नाथ २
**निकी**–चांगली ८८
**निघोट**–घोटीव, परिपूर्ण, निखळ १०५
**निजभाव**–स्वभाव, प्रकृति १५
**निडळ**–भाल प्रदेश १०८
**नित्यता**–सदोदित १०५
**निधान**–ठेवा २
**निधि**–धनादि संचय ७६
**निमणें**–नाहीसें होणें ११४
**नियम**–अष्टांग योगांतील दुसरें अंग; म्हणजे शौच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर-प्रणिधान, ३०,७२

**निरंजन**–माया रहित ६३
–ब्रह्म,–निर्जन १४२
–निर्गुण ब्रह्म १४१
–मायातीत ब्रह्म,
तत्-सूचित समाधीच्या पलीकडील अवस्था १३४
**निरालंब**–आलंबन-रहित ५६
**निराळ**–अंतरिक्ष-स्थित, निरालंब, निर्लिप्त ४६
**निरूपण**–व्याख्यान, उपदेश ३६
**निरोपिणें**–समर्पिणें १४४
**निर्गमणें**–प्रगट होणें, पूर्ण आकलन होणें १५०
**निर्धारु**–निश्चय, निर्णय २७,३२ ४५, ४६, १४१
**निर्वाण**–निर्वाणींची, अखेरची, निकराची, (समाधि) १८
–मोक्ष-स्वरूप ६३
–निर्धारपूर्वक ७१
–शेंवट ११३
**निर्वाह**–कड, समाप्ति, टिकाव १९
**निर्व्यंग**–अन्यून परिपूर्ण १४
**निर्शून्य**–प्रलयातीत ६३
शून्य नव्हे तें १३४
**निळी**–नीळिमा, निळा रंग १२२
**निवट**–शत्रुसंहारक ४५
**निवडणें**–पारख करणें ४६
–अलग करणें १४८
**निवडी**–निष्कर्ष ४६

**निवांत**–एकान्त, शांत १३, १०९, १३५,१३८
**निवृत्ति**–प्रवृत्ति नव्हे आणि अप्रवृत्ति नव्हे ती १८, १२५, १५०
**नीच**–नित्य १११
**नेति नेति**–हें नव्हे, तें नव्हे, अतद्–व्यावृत्ति १००
**पंचानन**–सिंह ८
**पडळ**–(मेघ-) समूह; पटल ७२
**पढियणें**–(प्रति+इ) प्रेम वाटणें, आवडणें ५८,९०
**पत्र**–पंख, पिसारा ७२
**पद-पिंडा-अतीतु**–क्षेत्र-क्षेत्रज्ञा-पलीकडचा, क्षराक्षरातीत ६३
**परतें**–वेगळें श्रेष्ठ २६
**पर्वणी**–उत्सवाचा, आनंदाचा, दिवस १०५
**परिकर घालणें**–बद्ध परिकर होणें, कंबर कसणें २४
**परिघन**–परिपूर्ण घन, घनदाट १५०
**परिमळाथिणें**–परिमळानें युक्त होणें ११३
**परियेसणें**–ऐकणें ८२
**परिवर**–आवार १०५
**परा**–संकल्परूप वाणी ६०
**परौतें**–पलीकडे ६०,१३४
**पांग**–पंगुता,अधीनता,दैन्य १४
**पाईक**–पायदळ शिपाई, सेवक ७७,८७
**पाचारणें**–बोलावणें,हांक मारणें ११६

**पाजळणें**–प्रज्वलित करणें १४
**पाटण**–बाजार-पेठ, राजधानीचें शहर, मोठें शहर ११२
**पाठार**–पठार, पृष्ठभाग ५२
**पाड**–बरोबरी ८०
**पापिया**–पापी ४
**पारुषणें**–खुंटणें ११३
**पालवणें**–खुणावणें ६०
**पालव**–पदर, फडकें ६४
**पाहणें**–उजेडणें ९६, १२४
**पीयूष**–अमृत ४४
**पुंजाळणें**–पुंजीभूत होणें, एकवटणें ६०
**पुढती पुढती**–पुन्हां पुन्हां ७१
**पैं**–निश्चयार्थक, पादपूरक अव्यय ३३, ४०, ५५, ९१, ९५, १२४
**पैल**–पलीकडचा, दुसरा ७२
**प्रबोध**–विज्ञान, आत्मा १३५
**प्रमाण**–(सामर्थ्याचें) माप २९, ४२, ४६, १२७
**प्रत्याहार**–इंद्रिय संयमन (योगांग) ७२
**प्राणायाम**–अष्टांग योगांतील एक अंग ७२
**प्रावरण**–पांघरूण ५६, ६६
**प्रेमकळी**–प्रेमरूप (दीप-) कलिका ७५
**फळपाक**–फळाची परिपक्वता, परिणाम ४
**फुकटा**–फुकटचा, व्यर्थ १६
**बागडणें**–नाचणें, खेळणें २४
**बाणणें**–जडणें, भिनणें १३२, १३५
**बाळा**–बालवत् ७३
**बाही**–बाहु, हात १९
**बाहेजु**–बाह्य, बाहेर ११, ६३
**बाहो**–बाहु, हात १०८
**बाह्या उभारणें**–उद्घोषणें २५
**बिंद**–तेजोबिंदु (योग-शास्त्रीय परिभाषा) १२३
**बिंदु**–तेजो-रूप बिंदु ६३
**बिंदुलें**–सूक्ष्म बिंदु १२५
**बिरुद**–बाणा ८०
**बुंथी**–डोकीचा पदर, घुंघट, –आवरण ७९, १००
**बुझणें**–समजणें ६
**बुझावणी**–समजावणी ६४
**बैसका**–बैठक १३३
**ब्रह्म**–ब्रह्मचिंतन, वेदाभ्यास १२१
**ब्रह्मबीज**–नरदेह १
**ब्रह्मरंध्र**–सुषुम्ना नाडीचें शेंवटचें टोंक, मूर्धन्यद्वार, ब्रह्म-चिंतन-स्थान (योग-शास्त्रीय परिभाषा) १०४
**ब्रह्मा-ह-मस्मि**–मी ब्रह्म आहें २०
**भरोवरी**–सामग्री ११५
**भवन**–घर, मंदिर ९
**भवभावविरहित**–संसाराच्या अस्तित्वाचा जिथें संबंध च नाहीं असा ६३
**भाज**–भार्या, भक्त ११७
**भान**–उजेड पडणें, अनुभूति येणें ११४

भार–बहर १०३
भाष–वचन, निश्चित कथन १२
भासणें–प्रकाशणें ७५
भुक्ति–भोग ३२
भेण–भय ३८,४५
भोग्यजात–यच्चयावत् भोग ८७
भ्रमरगुंफा–जीवाचें लय-स्थान (योग शास्त्रीय परिभाषा) १०४
मकरंद–पुष्प-रेणु, पराग ११३
मकार–ॐकाराची तिसरी मात्रा ७३
मलयानिळ–मलय पर्वतावरचा वारा ६४
मशक–चिलट १२६
मषिपत्र–शाईनें लिहिलेली चिट्ठी ८०
मां–मग १४९
मातु–गोष्ट ११
मानवणें–पटणें १२३
मार्जन–परिमार्जन, झाडून टाकणें ५५
माल्हाथिणें–जिरून जाणें, आत्मसात् होणें, ११५,११८
मुरणें–परिपक्व होऊन जिरणें ५०
–लीन होणें १७
मोहजाळी–मोहजाल १५०
मोहन–आकर्षण, ओढा १४७
मोहळ–मधमाशांचें पोळें ६
यम–अहिंसा-सत्यादि पांच महाव्रतें ७२
योगिराज–गुरु, ईश्वर १४१
रंक–गरीब, सेवक ८६
रज–लेप १२२
रजनी–रात्र ८९
रया–राया ( संबोधनार्थी ) ५,२३,३०,६३,७५,१००,१०४,१२६
रवा–कण,बिंदु १०
रश्मि–किरण ४१
रसना–जीभ ५
रहणी–राहणी, आचरण ११
रातणें–रत होणें १२१
रामांजन–रमणीय अंजन, आत्मा-राम-रूप अंजन १५०
रिघणें–शिरणें, लागणें ७
प्रवेशणें, (शरण) जाणें २४
रितें–रिक्त, रिकामें १०१
रीघ–प्रवेश २९
रेखा–आकृति ६३
लिखित, निश्चित परिमाण, विपाक २४
–पदवी, ५०
लय–मूर्तीचें ध्यान, गंभीर आदि ६३
–तंद्री १०६
लय होणें–नाहींसा होणें १०६,१४६
लयातीत–समाधीपलीकडे गेलेलें ११७
लवणें–चमकणें २
लांचावणें–तीव्र लालसा होणें, लालूच लागणें ९१

**लाघव**–माया, जादू ६३
**लाधणें**–मिळणें ४९
**लाहणें**–मिळवणें २
**लिंग**–शिव-मूर्ति १५,१३२,१३३
**लिंग-देह**–वासनात्मक देह ५४
**लेखा**–गणती ५१
**लोचन**–डोळा ५
**वचणें**–जाणें ३
**वरद**–वर देणारा, पति ८०
**वर पडें**–येऊन पडलेलें, सहज-प्राप्त, स्वयंभू प्रगटलेलें १३२
**वरी**–पर्यंत १०९
**वर्जणें**–सोडून देणें, मना करणें ८८
**वस्तु**–सद्-वस्तु, ब्रह्म १
**वांगली**–वाईट ८५
**वाचाळणें**–(मुखरय) वाणी चाळवणें २४
**वाड**–विशाल, व्यापक ३३, १२३
**वाणी**–वाण, उणीव ५१
**वाणें**–वर्णन करणें, वाखाणणें ३०
**वानणें**–वर्णणें, वाखाणणें १०१
**वाराणसी**–काशी ८२
**वालभ**–प्रेम १३१
**वाहणें**–संचार करणें १२८
**वाळणें**–वर्ज्य करणें, त्यागणें ७२
**विघडणें**–वियोग होणें ४४
**विदेही**–देहापासून अलिप्त १४७
**विद्गदु**–चहूंकडे पसरलेला ५९
**विज्ञान**–विवेक ज्ञान १९
**विनट**–मंडित, सुसज्ज ३९
–नाचरा १६
**विनटणें**–जडणें ९६
–मंडित होणें ५०
**विवळणें**–विह्वळणें ३
**विश्राम**–विश्रांति, शांति १५
**विसंब्रणें**–भरोसा करणें ९६
**विसर्जन**–देवाला बोलावणें १४६
**विसुरा**–विरंगुळा १४२
**वृंदावन**–श्रीकृष्ण-धाम १०७
**वेंचणें**–खर्च करणें ८४
–व्यय पावणें ६३
**वेधणें**–खेंचणें, आकर्षणें ९७,१०७, ११८, १३९, १४२
**वेधीं लावणें**–नादीं लावणें, आकृष्ट होणें ६०
**वेधु**–चिंता, दगदग ६
**वेरी**–पर्यंत १०३
**वैखरी**–शब्दात्मक वाणी ६०
**वोखटा**–वाईट ६
**वोळणें**–वळणें; भरून येणें, अनुकूल होणें १४३
**वोळंगणें**–चिकटून राहणें, आश्रय करणे ५
**व्योम**–आकाश ११३, १२१, १२४
**शशि**–शशांक, चंद्र ७२
**शिखी**–मोर ७२
**शिळा**–दगड ७
**शुक**–पोपट ४

शून्य–अभाव १३४
शूळपाणि–त्रिशूल-धारी शंकर ३२
शेला–हार १०३
श्रवण–कान ५
–पुराण इत्यादि ऐकणें ११
श्वेत–पांढरें १२३
षड्-गुण–ऐश्वर्य, धर्म यश, श्री, ज्ञान आणि वैराग्य ८५
षड्-वर्ग– ‘षड्-वैरी’ पहा ४५
षड्-विकार–जायते, अस्ति, विपरिणमते, वर्धते, अपक्षीयते, विनश्यति हे सहा भाव-विकार ८५
षड्-वैरी–काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ८५
संकेत–अर्थ-सूचक खूण ७९
संचणें–सांठणें, भरणें, कोंडणें १०४
संजीवन–जीवनदायी ४०
संडणें–त्यागणें ९६,३४
संभ्रम–सहज-स्फूर्ति १४८
संवसाटी–बरोबरी, सारूप्य ९२,९९
संसार–जन्म-मरण, परंपरा २३,३०
ऐहिक जीवन २५,३२,३६,३९,४२
सद्गद–कंठ दाटून येऊन २६
सत्यज्ञानानंत–‘सत्यं ज्ञानं अनंतं ब्रह्म’ ६६
सबराभरितु–घनदाट भरलेला १११
सबाहेजु–बाहेर, सकट १०२,११६
समरस–ईश्वराशीं आणि विश्वाशीं एकरूपता ७५
समाधान–समाधान राखणारा १५०
समीप–जवळ, हृदयांत १९
समुद्रपाळी–समुद्र-वलयांकित पृथ्वी १३३
सये–सखे (‘सई’चें संबोधन) १३०
सर्वादि–सर्वांचें आदिकारण ६५
सरिता–नदी १११
सळणें–हेवा करणें, शल्य वागवणें ७९
सवडी–सुख, लाड, लालन, ळळा ४२
सहजावणें–सहज होऊन जाणें १४२
सहस्र-दळ–हजार पाकळ्यांचें कमळ (लक्षणेनें) हृदय कमळ ६७
सांकडें–संकट १३५
सांग–संपूर्ण ५३
सांठविणें–जिरविणें १४१
सांडणें–त्यागणें १५,३७,५९
साउमा–पुढें, शेंवटला १९
साजणी–सखी ५७,११०
सात–बाजार ९२
सादु–शब्द, ओ, उत्तर ६०
साधुबोध–साधुमुखानें लाभलेला बोध ५०,५४
सावडा–साधा. सरळ ७३
साभिलाष–विशेष अभिलाषा, सोस ७०
सामावणें–समाविष्ट होणें १११
सायास–विशेष आयास १३,८२
साळोंखा–शिव-लिंगाचें कोंदण १३३
सासिनणें–तृषित होणें, उत्कंठित होणें ७९

सिंधु–समुद्र ७,१४९
सिद्धि–मानसिक शक्ति ७६
सुढाळ–पाणीदार २
सुभट–उत्तम योद्धा ४५
सुषुप्ति–गाढ झोंप ९७
सेविजेसु–सेवावीस १
सोज्वळित–विशेष उज्ज्वल ७५
सोडवण–सुटका, मुक्ति २३
सोपारें–फार सोपें २६
सोम–चंद्र १२७
सोय–मार्ग, उपाय ५,३९,१३९
सोहं रश्मि–सोहं-सूत्र १४७
सौरसु–स्वारस्य, सार, निष्कर्ष, प्रिति ४,६०
स्नपन–स्नान घालणें, अभिषेक १३३
स्वगत–स्वांतर्गत, आपल्या ठिकाणचें ८५
स्वसवें–आपणहून, सहजपणानें ११८
स्वेदज–घामापासून जन्मणारा ३१
हतियेर–हत्यार, शस्त्र ४५
हाटण–बाजारपेठ, मोठें शहर ११२
हाय–दाह, आग २
हार–रांग २५

ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. १०५६८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................. वि: ..................
क्रमांक .................. नों दि ..................
REFBK-0010567
REFBK-0010567